नागपूर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक २२/०७/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता** महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातुन मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/ २०२०/प्र.क्र.७६/नवि(१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे आयोजित केलेल्या सभेचे कार्यवृत्त.**

**उपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१९** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| २. | **२३** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| ४. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ५. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ६. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| ७. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| ८. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| ९. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| १०. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| ११. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| १२. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| १३. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| १४. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| १५. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| १६. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| १७. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| १८. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| १९. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| २०. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| २१. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| २२. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| २३. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| २४. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| २५. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् |
| २६. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| २७. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| २८. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| २९. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३०. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| ३१. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| ३२. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| ३३. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| ३४. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| ३५. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| ३६. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| ३७. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| ३८. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| ३९. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| ४०. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| ४१. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| ४२. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| ४३. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ४४. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| ४५. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| ४६. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ४७. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| ४८. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| ४९. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ५०. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| ५१. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| ५२. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ५३. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| ५४. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| ५५. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| ५६. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ५७. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ५८. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ५९. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ६०. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ६१. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ६२. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| ६३. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ६४. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ६५. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ६६. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ६७. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| ६८. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६९. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| ७०. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ७१. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ७२. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| ७३. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| ७४. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ७५. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ७६. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ७७. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ७८. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ७९. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ८०. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ८१. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ८२. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ८३. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ८४. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| ८५. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| ८६. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| ८७. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| ८८. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| ८९. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| ९०. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| ९१. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| ९२. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| ९३. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| ९४. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| ९५. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| ९६. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| ९७. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| ९८. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ९९. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| १००. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| १०१. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| १०२. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| १०३. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| १०४. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| १०५. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| १०६. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| १०७. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०८. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| १०९. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| ११०. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| १११. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| २. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ३. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ४. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| ५. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| ६. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| ७. | ५ | अ | रिक्त | |
| ८. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| ९. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| १०. | ८ | ब | रिक्त | |
| ११. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| १२. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| १३. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| १४. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| १५. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| १६. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| १७. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| १८. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| १९. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| २०. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| २१. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| २२. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| २३. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| २४. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| २५. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| २६. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| २७. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| २८. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| २९. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ३०. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| ३१. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| ३२. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| ३३. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| ३४. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| ३५. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ३६. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ३७. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| ३८. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ३९. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ४०. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ४१. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ४२. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ४३. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| ४४. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| ४५. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

**श्री.राधाकृष्णन बी.        निगम आयुक्त**

**डॉ.रंजना लाडे            निगम सचिव**

मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

**ठराव क्रमांक १३५ :- मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील शोक प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने दोन मिनिटे शांत चित्ताने उभे राहून मृतात्म्यास मूक श्रध्दांजली अर्पण करुन शोक प्रस्तावास सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.**

**शोक प्रस्ताव**

**वीरभद्रसिंह**

हिमाचल प्रदेशाचे सहावेळा मुख्यमंत्रिपद भुषवणारे ज्येष्ठ काँग्रेस नेते वीरभद्रसिंह यांचे दिनांक ८ जुलै, २०२१ रोजी निधन झाले. ते ८७ वर्षाचे होते.

नऊवेळा आमदार आणि पाचवेळा खासदार अशी त्यांची मोठी राजकीय कारकीर्द होती.

**केशव दत्त**

ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेते महान हॉकीपटू केशव दत्त यांचे दिनांक ७ जुलै, २०२१ रोजी निधन झाले. ते ९५ वर्षांचे होते.

राष्ट्रीय स्पर्धेत त्यांनी मुंबई आणि बंगालचेही प्रतिनिधीत्व केले. हॉकीमधील भारताच्या सुवर्णकाळाचे ते शिलेदार होते. १९४८ मध्ये लंडनच्या वेम्बळे स्टेडियमवर भारताने ब्रिटनला ४-० अशी धूळ चारुन स्वातंत्र्यानंतरचे पहिले ऑलिम्पिक सुवर्णपदक पटकावले.

**यशपाल शर्मा**

मधल्या फळीत झुंजार फलंदाजीसाठी प्रख्यात असलेले १९८३ च्या विश्वचषक विजेत्या संघातील नायकांपैकी एक यशपाल शर्मा यांचे दिनांक १३ जुलै, २०२१ रोजी निधन झाले. ते ६६ वर्षांचे होते.

भारताकडून यशपाल शर्मा यांनी ३७ कसोटी सामन्यांमध्ये १६०६ धावा केल्या आहेत. त्यात १४० धावा ही त्यांची सर्वोत्तम खेळी होती. एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्यांनी ४२ सामन्यात २८.४८ च्या सरासरीने ८८३ धावा केल्या. वनडेतील ४० डावात ते कधीही शुन्यावर बाद झाले नाही.

**दिलीप कुमार**

पन्नास वर्षाहुन अधिक काळ चित्रपट रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा हिंदी चित्रपट सृष्टीतील "ट्रॅजेडी किंग" आणि अभिनयाचे शहेनशाह ज्येष्ठ अभिनेता दिलीप कुमार यांचे दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी निधन झाले. ते ९८ वर्षांचे होते.

दिलीप कुमार यांनी १९४०- १९७० अशी जवळपास तब्बल तीन दशके आपल्या जबरदस्त अभिनयाच्या जोरावर गाजवली. १९४४ मध्ये आलेल्या "ज्वारा भाटा" या चित्रपटातून त्यांनी आपल्या अभिनयास सुरुवात केली होती.

**दत्तात्रेय बर्गी**

ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, गांधीवादी सर्वोदयी विचारवंत, सर्वोदय मंडळाचे माजी अध्यक्ष दत्तात्रेय जनार्दन बर्गी यांचे दिनांक ३ जुलै, २०२१ रोजी निधन झाले. ते ९८ वर्षांचे होते.

**दिगंबर मनोहर**

नागपूर शहरातील प्रसिध्द चित्रकार दिगंबर मनोहर यांचे दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते.

राष्ट्रसंतांच्या सांगितलेल्या कल्पनानुसार ग्रामगीतेच्या अर्पण पत्रिकेवरील शेतकरी आणि ४१ अध्यायातील संत महापुरुषांचे स्केच चित्रकार मनोहरांनी साकारलेले आहेत.

## दानिश सिद्दीकी

तालिबान अतिरेकी आणि  अफगाणिस्तानच्या सैन्य तुकडीत झालेल्या भीषण संघर्षाच्या ठिकाणी काम करीत असतांना "रायटर्स" या वृत्तसंस्थेचे भारतीय छायाचित्र पत्रकार (फोटो जर्नालिस्ट) दानिश सिद्दीकी ठार झाले. ते ४० वर्षाचे होते.

उपरोक्त सर्व मान्यवरांच्या निधनाबाद्दल म.न.पा.च्या या सभेस अत्यंत दु:ख होत आहे. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांवर ओढविलेल्या या दु:खद प्रसंगी त्यांना तोंड देण्यास धैर्य प्रदान करो, हीच प्रभु चरणी प्रार्थना.

**वंदेमातरम होवून सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली.**

**(मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी भारतीय संविधान प्रस्तावनाचे सभागृहात वाचन केले)**

**<u>ठराव क्रमांक १३६</u> :- मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.**

## अभिनंदन प्रस्ताव

### नारायण राणे व इतर मंत्री/राज्यमंत्री

माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी केलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारामध्ये महाराष्ट्रातून भाजपाचे ज्येष्ठ नेते श्री. नारायण राणे यांची सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगमंत्री या कॅबिनेट मंत्रीपदी तर डॉ. भागवत कराड यांची अर्थराज्यमंत्री, श्री.कपिल पाटील यांची पंचायत राज राज्यमंत्री आणि डॉ. भारती पवार यांची आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री पदी नियुक्ती झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचेसह नवनियुक्त सर्व मंत्री/राज्यमंत्र्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### सुजाता मनोहर

मुंबई उच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश सुजाता मनोहर यांना "रुथ बॅडर जिन्सबर्ग मेडल ऑफ ऑनर" ने सन्मानित करण्यात आले आहे. वर्ल्ड ज्यूरिस्ट असोशिएशन आणि वर्ल्ड लॉ असोशिएशनचा हा पुरस्कार असून आपले संपूर्ण आयुष्य लिंग समानतेसाठी झटणा-या अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीशांच्या स्मृती प्रित्यर्थ दिल्या जातो. अश्याप्रकारे पुरस्कार प्राप्त होणा-या त्या पहिल्या भारतीय महिला न्यायाधीश ठरल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>प्रवीण महाजन</u>**

माजी मुख्यमंत्री कै.डॉ.शंकरराव चव्हाण यांच्या १०१ व्या जयंती निमित्त जलसंपदा जलसंधारण व पाणीपुरवठा क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे प्रवीण महाजन यांना डॉ. शंकरराव चव्हाण जलभूषण पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>सायली वाघमारे</u>**

भारतीय खेल प्राधिकरणाचे खेलो इंडिया प्रशिक्षण योजनेंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठाच्या ॲथलेटिक्स प्रशिक्षण केन्द्रावर प्रशिक्षक म्हणून माजी राष्ट्रीय धावपटू सायली वाघमारेची नियुक्ती झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI)</u>**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने नागपूर शहरातील प्रमुख रिंग रोडवर असलेल्या रस्ते दुभाजकामध्ये अप्रतीम वृक्षारोपण व संवर्धन केले आहे. अश्याप्रकारे वृक्षवल्लीमुळे शहराचे सौंदर्य वाढविल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा भारतीय महामार्ग प्राधिकरणाचे सर्व अधिकारी व केन्द्रीय भुपृष्ठ परिवहन मंत्रालयाचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>म.न.पा. १० वी परीक्षेत उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन</u>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालानुसार नागपूर महानगरपालिकेच्या जी.एम.बनातवाला इंग्रजी माध्यमिक शाळेची कु.सानीया परविन मो.इम्तीयाज या विद्यार्थिनीने ९५.८० टक्के गुणांसह सर्व माध्यमातून प्रथम क्रमांक पटकाविला. मराठी माध्यमातून डॉ.राम मनोहर लोहिया माध्य. शाळेची विद्यार्थिनी कु.सुहानी गोसावी भगत ही ९४.२० टक्के गुणासह प्रथम आली. हिंदी माध्यमातून सुरेंद्रगढ हिंदी माध्यमिक शाळेची विद्यार्थिनी कु.स्वाती विनोद मिश्रा हिने ९०.६० टक्के गुणांसह पहिला क्रमांक पटकाविला. गंजीपेठ मनपा उर्दू माध्यमिक शाळेची विद्यार्थिनी कु. बुशरा फातीम अजीज खान हिने उर्दू माध्यमातून ९२ टक्क्यांसह बाजी मारली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मनपा मराठी माध्यमिक शाळेचा विद्यार्थी शिवम सिरसलाल उरकुडे याने ८३ टक्के गुण पटकाविले व दिव्यांगांमधून पहिला येण्याचा मान मिळविला. मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधून बॅरि.शेषराव वानखेडे मराठी माध्यमिक शाळेची विद्यार्थिनी कु.सलोनी महादेव कांबळे ही ९३.६० टक्के गुण घेऊन पहिली आली.

कोरोना या जागतिक महामारीने सर्व सामान्यांच्या जीवनावर विपरित परिणाम केला. शाळा बंद असल्याने ऑनलाईन माध्यमातून शिक्षण घेत विद्यार्थ्यांनी परीक्षेची तयारी केली. मात्र कोरोनाच्या संसर्गाच्या धोक्यामुळे परीक्षा होऊ शकली नाही. विद्यार्थ्यांच्या कामगिरीच्या आधारे त्यांचा दहावीच्या निकाल घोषीत करण्यात आला.

दहावीमध्ये चांगले यश संपादन करुन नगरीचे नांव लौकीक केल्याबद्दल म.न.पा. शाळेच्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांसह शिक्षणाधिकारी शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांचे नागपूर महानगरपालिकेची ही सभा विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

| |
|---|
| महापौर:- प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करण्यात येते. |
| **प्रश्न क्र. २५५** :-प्रभाग क्र २६ .येथील विविध वस्त्यांना स्लम मध्ये अंतर्भुत करण्यासाठी आपल्याकडे येथील नागरीकांनी अर्ज केले आहे काय? या संदर्भातप्रश्न |
| अॅड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, माझ्या प्रभागातील अंतुजीनगर, न्यु सुरजनगर, धरतीमॉनगर, वैष्णोदेवी नगर, विश्वशांतीनगर या वस्त्यांना स्लममध्ये टाकण्यासाठी नागरिकांनी मा. अॅड कमिश्नर आणि कार्यकारी अभियंता यांना अर्ज दिले होते आणि त्या अर्जाची प्रत माझ्याकडे सुरक्षित आहे. माझा पहिला प्रश्न असा होता की प्रभाग क्र. २६ मध्ये स्लम अंतर्गत अंतर्भुत करण्यासाठी आपल्याकडे येथील जेष्ठ नागरिकांनी अर्ज केले आहे काय? आणि हे खरे आहे काय? या प्रश्नाचे उत्तर मला प्रशासनाने दिले नाही परंतु नगरसेवक धर्मपाल मेश्राम यांना २८.०२.२०१८ ला अशा पध्दतीचे पत्र दिले होते ते मी मा.महापौरजी आपल्या निदर्शनास आणून देतो. जनतेने माझ्याकडे दिलेल्या पत्राची पत्र आहे आणि त्याची रिसीव्ह कॉपी सुरक्षित आहे. त्यामुळे प्रशासनाने दिलेले उत्तर मला संयुक्तिक वाटत नाही. दुसरे असे, या वस्त्यामध्ये काही वस्त्या, हया ज्या ५ वस्त्या आहेत त्या कचरा डम्पिंगच्या परिसरातील लगतच्या आहेत. काही वस्त्या ५०० मीटर लांब आहेत तर काही वस्त्या ३०० मीटर लांब आहेत. काही वस्त्या भिंतीला लागून सुध्दा आहेत. प्रशासनाला अशी विनंती आहे की या सगळया वस्त्या आहेत त्या राहण्यासारख्या स्थितीत नाही. आपण स्व:त महापौर साहेब, प्रशासनातील अनेक अधिकारी आणि मा.आयुक्त साहेब हया सगळयांनी त्या भागातील दौरा आपल्या कार्यकाळामध्ये अनेकदा केला असेल. आपल्या निदर्शनास आले असेल की त्या ठिकाणी राहण्यासारखी स्थिती नाही. तेथील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे आणि त्यामुळे तेथील लोकांना रोज हवेचा त्रास आहे. फुफुसाचा त्रास आहे. तेथून विषारी वायू निघत असतात आणि जाण्यायेण्याकरिता रस्ता नाही. आणि पिण्याची पाण्याची व्यवस्था महानगरपालिकेच्या वतीने आदरणीय नितीनजी गडकरी यांच्या प्रयत्नाने अमृत योजनेमध्ये त्या ठिकाणी पाणी पोहचविण्यात आले आहे. त्या ठिकाणी कच्चे रस्ते देखील काही प्रमाणात केलेले आहे. तेथील लिव्हींग कंडीशन योग्य नाही आणि वस्तीतील नागरिकांनी ज्या वस्तीतील ७५ टक्के पेक्षा अधिक नागरिकांनी जर प्रशासनाला अर्ज केले असतील की आम्हांला या वस्त्या स्लम अंतर्गत करुन देण्यात यावे. अशी माझी सुध्दा मागणी होती आणि विनंती आहे. त्या अनुसार तशा |

| |
|---|
| पध्दतीचा प्रस्ताव प्रशासनाला दिला होता. परंतु मागच्या ज्या कार्यकारी अभियंता अधिकारी स्लमच्या मा. चव्हाण मॅडम होत्या. त्या नस्तीमध्ये त्यांनी सांगितले की महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलनव पुर्नविकासअधिनियम १९७१ च्या नुसार गलिच्छ वस्ती म्हणून घोषित करणे योग्य वाटत नाही. मा. महापौरजी, माझ्याकडे महाराष्ट्र ॲक्ट ऑफ १९७१ इन्प्रुव्हल स्लम एरिया मध्ये असे आहे त्याचे कलम ४(१) मध्ये असे म्हटले आहे(वाचले) मा.महापौर साहेब, मी आपल्या माध्यमातून विनंती करु इच्छितो की जे(वाचले) कचरा डम्पिंग एरियाचा सर्व भाग हा हेल्थसाठी डेन्जर नसेल तर मी काही प्रशासनाला म्हणू इच्छित नाही परंतु जर समजा हा ॲक्ट आहे १९७१ चा त्यात कलम ४(१) मध्ये स्पष्ट नमुद आहे की जो एरिया राहण्यायोग्य नाही तो एरिया हेल्थकरिता योग्य नाही असा ओवरऑल एरिया अंतर्भुत करण्यासाठी अडचण नाही तर अंतर्भुत केला पाहिजे. मग प्रशासन या सेक्शनचा आधार घेवून येथील नागरिकांची आणि लोकप्रतिनिधी म्हणून मला आणि या सभागृहाची दिशाभूल करीत असेल तर माझी एवढीच विनंती आहे या प्रश्नाच्या अनुषंगाने की या ज्या ५ वस्त्या आहेत. ७५ टक्के पेक्षा अधिक लोकांनी मा.सहा.आयुक्त नेहरुनगर झोन आणि मा. कार्यकारी अभियंता नेहरुनगर झोन यांना रितसर अर्ज केले आहे. आणि त्याची प्रत मला दिली आहे. त्यामुळे मी प्रस्ताव तयार केला त्याचा सर्व सर्वेक्षण झालेला आहे. त्याकरिता संस्थेची आपण अपाईंट करुन टेबल सर्व्हेनंबर टू झालेला आहे. त्या वस्त्या राहण्यायोग्य नाहीत. त्यामुळे माझी नम्र विनंती आहे. स्लम ॲक्ट १९७१ च्या कलम ४(१) नुसार हया ज्या वस्त्या आहेत आणि तेथील नागरिकांच्या मागणीनुसार स्लममध्ये अंतर्भुत करण्याकरिता काही हरकत नसेल तर आपण तसे प्रशासनाला आदेश दयावे अशी विनंती आहे. आपल्याला वाटत असेल तर प्रशासनाचे मत आपण घेवून घ्यावे. |
| महापौर:- हे काम कां करण्यात आले नाही याबद्दल प्रशासनाने उत्तर मांडावे. |
| कार्यकारी अभियंता (श्री.बाराहाते) :- मा.महापौरजी, नागपूर शहराच्या मंजूर विकास आराखडयानुसार अंतुजीनगर व न्यु सुरजनगर या दोन वस्त्या ग्रिन बेल्ट कंट्रोल स्किम अंतर्गत समाविष्ट असल्यामुळे व उर्वरित तीन वस्त्या रहिवासी वापरा करिता दर्शविलेल्या आहेत व खाजगी जमिनीवर वस्त्या वसलेल्या असल्याचा रिपोर्ट नेहरुनगर, झोन क्र. ५ तर्फे स्लम कार्यालयास प्राप्त झालेला आहे. महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकासअधिनियम १९७१ च्या कलम ४(१) अनुसार गलिच्छ वस्ती म्हणुन घोषित करणे योग्य वाटत नसल्यामुळे नकार देण्यात आला आहे. |
| ॲड्धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, जी माहिती कार्यकारी अभियंता श्री.बाराहाते साहेबांनी दिली. त्या स्लम ॲक्ट १९७१ च्या कलम ४ सेक्शन (१) अनुसार मला या गोष्टीचे आश्चर्य वाटते की त्या कलमाला त्यांनी पुन्हा तपासावे, पुन्हा तपासावे. त्या अंतर्गत अशा स्लम नोटीफाईड करता येत नसेल तर मला काहीही म्हणावयाचे नाही. स्लम ॲक्टमध्ये अशा प्रकारची प्रोव्हीजन करण्यात आली आहे. मी ती नस्ती लिगल ओपिनियम करिता विधी विभागाकडे पाठविली. विधी विभागाने त्या नस्तीवर स्लम नोटीफाईड करता येते असे आपले मत दिले आहे. त्यामुळे मा.महापौरजी, आपल्या निदर्शनास मी आणून देवू इच्छितो की, नागपूर शहरामध्ये ४२३ झोपडपट्टया आहेत. त्या सगळयाच्या सगळया झोपडपट्टया हया शासकीय जमीनीवर आहेत, अनेक झोपडपट्टया खाजगी जमिनीवर आहेत, अनेक झोपडपट्टया आरक्षित जागेवर आहेत आणि |

त्या स्लम नोटीफाईड आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो कि, नागपूर युनिर्व्हेसिटीचे मैदान हे खेळाकरिता आरक्षित आहे.मा.महापौरजी, मी आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो कि, हे मैदान खेळाकरिता आरक्षित असल्यावरही अण्णाभाऊ साठे नगर त्या मैदानावर वसलेले आहे. ते फुटबॉल खेळासाठी आरक्षित असल्यावरही नोटीफाईड करण्यात आलेले आहे. त्यामुळे या स्लम ॲक्टनुसार ही जमीन कोणत्या उपयोगाकरिता आहे. ग्रीन बेल्ट कंट्रोल करिता प्रस्तावित आहे की आणखी कोणत्या उद्देशाकरिता आहे ते समजण्यात येत नाही. त्या जमीनीवर राहणा-या लोकांच्या आरोग्यासाठी ते योग्य आहे की अयोग्य आहे या प्रोव्हीजनची त्या कायद्यामध्ये तरतूद करण्यात आली आहे. मा.महापौरजी, पुन्हा आपल्याला नम्र विनंती करतो की प्रशासन अशा पध्दतीने जनतेच्या सुरक्षिततेला वाटाणा लावण्याचा प्रयत्न करीत आहे.माझी आपल्याला नम्र विनंती आहे की या विषयावर नागरिकांनी ज्या पध्दतीचे अर्ज प्रशासनाकडे केले आहे आणि मी तसा पध्दतीचा प्रस्ताव तयार केलेला आहे त्याला मान्यता देण्यात यावी आणि या सर्व वस्त्या स्लम नोटीफाईड करण्याचे आपण निर्देश दयावे अशी मी आपल्याला विनंती करतो. धन्यवाद.

महापौरः- मा. सदस्यांनी जी सुचना केलेली आहे. त्याप्रमाणे एकदा पुन्हा प्रशासनानी त्या परिसरात जावून चाचणी करावी त्यानंतर नियमानुसार जर हे तर्कसंगत आहे, असे विधी विभागाचे मत आहे तर त्या दृष्टीने प्रशासनानी पुढील पावले उचलावी.

**<u>प्रश्न क्र. २५६</u>:-**नागपूर शहरातील कचरा संकलन करणाऱ्या कंपनी मार्फत ऑपरेटर ने घरोघरी कचरा गोळा करण्यासाठी उपयोगात आणलेल्या सर्व गाडयांवर जीपीएस संदर्भात प्रश्न

श्री.प्रफुल्ल गुडधेः- मा.महापौरजी, नागपूर शहरामध्ये कचरा संकलन करण्याकरिता महानगरपालिकेने दोन कंपन्याची नियुक्तीकेली होती आणि पाच-पाच झोनचे वाटप करुन कचरा संकलन करण्याकरिता दिले आहे. त्या संदर्भामध्ये अनेक नागरिकांच्या तक्रारी होत्या की नियमित पध्दतीने कच-याचे संकलन केले जात नाही. नियमित गाडया येत नाही, ऑलटरनेट डे गाडया कचरा उचलण्याकरिता येतात. वस्त्यांमध्ये दोन-दोन, तीन-तीन दिवस कचरा उचलण्याकरिता गाडया येत नाही. त्या अनुषंगाने करारनाम्यामध्ये दिलेल्या बाबी, करारनाम्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेला करावयाच्या बाबीं व ऑपरेटर कंपनीला करावयाच्या बाबीं यामध्ये निश्चिती करुन दिली आहे. त्यामुळे २ मार्च २०२१ ला महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकारी यांनी एक पत्र देवून एग्रीमेंटमधल्या ज्या बाबीं करुन घेणे गरजेचे होते त्या संपुर्ण बाबीं करुन घेण्याबाबत मी पत्र दिले. मात्र दोन-तीन महिने होवून गेल्यावरती कोणतेही उत्तर आले नाही. मार्च महिन्यामध्ये कोरोना महामारीच्या प्रार्दुभाव वाढत असल्यामुळे त्या पिरेडमध्ये प्रशासन व्यस्त होते आणि त्यामुळे उत्तर आले नसावे असे मी मानतो त्यानंतर कलम ४४ अंतर्गत महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये मी परत उत्तराची मागणी केलेली आहे. मा.महापौरजी, माझा पहिला प्रश्न होता,नागपूर शहरातील कचरा संकलन करणाऱ्या कंपनी मार्फत ऑपरेटर ने घरोघरी कचरा गोळा करण्यासाठी उपयोगात आणलेल्या सर्व गाडयांवर जीपीएस ट्रॅकिंग सिस्टीम व सॉफटवेअर बसविण्यात आली आहे काय? असा प्रश्न मी त्यावेळी उपस्थित केला होता

| |
|---|
| त्यावर उत्तर आले आहे की हो अशी जीपीएस ट्रॅकिंग सिस्टीम बसविण्यात आली आहे. मग ही जी जीपीएस ट्रॅकिंग सिस्टीम आहे तर एखाद्या वेळेस वस्तीमध्ये गाडी गेली की नाही याची मॉनेटरींग करणारी व्यवस्था आहे तर त्याची मॉनेटरींग केल्यानंतर त्याच्यावर दंड कां आकारीत नाही. त्यामध्ये माझा हा दुसरा प्रश्न होता. त्याचे नियंत्रण महानगरपालिकेच्या कोणत्या अधिका-याकडे असा प्रश्न विचारला असता त्याचे उत्तर आले, त्याचे एक्सेस मा.महापौर कार्यालय यांचेकडे व स्मार्ट सिटी कार्यालय यांचेकडे उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच झोन स्तरावर एक्सेस देण्यात आले आहे. एक्सेस दिले आहे परंतु जे काही मॉनेटरींग आपण करतो, त्यामध्ये काही चुका आढळल्या, काही त्रुटया आढळल्या, काही एरियामध्ये गाडी गेली नाही तर त्याच्या वर नियंत्रण करणारी मॉनेटरींग झाली नाही तर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे हा माझा तिसरा प्रश्न होता मा.महापौरजी. त्याचे प्रशासनाने उत्तर दयावे. |
| महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. |
| उपायुक्त(श्री.राजेश भगत):- मा.महापौरजी, कचरा संकलन करण्याकरिता ज्या गाडया लावलेल्या आहेत त्या सर्व गाडयावर जीपीएस ट्रॅकिंग सिस्टीमलावलेली आहे. फक्त सायकल रिक्षा ही सिस्टीम लावलेली नाही. या एक्सेस झोन निहाय दिलेले आहे कारण त्याचे मॉनेटरींग झोन लेव्हलवर होते. ज्या गाडया दिलेल्या रुटवर काम करीत नसेल तर त्याच्या स्तरावर दंडात्मक कार्यवाही प्रपोज होवून तसे सादर केल्या जाते. |
| श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, अशा किती वेळा दंडात्मक कार्यवाहया केल्या आहेत. |
| उपायुक्त(श्री.राजेश भगत):- मा.महापौरजी, आतापर्यंत दोनही कंपन्यावर ४० लक्ष,५४ हजार २२४ रुपये दंड बसविलेला आहे आणि मग त्यांच्याकडून वसुल करणार आहे. |
| श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, ४० लक्ष रुपये दंड आकारावयाचा आहे. हा दंड आकारण्याचा आधार काय आहे. किती वस्त्यामध्ये किती किती दिवसामध्ये याची गॅप आली आहे याच्यामध्ये कुठेही बॅलन्स नाही. ४० लाख कशाच्या आधारावर केले आहे. मा.महापौरजी, याच्यामध्ये एखाद्या रुटमध्ये गाडी निश्चित केल्यानंतर ती गाडी कचरा संकलन करीत नाही तर त्या वस्तीमध्ये किती घरे येतात. याची दंडाची रक्कम किती होते हे निर्धारित झाले नाही. ही जीपीएस सिस्टीम लावली आहे त्याची मॉनेटरींग झाली पाहिजे. ही जीपीएस सिस्टीम कशासाठी लावतो आहे की ती मॉनेटरींग झाली पाहिजे. याला मराठी भाषेमध्ये जासुसी करणारे यंत्र आहे असे म्हणू शकतो. ही आपल्याला जासुसी करावयाची आहे मा.महापौरजी. हे जे काम करणारे कॉन्ट्रक्टर आहे तो जर व्यवस्थित काम करीत आहे किंवा नाही. ही जर व्यवस्था चांगल्या पध्दतीने कार्यान्वित केली तर आपल्याला नगरसेवकांच्या तक्रारी सहजरित्या प्राप्त होतील. नागरिकांच्या तक्रारी सहजरित्या प्राप्त होतील. त्याच्यावर जर दंडात्मक रक्कम जर आकारली तर तो हिंमत करणार नाही. मा.महापौरजी, जासुसी करणारे यंत्र हाताळण्यासाठी व्यवस्था नाही आहे काय? त्या एक्सेस मा.महापौरजी आपल्या कार्यालयात आहे. त्याचा एक्सेस स्मार्ट सिटी कार्यालयात आहे तर ते कोण हाताळून राहिले मा.महापौरजी. ४० लाख रुपये आपण जे वसुल केले ते वर्षभरात त्यांच्या किती रुटवर, किती दिवस गाडया गेल्या नाहीत याची सुध्दा मॉनेटरींग झाली पाहिजे. |

| |
|---|
| उपायुक्त (श्री.राजेश भगत):- मा.महापौरजी, स्मार्ट सिटी अंतर्गत दोन कर्मचा-यांची आपण नियुक्ती केली आहे. त्यांच्या माध्यमातून जीपीएस सिस्टीमवर लक्ष ठेवण्यात येते. गाडयाच्या ट्रॅकींगवर सुध्दा लक्ष ठेवण्यात येते. |
| श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, एखाद्या रुटवर गाडी गेली नाही तर त्याच्यावर दंडाची रक्कम आपण किती आकारतो. मायक्रो मॅप तयार झालेला आहे त्यासोबत आपण्ला रुट मॅप सुध्दा तयार झालेला आहे.जर एखादी गाडी त्या रुटवर गेली नाही तर आणि त्या गाडीची क्षमता जर ५०घरे असेल तर ५० घरातून कचरा उचलला जात नसेल तर एका दिवसाचा दंड आपल्या नियमाप्रमाणे किती आकारला पाहिजे. |
| अति.आयुक्त(श्री.निपाणे):-मा.महापौरजी, दोन्ही कंपन्यासोबत करारनामा केलेला आहे.त्याच्या शेडयुड १२ मध्ये दंडात्मक कार्यवाहया कशा कशा करायच्या त्याचे डिटेल्स् दिलेले आहे त्या प्रमाणे करण्यात येते. मा.सदस्यांनी जो दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या अनुषंगाने उपायुक्तांनी सांगितले की जो दंड ४० लक्ष रुपये आकारला आहे त्याचे डिटेल्स विवरण जर त्यांना पाहिजे असेल तर त्यांना आपण उपलब्ध करुन देवू. |
| श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, एग्रीमेंट प्रमाणे किती असला पाहिजे ते सांगितले पाहिजे. जे उत्तर दिले आहे हे घोळ घालणारे उत्तर आहे. काही तरी विचित्र पध्दतीने वेळ मारुन नेण्यासाठी उत्तर दिले आहे. माझा साधा प्रश्न आहे. या करारनाम्याची प्रत काढा आणि या करारनाम्यानुसार एका रुटवर जर त्या दिवशी गाडी जर गेली नसेल तर करारनाम्यानुसार त्या कंपनीवर किती दंड आकारावा लागतो तसे सांगावे. |
| महापौर:- कृपया प्रशासनाने उत्तर दयावे. |
| अति.आयुक्त(श्री.निपाणे):-मा.महापौरजी, एखादी गाडी त्या रुटवर गेली नसेल तर पर डे २०० रुपये प्रती गाडी दंडाची प्रोव्हीजन आहे त्या प्रमाणे वसुल करीत असतो. |
| श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, पर डे पर रुट २०० हे कमी आहेत. हे २०० रुपये कुणी निर्धारित केले आहे त्याचे ॲनालॅसीस काय आहे? त्याचा आधार काय आहे? आणि त्यांना कचरा कलेक्शनचे किती पैसे देतो. |
| उपायुक्त(श्री.राजेश भगत):- मा.महापौरजी, करारनाम्याच्या पेज नंबर १६१ वर दिलेले आहे. |
| अति.आयुक्त(श्री.निपाणे):-मा.महापौरजी, एगी, बीव्हीजीचे पेज नंबर वेगवेगळे असू शकतात परंतु शेडयुल्ड १२ मध्ये पाईंट नंबर ११ मध्ये दिलेले आहे की व्हेयीकल गेले नाही तर कसा दंड आकारावयाचा. तसेच शेडयुल्ड १२ मध्येच इतर दंडाचे पुर्ण डिटेल्स दिले आहे व इतर दंडाचे की कसे कसे आकारायचे ते १ ते १८ प्रमाणे दिलेले आहे. त्या प्रमाणे झोन लेव्हलवर दंड करतात आणि त्यानंतर इकडे पाठवितात. |
| श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, शेडयुल्ड १२ मध्ये १७ प्रकारचे दंड वसुल करण्याचे यामध्ये नमुद आहे. त्यांनी २०० रुपये पर व्हेयीकल म्हटले आहे ते कोणत्या नंबरमध्ये आहे. १७ पैकी हा कुठल्या क्रमांकामध्ये आहे. मला यामध्ये कुठेही २०० रुपये दिसत नाही. या दंडाची रक्कम आपण जीपीएस सिस्टीम लावून त्यांच्यावर जासुसी करावयाची आहे परंतु जासुसी ज्या पध्दतीने करावयास पाहिजे त्या पध्दतीने करीत नसल्यामुळे त्यामुळे अशा पध्दतीचे फ्री हॅन्ड त्या कंपनीला आपण मोकळीक दिली आहे. दुसरा प्रश्न |

होता. झोन स्तरावर मुख्य स्वच्छता अधिकारी व सॅनीटरी इन्स्पेक्टर व कंपनीच्या झोन ऑफीसर यांच्यामार्फत मिटींगा घेवून नियमितपणे ट्रेनिंग प्रोग्राम आणि वर्कशॉप घेण्यात येतात. यामध्ये मला कोणत्याही प्रकारचे डिटेल्स् दिलेले नाही. अशा किती प्रकारचे किती ट्रेनिंग प्रोग्राम आणि वर्कशॉप आपण घेतलेले आहे. त्याप्रमाणे करणे अपेक्षित होते परंतु त्याचीही माहिती मा.महापौरजी मला मिळालेली नाही. दुसरे, मायक्रोप्लॉन तयार झालेला आहे त्याची माहिती मी मागितलेली होती. उत्तरामध्ये दिलेले आहे की मायक्रो प्लॉन तयार करण्यात आलेला आहे. त्याचा तपशील मला उपलब्ध करुन दिलेला नाही. मा. महापौरजी यामध्ये दिलेले आहे कि(वाचले) डीपीआर तयार करण्यात आला त्याची प्रत सुध्दा मला उपलब्ध करुन दिलेली नाही. मा.महापौरजी, करारनाम्याप्रमाणे आपल्याला इन्डीपेन्डन्ट इंजिनिअर नेमावयाचा होता. या दोन्ही कंपन्यांच्या कामावर मॉनीटरींग करण्याची जबाबदारी त्याच्यावर राहणार होती. करारनाम्याप्रमाणे महानगरपालिकेला इन्डीपेन्डन्ट इंजिनिअर नेमावयाचा होता मात्र उत्तरामध्ये असे दिले आहे की मनपाने करारनामाप्रमाणे वेगवेगळया इंजिनिअर्स नेमले आहेत. कन्सर्न डिपार्टमेंटमार्फत मॉनेटरींग केली जात आहे. आता कन्सर्न डिपार्टमेंट मधल्या कुठल्या गोष्टीमार्फत मॉनेटरींगची व्यवस्था होत आहे. कोणती जबाबदारी निश्चिती झाली आली या ठिकाणी काही दिसत नाही. मा.महापौरजी, साधारणत: दीड वर्ष झाले महानगरपालिकेमध्ये या दोन्ही कंपन्यामार्फत या नागपूर शहरामध्ये कचरा संकलन करण्यात येत आहे. मा.महापौरजी, आतापर्यंतस्टेअरिंगकमेटीची एक बैठक झाली आहे. तीही फेब्रुवारी २०२० ला झाली आहे. याच्या आधी आणि त्याच्यानंतर झाली नाही. या स्टेअरिंगकमेटीला नागरिकांच्या, नगरसेवकांच्या आणि झोन अधिका-याच्या माध्यमातून ज्या ज्या तक्रारी येतात त्या तक्रारीचे निरासरण या कमेटीच्या माध्यमातून होणे अपेक्षित आहे. मात्र दिनांक १७.०२.२०२१ ला प्राथमिक स्वरुपाची बैठक झालेली आहे त्यानंतर कोणतीही बैठक झालेली नाही आणि कोणत्याही प्रकारचे मॉनेटरींग झालेले नाही. ऑपरेटरला स्टेअरिंगकमेटीला मंथली रिपोर्ट सादर केला आहे काय? त्याची प्रत सादर करावी, अहवाल सादर करतांना एक मंथली रिपोर्ट त्या दोन्ही कंपनीच्या माध्यमातून द्यावयाचा आहे. एकही मंथली रिपोर्ट नाही. या ठिकाणी मला उत्तरामध्ये मिळालेले नाही. मा.महापौरजी, मनपाने आतापर्यंत प्रोजेक्ट असेट ॲन्ड प्रोजेक्ट मॅनपावर चे हेल्थ आणि सेफ्टीच्या संदर्भात प्रत्येक महिन्यात करणे आवश्यक आहे, ते केलेले आहे काय? असल्यास त्याचा अहवाल देण्यात यावा. एजी व बीव्हीजी या दोन्ही कंपन्या रजिस्टर्ड असल्यामुळे हेल्थ आणि सेफ्टी करणे बंधनकारक आहे. मा.महापौरजी, आपल्या करारनाम्यामध्ये काय आहे तर हेल्थ आणि सेफ्टी ऑडीट कित्येक महिन्यात करणे आवश्यक आहे तर हे हेल्थ आणि सेफ्टीऑडीट कोण करणार आहे तर ऑपरेटर स्व:त करणार आहे की महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रशासन करणार आहे याबाबत कोणतीही स्पष्टीकरण या उत्तरामध्ये दिलेले नाही. त्यामुळे हे उत्तर सुध्दा वेळकाढूपणाचे आहे. दीड वर्ष झालेले आहे, एकही ऑडीट रिपोर्ट सुध्दा प्रत्येक महिन्यात दिलेला नाही हे मी आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो. ऑपरेटर कंपनीने त्रैमासिक बॅलन्सशीट स्टेटमेंट प्राफीट ॲन्ड लॉस अकाऊन्ट स्टेटमेंट, कॅश फ्लो स्टेटमेंट या ठिकाणी मला दिलेले नाही. एक सिंगल प्राफीट अन्ड लॉस स्टेटमेंट दिलेले आहे. मा.महापौरजी, एक प्रश्न असा होता, डाटा कंट्रोल आणि पार्किंग शेड तसाच एक प्रश्न होता, कंपनीच्या कामगारांसाठी

| |
|---|
| बॉयोमेट्रीक अटेन्डन्स सिस्टिम झोन स्तरावर लावलेले आहे काय? मा.महापौरजी, कोव्हीडच्या काळामध्ये कामगाराची मोठया प्रमाणात कपात झालेली आहे. नवीन कामगारांची भरती होवून राहिलेली आहे. जुने कामगार असतांना त्यांना कोणतेही कारण न देता अगदी थातून मातून कारण देवून कामावरुन करण्याचे तक्रारी अनेक नगरसेवकांच्या माध्यमातून आणि अनेक लोकांच्या माध्यमातून तक्रारी आलेल्या आहेत. जर त्या ठिकाणी बॉयमेट्रीक सिस्टीम जर आहे तर त्यामध्ये निश्चित होईल की किती कामगार कामावरुन कमी झाले आहे. ज्या दिवशी हा कॉन्ट्रक महानगरपालिकेमध्ये आला त्या दिवशी किती कामगार कामावर होते, किती कामगार कमी झाले आणि कुठल्या नवीन कामगारांना भरती करुन घेण्यात आलेले आहे. त्या बॉयमेट्रीक सिस्टीममुळे निश्चित लक्षात आले असते. बीव्हीजी कंपनीने दीड वर्षापासून बॉयमेट्रीक सिस्टीम लावलेलीच नाही. उत्तरामध्ये दिलेले आहे. बीव्हीजी कंपनीने बॉयोमेट्रीक अटेन्डन्स सिस्टीम लावलेला नसुन लावण्याबाबत प्रक्रिया सुरु आहे. |
| महापौरः- प्रशासनाने उत्तर दयावे. |
| उपायुक्त(श्री.राजेश भगत):- मा.महापौरजी, बॉयोमेट्रीक अटेन्डन्स सिस्टीम लावलेली होती परंतु कोरोना काळामध्ये ती बंद करण्यात आली होती. ती आता बंद आहे. |
| श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, एजी मध्ये चालू आहे असे म्हटले आहे. बीव्हीजीमध्ये बॉयोमेट्रीक अटेन्डन्स सिस्टीम लावलेला नसुन लावण्याबाबत प्रक्रिया सुरु आहे. असे उत्तरामध्ये म्हटले आहे आणि आता उत्तरामध्ये आपण म्हटले की लावलेले होते कोरोना काळामध्ये बंद केले आहे तर नेमके काय आहे ते आपण स्पष्ट करावे. |
| उपायुक्त(श्री.राजेश भगत):- सन्माननीय सदस्य महोदय, बीव्हीजी मध्ये बॉयोमेट्रीक अटेन्डन्स सिस्टीम लावलेली होती परंतु कोरोना काळामध्ये ती बंद करण्यात आली होती. |
| श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, माझा १६ नंबरचा प्रश्न आहे त्याप्रमाणे डिटेल जॉब ॲनालॅसीस ॲन्ड रिस्क् असेसमेंट स्टडीज कंडक्ट फॉर प्रोव्हायडींग अप्रोप्रीएट पीपीईएस पर्सनल प्रोटेक्टीव्ह इक्वीमेंट तयार केलेले आहे असे उत्तर दिले आहे परंतु असे काहीही तयार केलेले नाही. माझा १६ नंबरचा प्रश्न आहे त्यामध्ये काय ट्रॅकल केले आहे. |
| श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, मला गुडधेजी यांच्या मुद्दयावर बोलण्याची परवानगी दयावी. मा.महापौरजी, ज्यावेळी एग्रीमेंट सभागृहात आले होते त्यावेळी अनेक नगरसेवकांनी काही सुचना दिल्या होत्या. आपण सुध्दा मा.सदस्य होते आणि आपणही काही सुचना दिल्या होत्या. मा.महापौरजी, त्यावेळेस प्रशासनात आयुक्त अभिषेक बांगर होते. कोणता एक प्लॉन देण्याचा कार्यक्रम होता. किती कर्मचारी असले पाहिजे, ते कुठे असले पाहिजे. परंतु असे कोणतेही काम या विषयात झालेले नाही. त्यामुळे याची एक चौकशी ऑलरेडी आपण लावलेली आहे. माझी आपल्याला विनंती आहे. या चौकशी समितीपुढे ज्या मा.सदस्यांना जायचे आहे. मला सुध्दा जायचे आहे. त्यांना या चौकशी समितीपुढे बोलाविले पाहिजे अशी याप्रश्नाच्या माध्यमातून आपल्याला विनंती आहे. |
| श्री.प्रफुल्ल गुडधे:- मा.महापौरजी, मा.दटके साहेबांनी जो मुद्दा या विषयाच्या अनुषंगाने ठेवलेला आहे |

| |
|---|
| तो अगदी बरोबर आहे. या विषयाच्या संदर्भात चौकशी समिती स्थापन झालेली आहे. या प्रश्नाच्या सुरुवातीला सांगितले की जे जे प्रश्न माझ्या मनात आले, ज्या अडचणी आल्या त्या संदर्भात मार्च महिन्यामध्ये मी पत्र दिले होते. प्रशासनाकडून माझ्या प्रश्नाची दखल घेतली गेली नाही. कोणतेही उत्तर मला दिले नाही म्हणून हा प्रश्न मला उपस्थित करावा लागला. मात्र या प्रश्नासोबतचा आपण मा. सत्तापक्ष नेते श्री. अविनाश ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती स्थापन केली. या महिन्याच्या शेवटी या प्रश्नाच्या अंमलबजावणी संदर्भात प्रशासनाने काय कार्यवाही केली. या संदर्भात ज्या काही तक्रारी आहेत त्या जाणून घेण्यासाठी आपण चौकशी समिती गठीत केली. अनेक मा.सदस्यांनी आपले मत या समितीसमोर मांडलेले आहे. या समितीचा अहवाल ज्यावेळी येईल त्यावेळी निश्चितपणाने त्याचे वाचन झाल्यानंतर या विषयावर चर्चा करु शकतो. प्रशासन अनेक नगरसेवकांच्या पत्राचे उत्तर देत नाही. प्रशासनाला नियमाअंतर्गत प्रश्न विचारला तर त्या विषयावर गोलगोल उत्तर दिले जाते. प्रत्येक वेळी सभागृहाचा वेळ वाया घालविला जातो. अशा प्रकारे गोल गोल फिरविणारे आणि सभागृहाची दिशाभूल करणारे उत्तर प्रशासन या सभागृहात देवून राहिले हे बरोबर नाही. मा.महापौरजी. एखाद्या खाजगी कंपनीला कॉन्ट्रक दिल्यानंतर त्याची मॉनेटरींग करण्याची जबाबदारी सर्वश्री प्रशासनाची आहे. मग प्रशासन त्या संदर्भात कां न्युट्रल राहते. त्या कंपनीच्या संदर्भात कां न्युट्रल राहते. त्या कंपनीच्या संदर्भात मॉनेटरींग सिस्टीम कां उभी करु शकत नाही आणि करारनाम्यानुसार ते काम करणे गरजेचे आहे. बरेच वेळा कां होते, महानगरपालिकेच्या करारनाम्यात अशा गोष्टी अंतर्भुत केल्या जातात की तो करारनामा महानगरपालिकेच्या विरोधात जातो. या प्रायव्हेट कंपनीच्या बाबतीत करारनाम्यानुसार अंमलबजावणी जर केली, त्यांना पेनॉल्टी लावणारी व्यवस्था जर केली, १७-१८प्रकारची पेनॉल्टी आहे. किती पेनॉल्टी लावली परंतु यांच्याकडे डाटा नाही. फक्त ४० लाख रुपये पेनॉल्टी लावली. जासुसी प्रणाली लावली तर त्या पध्दतीने प्रशासनाने जासुसी करायला पाहिजे होती परंतु ते प्रशासन करीत नाही. महापौर कार्यालयात एक्सेस आहे, ती यंत्रणा लावलेली आहे त्या ठिकाणी एक-दोन अधिकारी नेमुन तेथून जासुसी केली पाहिजे मा.महापौरजी. टेक्नॉलॉजी दिवसेदिवस प्रगत होत आहे आणि महानगरपालिका त्या प्रणालीप्रमाणे कार्य करीत नसेल तर उचित मार्गदर्शन त्या टेक्नॉलॉजीच्या दृष्टीने घेण्याची आवश्यकता आहे. अनेक लोक एक्सपर्ट आहेत आता टेक्नॉलॉजी इतकी वाढली आहे की आपण खुप चांगल्या पध्दतीने जासुसी करु शकतो. ही जासुसी करण्याची यंत्रणा महानगरपालिकेत सुचारु पध्दतीने त्या कंपन्यांना करण्याकरिता निर्णय केला पाहिजे परंतु ते न करता आपण त्या कंपन्यांना सुट देत आहे. या पध्दतीने त्यांच्याकडून काम करायला पाहिजे ते आपण करुन राहिलो नाही म्हणून या पुढचा अहवाल मा.सत्तापक्ष नेते यांच्या समितीचा अहवाल येईल त्या अहवालासोबत मी विचारलेल्या अधिकच्या प्रश्नाचे सुध्दा उत्तर पुढच्या सभेत प्रशासनाने दिले पाहिजे. डीपीआर सुध्दा पुरविण्यात आलेला नाही. जी पेनॉल्टी लावलेली आहे ४० लक्ष रुपयाची त्याचे डिटेल्स आहेत त्याचा संपुर्ण तपशील त्या समितीचा अहवालासोबत प्रशासनाने दयावे अशी आपल्याला विनंती करतो. |
| महापौरः- मा.सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे इन्होने गंभीर विषय पर सभागृह का लक्ष केंद्रीत किया है, |

प्रशासन द्वारा दिये गेय उत्तर मे यह बात नमुद है कि, इसका असेस महापौर कार्यालय मे भी दिया गया है, कुछ दिन पूर्व महापौर कार्यालय मे यह असेस उपलब्ध कराकर दिया गया है, और प्रशासन से एक व्यक्ती उसकी मॉनिटरींग करने के लिये हमने मांगा है वह व्यक्ती मिलते बरोबर रेग्युलर इसपर मॉनिटरींग महापौर कार्यालय के माध्यम से होंगी ऐसा मैं विश्वास दिलाता हूँ। लेकिन प्रथमदृष्टया वहा असेस मिलने के बाद मे जो बात ध्यान मे आयी, श्री गुडधेजी ने जो विषय उठाया है इसमे अनेक सच्चाईयॉ उसमे प्रलक्षीत होती है, प्रशासन कोयह स्पष्ट निर्देश दिये जाते है कि, महापौर कार्यालय मे असेस मिलने से पूर्व इसपर नियंत्रण रखनेवाले हमारे जो कर्मचारी थे, वह सक्षम है क्या? इस बारे मे भी जानकारी श्री. अविनाशजी ठाकरे इनकी अध्यक्षता मे जो चौकशी समिती बनी है उसके समक्ष प्रशासन के अधिकारी दे, ऐसे निर्देश दिये जाते है, व्यक्तिगत तौर पर जब महापौर कार्यालय से यह प्रश्न पुछा गया कि, इसपर मॉनिटरींग करनेवाला व्यक्ती कौन है, और उसको ऑपरेट कौन करता है, तो दुर्भाग्य के साथ कहना पडता है कि, संबंधित व्यक्ती जिसको यह जिम्मेदारी दी गयी है, वह परिपक्व नही है उसको इस सिस्टीम की ही पुरी जानकारी नही है, इसके बाद संबंधित दोनो कंपनी के व्यक्तीयो को बुलाकर के सिस्टीम की जानकारी नही पडी। यह स्थिती यथार्थ मे है, मै इस प्रश्न के माध्यम से एक सूचना भी करना चाहुंगा कि, बिच मे एक सादरीकरण हमने देखा था, उस सादरीकरण मे प्रत्येक घर पर बारकोड लगाकर के उनका बील जनरेट होना चाहिये, इसप्रकार का नियोजन था, अगर प्रशासन उस दृष्टीसे कार्यवाही करे तो केवल रुट का ही नही प्रत्येक घर का डेटा हमारे पास रहेगा उस दृष्टीसे नियोजन प्रशासन ने करना चाहिये, ऐसे निर्देश इस सभा के माध्यम से दिये जाते है। साथ ही साथ मे यह जो मॉनिटरींग सिस्टीम है, इस मॉनेटरिंग सिस्टीम मे हम जो दंड आकार रहे है, यह हम मॅन्युअली आकार रहे है, इसमे हम आर्टीफिशियल इंटेलिजन्स का उपयोग करके उनकी होनेवाली त्रुटी पर तुरंत सिस्टीम के माध्यम से ही दंड आकार लिया जाये इसप्रकार की यंत्रणा को सक्षमीकरण करते वक्त अगर हम लागु करेगे तो सारे के सारे प्रश्नो के उत्तर उस यंत्रणा के माध्यम से ही दिये जा सकते है। इसलिये प्रशासन उस दृष्टीसे भी आगे कदम उठाये, इस प्रकार के निर्देश दिये जाते है। यह सारे के सारे प्रश्न जो श्री. प्रफुल्ल गुडधेजी ने पुछे थे, इसके संपुर्ण उत्तर श्री. अविनाशजी ठाकरे, मा.सत्तापक्ष नेते इनके नेतृत्व मे जो चौकशी समिती बनी है, उसके समक्ष प्रशासन दे, और मा.सदस्य अगर कोई प्रश्न पुछते है तो उनको संपुर्ण जानकारी हमेशा दी जाये, इस प्रकार के निर्देश प्रशासन को दिये जाते है।

**प्रश्न क्र. २५७**:-नागपूर शहरातील अंबाझरी उद्याना लगत असलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन संदर्भात प्रश्न

श्री.तानाजी वनवे:- मा. महापौरजी, मला या प्रश्नाचे जे उत्तर मिळाले आहे ते समाधानकारक नाही.

महापौर:- प्रशासनाने उत्तराचे वाचन करावे.

कार्यकारी अभियंता(श्री.देशमुख):- मा.महापौरजी, मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याचे उत्तर असे दिलेले आहे.(वाचले) याच्यामध्ये महानगरपालिकेचा जो ६ऑक्टोंबर २०१६ जो ठराव झाला हाता. ठराव क्र. ३३५ त्यानुसार त्या जागेचा विकास करण्यासाठी शासनाचे २१ जुलै २०१७ चे परिपत्रक होते त्यानुसार ती जागा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना हस्तांतरीत करावयाची होती ती जागा आपण

| |
|---|
| ३० जानेवारी २०१८ ला तहसीलदार, नागपूर शहर यांना आपण हस्तांतरीत केली. ती शासकीय जागा होती. त्यानंतर सबब ताबा आपण तहसीलदार, नागपूर शहर यांना दिलेला आहे. याबाबतची माहिती सदर सभागृहात २६ फेब्रुवारी २०१९ ला ठराव क्र. ३६१ नुसार ही बाब निदर्शनास आणून दिलेली आहे. त्यामुळे त्या जागेचा ताबा ३० जानेवारी २०१८ लाच तहसीलदार, नागपूर शहर यांना दिलेला आहे. |
| श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, माझे म्हणणे असे आहे की त्या भवनाच्या संदर्भात शासनाला जे पत्र पाठविले आहे ते सगळे पत्र मला मिळाली आहेत आणि मी त्याचे वाचन केले आहे. मुख्य प्रश्न हा आहे की ते भवन कुणी पाडले त्याची माहिती मला मिळाली पाहिजे. |
| महापौर:- प्रशासनाकडे उत्तर असेल तर ते त्यांनी दयावे. |
| अति.आयुक्त(श्री.निपाणे):-मा.महापौरजी, सदर जागा ज्यावेळी शासन निर्णय २१ जुलै चा चालू शासननिर्णय २०१७ होता त्या शासन निर्णयात स्पष्ट होते. ही जागा महाराष्ट्र शासनाला परत करावयाची आहे. ही जागा महाराष्ट्र शासनाला परत केल्या नंतर ती जागा महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ दिली. त्या नंतर महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्यात निर्णय होवून काय झाले याची माहिती आपल्याकडे नाही. आपल्याला एवढे माहीत आहे की ती जागा महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळला विकसित करण्याकरिता दिली. |
| श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, एखादी जागा आपण लीज वर दिली आणि एखादे भवन आपण लीजवर वापरण्यासाठी दिले असेल तर ते तोडण्याचा अधिकार नाही. |
| महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. |
| अति.आयुक्त(श्री.निपाणे):-मा.महापौरजी, ताबा पावती आहे. ज्या दिवशी जी महानगरपालिकेकडून यांच्याकडून उक्त जमीन बांधकामासह कोणताही मोबदला न घेता महाराष्ट्र जमीन महसुल शासकीय जमीनीची विल्हेवाट १९७१ च्या तरतूदीप्रमाणे ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत ३०.०१.१८ रोजी परत केली आहे त्यावर असलेली जागा त्यावर असलेले सर्व बांधकाम सह, मुळ मुद्दा असा आहे की ती जागा कधीही महानगरपालिकेच्या मालकीची नव्हती. ती जागा वापराकरिता दिलेली होती ती जागा आपल्याकडून शासनाने परत घेतली ती रितसर पध्दत वापरुन आणि ती आपल्याकडून घेवून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ विकसित करण्याकरिता दिली. |
| श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन तोडण्याचा अधिकार पर्यटन विभागाला आहे काय? तो मुद्दा नाही आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या वेळेला दिक्षा घेतली त्या स्मृतीप्रित्यर्थ त्या जागेवर भवन बनविण्यात आले होते. याच्यामुळे माझी मागणी आहे की याच्याशी लोकांच्या भावना जुळलेल्या आहेत. भावनांशी खेळ करण्याचा जर कुणी काम केले असेल तर त्याच्यावर आपण कार्यवाही करुन त्याच्यावर तत्काल एफआयआर दाखल करावा. नागपूर नगरीतील लोकांच्या परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भावना जुळलेल्या आहेत त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हे भवन बांधण्यात आले होते. ती जागा कुणाची होती, कुणी वापरली, कुणाच्या मालकीची होती हा महत्वाचा मुद्दा नाही. हे भवन कां तोडण्यात आले हा महत्वाचा मुद्दा आहे. |

| |
|---|
| महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे की त्यांच्यावर कार्यवाही करण्यासाठी सक्षम प्राधिकरण कोण आहे. |
| अति.आयुक्त(श्री.निपाणे):-मा.महापौरजी, ती जागा महानगरपालिकेच्या मालकीची नव्हतीच फक्त ती वापरायला होती. आज ती पण स्थिती नाही आहे. आपण पुर्णपणे जी जागा शासनाला परत केली आहे. एमटीडीसीला विकसित करण्यासाठी याची पुर्ण कार्यवाही शासन स्तरावर झालेली आहे. |
| श्री.तानाजी वनवे:-मा.महापौरजी, कोणत्या अधिकाराने आदेश दिले आणि कोणत्या अधिका-याने ते भवन तोडण्याचे आदेश दिले यासाठी एक चौकशी समिती नियुक्त करावी. या ठिकाणी हे भवन तोडल्या गेले त्या संबंधित चौकशी समिती नियुक्त करावी आणि जे दोषी अधिकारी असतील त्यांच्यावर एफआयआर दाखल करावा अशी मी मागणी करतो. |
| अति.आयुक्त(श्री.निपाणे):-मा.महापौरजी, मी या ठिकाणी सांगू इच्छितो, या जागेचे विकास प्राधिकरण म्हणून एमटीडीसीला दिलेले आहे आणि नियोजन प्राधिकरण म्हणून महानगरपालिका नसुन एनआयटी आहे. |
| श्री.जितेंद्र घोडेस्वार:-मा.महापौरजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नागपूरला दिक्षाभुमी समारंभाला आले असता म.न.पा.महापौर व उपमहापौर हयांनी डॉ.बाबासाहेबांचा सन्मान व सत्कार केला. त्या प्रित्यर्थ म.न.पा.नी अंबाझरी उद्यान येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाचा निर्माण १९७८ ला केला, त्या ठिकाणी समाजातील विविध सांस्कृतिक कार्यक्रम, समारंभ, लग्न सुध्दा व्हायचे. तत्कालीन महापौर अटलबहाद्दूर सिंग १९९२ मध्ये म.न.पा. कर्मचा-यांची भर्ती करिता मुलाखती सुध्दा घेतलेल्या होत्या. मनपाच्या अधिपत्याखाली वर्षोनीवर्ष ही जागा होती जर एमटीडीसी पर्यटन विभागाला ही जागा दिली तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन सोबत दिले होते काय? त्या सांस्कृतिक भवनावर किती निधी खर्च झाला, सभागृहाच्या पटलावर प्रशासनाने कां ठेवला नाही. दोषीवर कार्यवाही करण्यात यावी याकरिता एक समिती गठीत करण्यात यावी. पर्यटन विभागाला जागा, २०१६ मध्ये उद्यान देत असतांना काय शर्ती व अटी होत्या, २०१९ ला कशाप्रकारे प्रस्ताव म.न.पा. सभागृहात सादर करण्यात आला त्याचे वाचन करावे. |
| महापौर:- मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार यांचे उत्तर दयावे. |
| अति.आयुक्त(श्री.निपाणे):-मा.महापौरजी, ही संपुर्ण जागा आणि त्यावरील बांधकामासह हस्तांतरीत करण्यात आली. या संपुर्ण जमीनीचे नियोजन प्राधिकरण म्हणून महानगरपालिका नसुन नागपूर सुधार प्रन्यास आहे. |
| महापौर:- मा.विरोधी पक्ष नेते श्री. तानाजी वनवे व श्री. जितेंद्रजी घोडेस्वार यांच्या प्रश्नावर जे उत्तर दिले त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या सभागृहाची अनुमती घेवुन रितसर पध्दतीने राज्य सरकारला ती जागा तेथे असलेल्या बांधकामासोबत देण्यांत आलेली आहे आणि त्यानंतर सध्यास्थितीत त्यांना काही बांधकाम करावयाचे असेल किंवा काही तोडफोड करावयाची असेल तर याच्यासाठी जी अनुमती घ्यावयाची आहे ती नियोजन प्राधिकारण म्हणुन नागपूर सुधार प्रन्यासची घ्यावयाची आहे, याबद्दल या सभागृहाच्या अधिका-यांच्या म्हणण्याप्रमाणे सभागृहानी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे आपल्याला याबाबत काही दाद मागावयाची असेल तर आपण नागपूर सुधार प्रन्यासकडे प्रयत्न करावा. |

श्री.संदीप सहारे:-मा.महापौरजी, मै कुछ विषय आपके समक्ष रखना चाहता हूँ, आप मुझे अनुमती दे। पहली यह बात है की जब मा.महापौरजी, आयुक्त साहब और अध्यक्ष महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ इनकी बैठक हुई थी २२.०४.२०१५ को और उस बैठक मे मा.प्रवीण दटके तत्कालीन महापौर, मा. आमदार कोहळेजी आणि महानगरपालिका आयुक्त मा. हर्डीकर साहेब और विविध प्रकारके अधिकारी वहा पर उपस्थित थे। और उस बैठक मे जो निर्णय हुए थे उस निर्णय का पहिला निर्णय ऐसा था की बैठकीच्या प्रारंभीच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने अंबाझरी उद्यानाच्या विकासाच्या संदर्भात प्रस्ताव सादर करावा आणि हा प्रस्ताव केंद्रीय पर्यटन मंत्रालय कडे सादर करण्यात आला असून २०१४-१५ साठी अग्रेसित करण्यात आला असून हा प्रस्तावाची किंमत १८.५२ कोटीची आहे. सदर प्रस्तावात पर्यटनाच्या सुविधेची विविध कामे, स्वच्छतागृह, वाहनतळ, वेटींग व बोटींग व्यवस्था, इत्यादी कामाचा समावेश एमटीडीसीने आराखडा तयार करावा. आयुक्त नागपूर महानगरपालिका यांनी अंबाझरी तलावाच्या परिसरातील संपुर्ण ४४ एकर जागेवर महानगरपालिकेमार्फत आराखडा तयार करण्यात आला असे त्यांनी चर्चेत सांगितले. त्या नंतरच्या बैठकीमध्ये ४ नंबर वर असे झाले, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी नमुद केले की केंद्रीय पर्यटन मंत्रालयामार्फत या कामाकरिता मोठा निधी उपलब्ध करुन देणे शक्य नसल्याने ४४ एकर जागेपैकी जवळपास १९ एकर जागेवर महानगरपालिकेने ठरविले हा महत्वाचा मुद्दा आहे मा.महापौरजी, १९ एकर क्षेत्र महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत विकसित करण्यास ९०० कोटी खर्च करेल व उर्वरित २५ एकर क्षेत्र महानगरपालिकेतर्फे विकसीत करेल. हा मुद्दा चौथ्यामध्ये होता आणि महत्वाचा मुद्दा ६ व्या नंबरचा मुद्दा आहे. व्यवस्थापकीय संचालन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी असा आराखडा दोन आठवडयात पाठवून महानगरपालिकेने यांनी महामंडळाला सादर करावा असे निर्देश दिले होते. हे सर्व करीत असतांना त्या बैठकीमध्ये असे ठरले होते की हा सर्व विकास झाल्यानंतर जे रेव्हेन्यु येईल त्याचे शेअरिंग ६० टक्के महानगरपालिकेस आणि ४० टक्के महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे कडे राहील. ही बैठक झाल्यानंतर आपल्या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये यावर चर्चा झाली आणि त्या सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा होवून ठराव क्र. ३६१ विषय क्र. २१६ मध्ये असा निर्णय झाला. या दोन्ही जागेचा विकास झाल्यानंतर प्राप्त नफ्याची वाटणी नागपूर महानगरपालिलकेस ६०टक्के व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास ४० अक्के करण्यास शासन स्तरावरील दि. २२.०४.२०१५ चे बैठकीत निश्चित झाल्याप्रमाणे उक्त जागेचे मुळ व्यवस्थापन व विकासानंतर होणारी प्राप्त नफ्याची ६० टक्के वाटणी महानगरपालिकेकडे कायम ठेवून उक्त १९ एकर क्षेत्र महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना नागपूर शहराचे मंजूर विकास आराखडयातील आरक्षण विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकासाकरिता देण्याकरिता नाहरकत पत्र देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या दोन्ही जागेच्या विकासानंतर प्राप्त नफ्याची वाटणी नागपूर महानगरपालिकेस ६० टक्के ऐवजी ७५ टक्के व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास ४० टक्के ऐवजी २५ टक्के ठेवण्यात यावी अशा प्रकारचा ठराव झाला होता. याच्यामध्ये काय झाले मा.महापौरजी की तत्कालीन महाराष्ट्र राज्याचे सरकार होते त्या राज्य सरकारने आम्हांला ते सांगितले आणि आम्ही ते सभागृहामध्ये मंजूर केले. आता यांनी जे केले ते शासनाने

| |
|---|
| आमच्यासोबत दगाबाजी केली. कारण की अंबाझरी गार्डन विकसित करण्यासाठी आम्ही महानगरपालिकेच्या माध्यमातून जनतेच्या करोडो रुपयाचा निधी अंबाझरी उद्यानावर लावला. आता मघाशीच तानाजी वनवे यांनी सांगितले की १४ ऑक्टोबर १९५६ रोजी परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिक्षाभूमीवर धम्मदिक्षा दिल्यानंतर १५ ऑक्टोंबर १९५६ रोजी महानगरपालिकेने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र देवून सत्कार केला आणि दोन महिन्यानंतर त्यांचे महापरिनिर्वाण झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आम्ही तेथे स्मारक तयार केले. ते स्मारक तयार केल्यानंतर त्या स्मारकामध्ये महानगरपालिकेच्या माध्यमातून नागपूर शहरातील विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांचे कार्यक्रम, सामुहिक विवाह या ठिकाणी आयोजन करण्यात येत होते. ते भवन नागपूर महानगरपालिकेच्या निधीतून तयार झालेले होते. तयार झाल्यानंतर कोणत्याही प्रकारचा तोडण्याचा अधिकार नव्हता. महत्वाची गोष्ट शासन निर्णय असा आहे, आताच अधिका-यांनी सांगितले, जर शासन निर्णयाची गोष्ट करुन राहिलो तर शासन निर्णयामध्ये स्पष्टपणे उल्लेख आहे आपण आधीच शासनाला पाठविले होते त्याच्यामध्ये दिलेले होते की महाराष्ट्र शासन अटीशर्तीमध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास यांना विकास व देखभाल करण्याचे प्रयोजनाकरिता वार्षिक नाममात्र रुपये १ /-रुपये या भुईभाडयाने मंजूर करण्यात आलेली सदर शासकीय जमीन किंवा तिचा कोणताही भाग ( किंवा तिच्यातील कोणतेही हितसंबंध) विक्री/ देणगी देवून/ अदलाबदल करुन/ गहाण ठेवून/ पट्टयाने देवून/ खाजगी सार्वजनिक सहभाग तत्वावर(वाचले) मा.महापौरजी, शासनाने आम्हांला अशा प्रकारचे पत्र २०१७ मध्ये दिलेले होते. आणि आम्ही महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये २०.०२.२०१९ ला झालेल्या सभेमध्ये आम्ही स्पष्ट सांगितले होते. आम्हांला ७५ टक्के हिस्सा पाहिजे. परंतु तत्कालीन शासनाने राज्य सरकारने महानगरपालिकेची दिशाभूल केली. जेव्हा हा विषय सभागृहामध्ये आला तेव्हा आम्ही सभागृहामध्ये त्याचे अभिनंदन केले. कारण की ७५ टक्के नफ्याची वाटणी महानगरपालिकेला मिळणार होती आणि त्यामुळे आम्ही या विषयाला मंजूरी दिली. झाले काय तर तत्कालीन शासनाने आमची दिशाभूल केली. आता प्रशासनाने माहिती दिली हा सर्व कारभार नागपूर सुधार प्रन्यास पाहणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन तोडण्याचा अधिकार नागपूर सुधार प्रन्यासला महानगरपालिकेने दिला काय? त्या ठिकाणी जी वृक्षसंपदा आहे जी जीववैविधता आहे त्याला तोडण्याचा अधिकार नागपूर सुधार प्रन्यासला महानगरपालिकेने दिलेला आहे काय?अशा प्रकारचा कुठला ठराव असेल तर प्रशासनाने माहिती दयावी अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो. |
| महापौर:-सन्माननीय सदस्य संदीपजीने सुरवात से लेकर अभीतक की चर्चा सभागृह के समक्ष रखी, सभागृह से जो प्रस्ताव पारीत करके राज्य सरकार को गया था, राज्य सरकार उस प्रस्ताव को निरस्त करके जा मुल प्रस्ताव था उसको राज्य सरकारने अनुमती प्रदान की, यह मुल भाव यह समक्ष जनता का है। उस जगह परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरजीने नागपूर शहर मे दिक्षा लेने के बाद स्वंय वहां गये है। अनेक कार्यक्रम मे समता दल के लोग वहां गये है। इस सारी बातों को देखते हुये उस जगह को ऐतिहासिक महत्व प्राप्त है। इस सभागृह के समस्त सदस्य की भावना देखते हुए इस सदन के माध्यम से जो एजन्सी वहां काम कर रही है इस प्रकार से विनंती करेंगे। |

| |
|---|
| श्री.संदीप सहारे:-मा.महापौरजी, शासनाने जो प्रस्ताव दिला आहे त्या अटीशर्तीमध्ये स्पष्ट उल्लेख केला आहे. कोणत्याला संस्थेला, कोणत्याही कंपनीला त्यामध्ये इन्वॉल करता येवू शकत नाही. जर त्यांनी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास दिली तर त्यांनी करायला पाहिजे होती. त्यांनी प्रस्ताव असा पाठविला होता आम्ही १८.५८ कोटी रुपये खर्च करणार आहे म्हणून ती जमीन आम्हांला ताब्यात दया. त्यांनी स्पष्ट उल्लेख केला की ही कोणत्याही संस्थेला, कोणत्याही कंपनीला बीओटी तत्वावर देता येणार नाही. म्हणून ती जागा शासनाला परत करण्याकरिता प्रस्ताव आणला होता. महानगरपालिकेची याच्यामध्ये धोकाधडी केली नाही काय?  आम्ही १०० कोटी रुपये खर्च केले आणि इतक्या वर्षापासून घाटयात राहून महानगरपालिकेचा पैसा त्याच्यामध्ये देवून राहिलो. जे उत्पन्न आपल्याला त्या उद्यानापासून मिळत होते. जसे की उदाहरण सांगतो, एप्रिल २०१७- एप्रिल २०१८ अंबाझरी उद्यान प्रवेश फी- १९.७८ लक्ष रुपये त्या उद्यानाची देखभाल आणि दुरुस्तीसाठी त्यामध्ये विद्युत बील किती आहे तर ६.३६ लक्ष रुपये सेक्युरिटीवर खर्च आम्ही २२.६५ लक्ष रुपये करीत आहे. जवळपास ५० लक्ष रुपयाच्या वरती एक वर्षात करुन राहिलो. जानेवारी २०१८- ते जुलै २०१८ मध्ये आम्हांला प्रवेश फीच्या माध्यमातून उत्पन्न मिळाले ५.७५ लक्ष रुपये, उद्यानाच्या देखभालीमध्ये १२.५७लक्ष रुपये आणि विद्युत बील होते १.८८ लक्ष रुपये तर सेक्युरिटी खर्च आम्ही भरुन राहिलो ५.१६ लक्ष रुपये आम्ही इतक्या वर्षापासून त्या उद्यानावर करोडो रुपये खर्च करुन राहिलो. आणि शासन निर्णय दिला होता आम्ही म्हाडाच्या माध्यमातून आम्ही त्याला विकसित करु हे म्हणाले होते त्यांनी असे म्हणाले नव्हते की आम्ही कोणत्याही कंपनीला भाडेतत्वावर, लीजवर २० वर्षाकरिता, ३० वर्षाकरिता देणार आहे. तर कुठलाही मालकी हक्क आपण देवू शकणार नाही. अशा प्रकारचा शासनाने निर्णय घेतला होता आणि महानगरपालिकेला पाठविला होता. तत्कालीन महापौर मा.प्रवीणजी दटके, आमदार कोहळे साहेब, परिणय फुके त्या बैठकीमध्ये होते. त्या बैठकीमध्ये ठरले होते की ६० टक्के वाटा महानगरपालिकेला आणि ४० टक्के वाटा शासनाला आणि याला महानगरपालिकेच्या सभेमध्ये मंजूर केले होते. त्यामध्ये ७५ टक्के लाभ महानगरपालिकेला मिळणार होता आणि २५ टक्के शासनाला जाणार होता अशाप्रकारचे होते आणि त्यातल्यात्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनाला तोडण्याचा कंत्राटही आम्ही केला नाही त्या ठिकाणी झाडे तोडण्याचा कंत्राटही आम्ही दिला नाही असे सर्व होवूनही त्यावेळच्या शासनाने महानगरपालिकेस धोका दिला. त्यामुळे मा.महापौरजी, आपणांस विनंती करतो जो आम्ही प्रस्ताव दिला होता. |
| ॲड धर्मपाल मेश्राम:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, संदीप सहारे नाही तर समस्त नागपूर शहरातील आंबेडकरी जनतेच्या भावनेचा आदर करुन सांगू इच्छितो परंतु संदीप सहारे ज्या गोष्टीचा उल्लेख करीत आहे तत्कालीन राज्य सरकारने महानगरपालिकेशी गद्दारी केली या मुद्दयावर मला आक्षेप आहे. |
| श्री.संदीप सहारे:-मा.महापौरजी, मा.धर्मपालजी माझ्याकडे कागद आहे मी बिनबुडाचे आरोप करीत नाही आहे. |
| महापौर:- संदीपजी त्यांना बोलू दयावे. |

अॅड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, ज्या पत्राचे वाचन मा.जेष्ठ सदस्य श्री. संदीपजी सहारे या सभागृहात करीत आहेत त्या पत्रात नेमका उल्लेख असा आहे की जर ती जागा एखाद्या संस्थेला, एखाद्या कंपनीला किंवा एखाद्या खाजगी व्यक्तीला जर दिल्यास परंतु जर ती शासन परत घेणार असेल तर त्यामध्ये कोणत्याही परवानगी कारण ती जागा शासनाच्या मालकीची आहे. दुसरा विषय असा होता, त्या जागेवर परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरस्मारक होते आणि ती जागा महानगरपालिकेने सभागृहाच्या ठरावाद्वारे राज्य शासनाला परत केली. राज्य शासनाने ती जागा आपल्या अधिकारामध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास दिली. मा.महापौरजी, मी आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो की या सर्व व्यवहाराशी महानगरपालिकेचा संबंध नाही. त्या ठिकाणी जैवविविधता आहे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक सुध्दा होते. त्या जैवविविधता उद्यानाच्या सुरक्षितेसाठी ५० लक्षापर्यंत खर्च केला आहे. आणि ती जागा राज्य शासनाच्या मागणीने आपण राज्य शासनाला परत केली त्या नंतर त्या जागेवर ५० लक्ष रुपये खर्च केले. ते ५० लक्ष रुपये कोणत्या आधारावर प्रशासनाने खर्च केले हा प्रश्न जिवंत राहतो. त्यामुळे माझी विनंती आहे, यामध्ये जी कायदेशिर बाब आहे ती आहे. परंतु महानगरपालिकेच्या निधीतून इतका पैसा इलेक्ट्रिक बीला पोटी, त्या उद्यानाच्या सुरक्षिततेच्या पोटी खर्च झाला असेल तर त्याची चौकशी झाली पाहिजे. त्यामध्ये जे कुणी अधिकारी दोषी असतील त्या अधिका-यावर पोलीस कार्यवाही करण्याची गरज मा.महापौरजी या ठिकाणी आहे. मी आपल्याला नम्र विनंती करतो, याचे कारण हा विषय पहिल्यांदा आणण्याचे काम मी केले आहे. ज्या परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृतीप्रित्यर्थ जे सभागृह होते ज्या सभागृहात संदीप सहारेजी यांच्या नेत्यांचे म्हणजे तत्कालीन पालकमंत्र्यांचे त्या ठिकाणी लग्न झाले आहे ते सभागृह यापध्दतीने डिमॉलीश करणे योग्य नाही.

श्री.संदीप सहारे:-मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, मी जे बोललो त्या विषयाला कलाटणी देण्याचे काम करीत आहे काय? यांना जे बोलायचे होते ते बोलले मग आता पालकमंत्र्यांचे लग्न झाले होते हा विषय कशाला पाहिजे. असे बोलून ते जाणीव पुर्वक विषयाला कलाटणी देत आहेत.

महापौर:- आपआपसांत चर्चा करु नका. धर्मपालजी मेश्राम यांचे वक्तव्य पुर्ण होवू दया.

अॅडधर्मपाल मेश्राम:-मा.महापौरजी, ज्या पध्दतीने जेष्ठ नगरसेवक संदीपजी सहारे मागच्या सरकारवर आरोप करतात. आता सरकार आहे, यांचे नेते पालकमंत्री आहेत. हे त्या पध्दतीच्या बैठका नागपुर सुधार प्रन्यासमध्ये लावतात. नागपुर सुधार प्रन्यासचे प्रशासन, एमटीडीसीचे प्रशासन यांना एक उत्तर देण्यास तयार नाही. यांना चौकशी करण्यास कुणी थांबविले आहे परंतु नागपूर विकास आघाडीस चौकशी लावण्यापासून परावृत्त करीत असेल आणि त्यांचा दोष महानगरपालिकेवर हे लोक लावणार असतील तर हे मा. महापौरजी अत्यंत चुकीचे आहे. माझी आपल्याला नम्र विनंती आहे, या सभागृहाची भावना, या नागपूर शहरातील लोकांची भावना अत्यंत अनन्य आहे ज्या पध्दतीने कार्यक्रम आणि ज्या पध्दतीचे कार्य एमटीडीसी करीत आहे ते अत्यंत चुकीचे आहे. मा.महापौरजी, सभागृहाच्या सर्व भावना राज्य शासनाकडे आणि एमटीडीसी कडे पोहचवल्या गेले पाहिजे. या संबंधित चौकशी झाली पाहिजे. महानगरपालिकेच्या प्रशासनाने ५० टक्के खर्च जर केला असेल तर त्याची चौकशी आणि त्या अधिका-यावर दोष ठेवायला पाहिजे अशी विनंती मी

| |
|---|
| आपल्या माध्यमातून सभागृहाला करतो आहे. |
| श्री.अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, या विषयावर चर्चा सुरु आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की या विषयावर काय मागणी आहे त्यावर चर्चा करावी आणि नंतर आपण निर्णय दयावा. |
| महापौर:-मुळ विषय मा. तानाजी वनवे आपला आहे. आपली काय मागणी आहे ते कृपया सभागृहाच्या पटलावर आणावे. |
| श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, माझी मागणी ही आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जे स्मारक होते ती जागा कुणाची आहे हा वाद नाही. जागा कुणाला दिली, किती टक्के दिली. आपण शासनाला जागा दिलेली आहे. आपण जागा दिल्यानंतर त्या ठिकाणी शासनाचा प्रोजेक्ट आला. एखादी इमारत जर त्या देशाच्या मोठया माणसाच्या नावाने असेल आणि त्या ठिकाणी त्यांच्या स्मृतीला तोडण्याचा जो प्रकार झाला तो अत्यंत घृणास्पद आहे त्याचा आम्ही निषेध करतो आणि दुसरे ज्यांनी याला तोडले असेल त्याच्यावर ताबडतोब कार्यवाही व्हावी ही आमची मुख्य मागणी आहे. |
| महापौर:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन संदर्भात सर्व मा.सदस्यांची भावना लक्षात घेता अंबाझरी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह पाडण्याचे जे कृत्य करण्यांत आले आहे, याबाबत सर्व मा.सदस्यांच्या मनामध्ये रोष आहे. या सभागृहाचे सदस्य असो किंवा नागपूर शहराचे नागरिक सगळयामध्ये याबाबत रोष आहे ही भावना शासनापर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने या विषयावर जी सर्वकष चर्चा येथे झाली आहे त्या चर्चेच्या संपुर्ण अहवाल राज्य सरकारकडे पाठविण्याचे निर्देश या सभागृहाच्या माध्यमातून देण्यांत येते. सोबतच मा.सदस्यांनी विषय मांडले कि प्रायव्हेट माणसाला ती जागा देता येते किंवा नाही, याबाबत ज्यांना आपली बाजु ठेवायची आहे ते न्यायालयीन व्यवस्था व वर्तमान सरकार या दोघांकडे जर अग्रीमेंटच्या विरोधात काही निर्णय झाला असेल तर त्याबद्दल तेथे दाद मागु शकतात. सोबतच त्या जागेवर Exhibition Centre बांधण्याचे काम सरकार करीत असेल व मा.सदस्यांची सुचना ऐकल्यानंतर ही वर्तमान सरकार काही कार्यवाही करीत नसेल तर अशा स्थितीत तेथे जे काही बांधकाम होणार आहे. त्या Exhibition Centre ला परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव देण्यांत यावे अशा प्रकारचे निर्देश या सभागृहाच्या माध्यमातुन देण्यांत येत आहे तसा तो परिसर राज्य सरकारचा झाल्यानंतर आम्हांला निर्देश देण्याचे अधिकार नाही, परंतु नागपूर शहराच्या जनतेची भावना लक्षात घेता राज्य सरकारला आम्ही या प्रकारचे निवेदन देत आहोत, सोबतच मा.सदस्य श्री.धर्मपालजी मेश्राम यांनी जो प्रश्न उचलला, तो अत्यंत गंभीर प्रश्न आहे शासनाला जागा हस्तांतरण झाल्यानंतर सुध्दा त्या जागेवर महानगरपालिकेनी खर्च केला आहे काय? या सर्व बाबतीत प्रशासनानी रितसर लेखी उत्तर महापौर कार्यालयात द्यावे आणि जर चुक झाली असेल तर त्याच्यात चुक झाली असेल तर त्याच्यात चुक कोणाची आहे, त्याची सविस्तर माहिती महापौर कार्यालयात उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश सुध्दा देण्यांत येत आहे. |
| **<u>प्रश्न क्र. २५८</u>**:-दुर्बल घटक योजनेअंतर्गत मागील सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या चार वर्षाकरिता किती निधी मनपा बजेटमध्ये उपलब्ध करण्यात आला होता. या संदर्भात प्रश्न |
| **<u>प्रश्न क्र. २६४:-</u>**सन २०१७ ते २०२१ दुर्बल घटक समिती अंतर्गत एकंदरीत मनपा अर्थसंकल्पात |

महासभेत किती राशी मंजूरी केली होती. या संदर्भात् प्रश्न

महापौर:- प्रश्न क्र. २५८ आणि प्रश्न क्र. २६४ हे एकसारखे विषय आहेत त्यामुळे मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार आणि मा.सदस्य श्री.संदीप जाधव हे या चर्चेत सहभागी होवू शकतात.

श्री.संदीप जाधव:-मा.महापौरजी, सन २०१७ ते २०२१ दुर्बल घटक समिती अंतर्गत एकंदरीत मनपा अर्थसंकल्पात महासभेत किती राशी आवंटीत केली तर ४ वर्षाची यादी दिलेली आहे त्या संदर्भात त्याचे वाचन प्रशासनाने करावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.बाराहाते(कार्यकारी अभियंता,स्लम):-मा.महापौरजी, (वाचले)

श्री.संदीप जाधव:-मा.महापौरजी, जी अखर्चित राशी आहे. सन २०१७-१८ ची सन २०१८-१९ मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे काय? माझ्या माहितीप्रमाणे ती राशी त्या वर्षी शिल्लक असते ती पुढच्या आर्थिक वर्षी समाविष्ट करण्यात येते काय?

श्री.बाराहाते(कार्यकारी अभियंता,स्लम):-मा.महापौरजी,यामध्ये शासनाचे परिपत्रक आहे ०३ जुलै १९८२ प्रमाणे प्रत्येक वर्षी संपुर्णपणे खर्च केला नाही तर त्यावर्षात खर्च न झालेला संपुर्ण निधी अगर त्याचा भाग यांची तरतुद पुढील आर्थिक वर्षी अंदाजपत्रकामध्ये त्या प्रमाणात वाढवुन करीत जावी असे आदेश आहेत.

श्री.संदीप जाधव:-मा.महापौरजी, प्रशासनाने आताच सांगितले. या आर्थिक वर्षात जर दुर्बल घटक समितीची राशी खर्च झाली नसेल तर ती येत्या आर्थिक वर्षात समाविष्ट करण्यात येते असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. माझा मुद्दा असा आहे, कोणत्या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करण्यात आली.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.बाराहाते(कार्यकारी अभियंता,स्लम):-मा.महापौरजी, परिपत्रकामध्ये नमुद केले आहे प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांचे अध्यक्ष दुर्बल घटक समिती यांचे निधी/तरतूद वाटप यावर प्राप्त अभिप्रायातुन आता बजेट मंजुर झाले आहे. सदरची मागणी आता बजेट रिवाईज करतांना करणे योग्य राहील असे कॅफो यांनी अभिप्राय दिलेला आहे.

श्री.संदीप जाधव:-मा.महापौरजी, माझ्या प्रश्नाचे उत्तर आयुक्तांनी दिलेले नाही.

महापौर:- बाराहातेजी संदीपजीचे म्हणणे असे आहे की महानगरपालिकेचा बजेट तयार करण्यात आला. त्याच्यात केलेल्या सुचनेप्रमाणे मागच्या वर्षीची शिल्लक निधीचे याच्यामध्ये नियोजन करण्यात आले, हो किंवा नाही आणि याबद्दल आपले ते उत्तर मागत आहे.

श्री.बाराहाते(कार्यकारीअभियंता,स्लम):-मा.महापौरजी,कॅफोने अभिप्राय दिल्यानंतर तशाप्रकारचे झालेले दिसत नाही.

श्री.संदीप जाधव:-मा.महापौरजी, आताच यांनी सांगितले, राज्य सरकारच्या निर्देशाप्रमाणे जे अखर्चित राशी आहे तो पुढच्या बजेटमध्ये समाविष्ट करण्यात येतो. असे असतांना यांनी आताच सांगितले की महानगरपालिकेने तशाप्रकारची प्रोव्हीजन केलेली नाही. हा दुर्बल घटक समितीद्वारे दलित समाजाच्या

| |
|---|
| वस्तीमध्ये खर्च करण्याचा प्रश्न आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले असेल आणि त्या वस्त्यामध्ये खर्च झाला नसेल तर याला जबाबदार कोण? |
| महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. |
| श्री.बाराहाते(कार्यकारी अभियंता,स्लम):-मा.महापौरजी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, उद्यान विभाग, विद्युत विभाग, ग्रंथालय व अध्ययन कक्ष,समाज विकास विभाग अधिकारी, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, म.न.पा. नागपूर यांचे प्राप्त निधी व खर्च याची संपुर्ण माहिती दिलेली आहे. |
| श्री.संदीप जाधव:-मा.महापौरजी, माझा सरळ आणि साधा प्रश्न आहे. बजेटमध्ये जी राशी ठेवलेली आहे ती किती खर्च झाली. अखर्चित राशीचा खर्च कां करण्यात आला नाही याचे उत्तरामध्ये त्याचा समावेश कां करण्यात आला नाही. प्रशासनाने असे केले तर कोणत्या कायद्या अंतर्गत आणि त्या अधिका-याची जबाबदारी होती तर त्याच्यावर कां कार्यवाही करण्यात येवू नये हा माझा प्रश्न होता. |
| महापौर:- बाराहातेजी, संदीपजीचा प्रश्न असा होता की अखर्चित राशी खर्च करण्यात आली नाही तर याचा दोष कुणावर दयायचे.हा मुळ प्रश्न आहे ते सांगा. आवाज येत नाही आहे. मा.आयुक्त महोदयांनी उत्तर दयावे. |
| निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सभागृह. सभागृहात या ठिकाणी दुर्बल घटक समितीच्या मागच्या चार वर्षाच्या राशीच्या संदर्भात मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार आणि संदीपजी जाधव यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. प्रथमदर्शनी असे दिसत आहे. त्याच्यामध्ये पैसे तसे कॅरीफॉरवर्ड झालेले दिसत नाही आहे. मात्र या माहितीमध्ये पहिल्या प्रथम डिटेल्समध्ये जाण्याची आवश्यकता आहे. महत्वाचे काय आहे आपण प्रत्येक वर्षी सभागृहाद्वारे नियमाप्रमाणे आयुक्ताद्वारे बजेट सादर करण्यात येते. नंतर स्थायी समिती द्वारे सभागृहामध्ये एक बजेट आपण सादर करतो. या बजेटमध्ये प्रत्यक्ष आपल्या उत्पन्नाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष अंमलबजावणी किती होते ते वर्षाच्या अखेरमध्ये रिवाईज बजेट सुध्दा या सभागृहामध्ये सादर करतो. यामध्ये दिलेल्या माहितीमध्ये सुरुवातीला सभागृहामध्ये स्विकारलेल्या बजेटची माहिती दिली. त्याच्या आधारे प्रत्येक वर्षी प्रत्यक्ष उत्पन्नाच्या अनुषंगाने बजेटची अंमलबजावणी होते त्यादृष्टीने बघण्याची आवश्यकता आहे. प्रथमदर्शनी त्या आकडयाच्या तुलनेमध्ये तो आकडा मोठा दिसत असला तरी मला खात्री आहे आपण दिलेले वेगवेगळे बजेट परंतु ॲक्च्युअल बजेटमध्ये ५टक्केची अंमलबजावणी करावयाची जबाबदारी जशी प्रशासनाची आहे तसेच त्या ठिकाणी प्रत्येक वर्षी आपण दुर्बल घटक समितीची नियुक्ती करतो. समिती वेळोवेळी त्या संदर्भातील नियोजन करते. एखाद्या कामाच्या तांत्रिक कारणामुळे किंवा आर्थिक कारणांमुळे अंमलबजावणीमधून शिल्लक होवू शकते कारण इतक्या मोठया प्रमाणामध्ये होण्याची संभावना नाही आहे. त्यामुळे याचा सखोल अभ्यास करण्याची आम्हांला अनुमती द्यावी.आणि दुसरे महत्वाचे म्हणजे मी दोन्ही मा.सदस्यांना या ठिकाणी सांगू इच्छितो की, आपली अनुमती मागितली होती. याच्यामध्ये अत्यंत महत्वाचे आहे मागच्या एक-दोन वर्षात कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे आपली आर्थिक परिस्थिती अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. या पार्श्वभुमीवर एका गोष्टीकडे आपण लक्ष दिले पाहिजे की या वर्षी जे बजेट मंजूर करुन घेतले त्याच्या अंमलबजावणीच्या स्टेजवर आपण आलेलो नाही. मागच्या वर्षीचे |

| |
|---|
| आपण उदाहरण घेतले तर मागच्यावर्षी दुर्बल घटक समिती कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे फार्म करण्यात आली नाही. या वर्षी ती तयार झाली आहे. दुर्बल घटक समितीने या वर्षी त्यांच्याकडे उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीचा पुर्णपणे पालन करुन नियोजन करावी अशी माझी विनंती आहे. त्यानंतर याचा सखोल अभ्यास करुन येणा-या काळामध्ये शासनाच्यानिर्देशाप्रमाणे जे काही राहिले असल्यास त्याची तरतूद करण्याचा आपण सगळे प्रयत्न करु या. या अपुर्ण माहितीसह आपण निर्णय घेतल्यास एकंदरीत सभागृहाचे जे संपुर्ण बजेट आहे त्याच्या अंमलबजावणीस अडचण निर्माण होवू शकते अशी माझी मागणी आहे. यावर्षीच्या उपलब्ध तरतूदीच्या सध्याचे कार्यरत असलेल्या समितीने कार्यवाही करावी त्यात प्रशासनाकडून संपुर्ण मदत करण्यात येईल. हे मी नम्रपणे नमुद करु इच्छितो, धन्यवाद. |
| श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, मी विचारलेला प्रश्न होता, दुर्बल घटक योजनेअंतर्गत मागील सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या चार वर्षाकरिता किती निधी मनपा बजेटमध्ये उपलब्ध करण्यात आला होता. या संदर्भातील माझा पहिला प्रश्न होता, या चार वर्षाकरिता किती निधी मा. नगरसेवकांच्या प्रस्तावित कामाकरिता खर्च करण्यात आला, किती निधी अखर्चित राहिला.दुर्बल घटक समितीमार्फत प्रत्येक वर्षी हा खर्च करावयाचा होता त्या अनुषंगाने मला उत्तर देण्यात आले. (वाचले) त्या अनुषंगाने मुख्य लेखा व वित्त अधिकारी म्हणतात की यासंदर्भात विभागाद्वारे त्या त्या वर्षी अखर्चित राहिलेल्या रक्कमेची मागणी करणे आवश्यक आहे. परंतु तेवढा खर्च कॅरीफॉरवर्ड करण्यात आलेला नाही. अखर्चित रक्कमेची मागणी विभागाने कां केली नाही. विभागाने याचे उत्तर दयावे. |
| महापौर:- मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, याबद्यल मा.आयुक्त सदनाच्या पटलावर पुढच्या सभेत माहिती ठेवणार आहे, त्यांनी त्याकरिता वेळ मागितला आहे, या सभागृहाच्या माध्यमातून त्यांना वेळ देण्यांत येत आहे, पुढच्या सभेत मा.आयुक्तांनी या विषयाच्या संदर्भात सर्व सविस्तर आंकडे सभागृहाच्या पटलावर ठेवावे, मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार यांचा प्रश्न क्रमांक २५८ पुढच्या सभागृहापर्यंत सदनाच्या पटलावर कायम ठेवण्यांत येत आहे. |
| श्री. अविनाश ठाकरे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, दुर्बल घटक समितीच्या माध्यमातून मागच्या वर्षी अखर्चित राहिलेला निधी पुढच्या वर्षी कॅरीफॉरवर्ड करण्यात येतो असा विषय मांडण्यात आला आहे. परंतु मा.महापौरजी, महानगरपालिकेचा कायद्या हे सांगतो की हा अखर्चित निधी हा दुर्बल घटक समितीपुरताच नाही तर सर्व जे कामे आहेत जी कामे मागच्या वर्षी अखर्चित राहिले आहे ते पुढच्या दोन वर्षात खर्च करण्यात यावे असे महानगरपालिकेचा कायद्या सांगतो, त्याच्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिका अधिनियम कायद्याच्या कलम १०२ चे वाचन या ठिकाणी व्हावे. |
| महापौर:- निगम सचिवांनी वाचन करावे. |
| निगम सचिव:- कलम १०२ चे वाचन केले.(वाचले) |
| श्री. अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, कलम १०२ चे वाचन झालेले आहे. कलम १०३ चे वाचन सुध्दा या ठिकाणी करण्यात यावे. |
| निगम सचिव:- कलम १०३ चे वाचन केले.(वाचले) |

| |
|---|
| श्री. अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, माझी विनंती आहे. या दोन्ही कलमाचा समावेश महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये केलेला आहे. गेल्या दोन वर्षात जो काही निधी ठेवलेला आहे आणि जो खर्च झाला नसेल तो या वर्षी खर्च करु शकतो. या संदर्भात प्रशासनाने आपले मत याठिकाणी व्यक्त करावे |
| महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. |
| श्री.जितेंद्र घोडेस्वार:-मा.महापौरजी, मी दुर्बल घटक समितीच्या अनुषंगाने बोलत आहे. शासनाने निर्धारित करुन दिलेल्या सामजिक न्यायाच्या अनुषंगाने दुर्बल घटक असलेल्या वस्त्यामध्ये जोखर्च करावयाचा आहे त्या अनुषंगाने शासनाचा जी.आर.आहे. |
| श्री. अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, मी हा विषय मांडला आहे हा दुर्बल घटक समितीचा विषय नाही तर संपुर्ण हेडचा विषय आहे. त्यामुळे प्रशासनाकडून उत्तर येवू दयावे ही विनंती आहे. |
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी(श्री.कोल्हे):-मा.महापौरजी, जरी दोन वर्षापर्यंत ती राशी अखर्चित राहिली असली तरी यामध्ये आपल्याला इंन्कमची साईड बघावी लागेल. सन २०२१ चे २७३१ कोटीचे बजेट होते आणि आपले उत्पन्न झाले १८९४ कोटीचे, म्हणजेच आपले बजेट ९७-९८ कोटीने मागे राहिले. आपले उत्पन्न जर कमी असेल तर ती राशी कॅरीफॉरवर्ड करणे शक्य होणार नाही. जर बजेट पेक्षा उत्पन्न जास्त असेल तर कॅरीफॉरवर्ड करणे शक्य होईल. |
| श्री. अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, प्रश्न काय विचारला आणि उत्तर काय देत आहेत. |
| श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, शासनाचा जो जी.आर.आहे त्याचे वाचन करण्यात यावे. |
| महापौर:-मा. सत्तापक्ष नेते श्री.अविनाश ठाकरे आणि मा.जितेंद्र घोडेस्वार यांनी प्रश्न विचारला आणि त्याचे उत्तर मा.वित्त अधिकारी यांनी दिल्याप्रमाणे ते समाधानकारक नसल्यामुळे त्यांच्या पेक्षा वरिष्ठ अधिका-यांनी त्याचे उत्तर दयावे. |
| श्री.निपाणे(अति.आयुक्त):- मा.महापौरजी, कलम १०२ मध्ये असे म्हणतो (वाचले)बजेट ग्रान्ट हा स्पेसिफिक शब्द आहे त्यासाठी आणि आपल्याला जे अनुदान मिळते ते जर त्या वर्षी खर्च करु शकलो नाही तर ते आपल्याला पुढच्या वर्षीच्या अर्थसंकल्पात किंवा पुढच्या वर्षी खर्च करता येतो असा त्याचा सर्वसाधारण अर्थ होतो. |
| श्री. अविनाश ठाकरे:- मा.महापौरजी, या विषयावर एकच सांगावयाचे आहे की मा. आयुक्तांनी ज्या वेळेस अर्थसंकल्प सादर केला आणि स्थायी समिती अध्यक्षांनी अर्थसंकल्प सादर केला. मा.आयुक्तांनी स्थायी समितीचे अर्थसंकल्प सादर केल्यानंतर अशाप्रकारचे निवेदन केले होते की ओऍन्डएमची ग्रॅन्ट आहे त्या ग्रॅन्टच्या संदर्भात निवेदन सादर केले होते. २३८ कोटीचे अनुदान जे मार्च च्या अगोदर आलेले आहे. ते अनुदान न आल्यामुळे २०० कोटीने बजेट कमी करतो परंतु ते अनुदान मागच्या वर्षी येवून गेले आहे.ते दोन वर्षपर्यंत कॅरीफॉरवर्ड होत आहे तर मग यावर्षीच्या बजेटमध्ये कॅरीफॉरवर्ड कां झाले नाही. |
| महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. |

| |
|---|
| श्री.निपाणे(अति.आयुक्त):- मा.महापौरजी, अनुदान आले असेल तर या संदर्भात प्रशासनातर्फे ही बाब वेरीफाय करुन सेक्शन १०२ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.जितेंद्र घोडेस्वार:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, ५०५९ कोटीचा खर्च केला. एस.एसटी, व भटक्या जाती वजमाती यांना सामाजिक न्याय व संवैधानिक दृष्टया दुर्बल घटक संबोधन्यात आले आहे. दुर्बल घटक समितीमार्फत हा खर्च केल्या जातो परंतु हा अखर्चित राशी कॅरीफॉरवर्ड प्रशासनाने केली नाही. |
| महापौर:- जितेंद्रजी मा.आयुक्त महोदयांनी या बद्दल आपले अभिमत सभागृहाच्या पटलावर ठेवलेले आहे. त्यांचे म्हणणे आहे की हे जे उत्तर दिलेले आहे ते सर्वकष नाही आहे. त्यांनी वेळ मागितलेला आहे. सभागृहाच्या माध्यमातून त्यांना वेळ देण्यात येते पुढच्या सभागृहात या सर्व बाबींची सखोल आकडेवारीसहीत विस्तृत विवरण सभागृहाच्या पटलावर ठेवतील आणि आपण हा जो प्रश्न आहे तो पुढच्या सभागृहापर्यंत पटलावर कायम ठेवण्यात येत आहे. |
| श्री.विजय झलके:- मा.महापौरजी, या विषयाच्या अनुषंगाने हा विषय आहे. यावर्षीचे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती अध्यक्षांनी सादर केल्या नंतर माझ्या माहितीनुसार प्रशासनाने यातील काही हेड ७० टक्केपर्यंत उपलब्ध करुन दयावे असा निर्णय घेतल्याची मला माहिती आहे. मा.महापौरजी, एक दुसरा विषय आहे, वित्त विभागाचे परिपत्रक क्र.२०३ दि. १५.०७.२०२१ चे परिपत्रक आहे त्या परिपत्रकाच्या अनुषंगाने त्याचे एकदा वाचन व्हावे अशी विनंती आहे. |
| महापौर:- वित्त अधिका-याने वाचन करावे. |
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी(श्री.कोल्हे):- मा.महापौरजी, परिपत्रक बोलावून घेतो. |
| महापौर:- मा. घोडेस्वारजी आपला विषय सभागृहाच्या पटलावर कायम ठेवला आहे. याची जी माहिती हवी सविस्तर माहिती आयुक्तांनी पुढच्या सभागृहात ठेवतील या सुचनेसह ठेवला आहे. |
| श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, माझा एक प्रश्न होता जो अखर्चित निधी आहे त्याचे जे काम झालेले आहे ते कार्यकारी अभियंता..... |
| महापौर:- आपल्याकडे स्पेसिफिक माहिती असेल काम झालेले दाखविण्यात आलेले आहे आणि काम झालेले नाही ते कामाचे नावासकट तक्रार करावी आपण ताबडतोब कार्यवाही करु.आपण आरोप लावलेले आहे आपण आरोपाची लेखी स्वरुपात तक्रार करावी. या सदनाच्या सुचनेप्रमाणे ताबडतोब कार्यवाही करु. परिपत्रक येईल तेव्हा कॅफोसाहेब आपल्यासोबत जॉईन होतील. परिपत्रक आलेले आहे, परिपत्रकाचे वाचन करावे. |
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी(श्री.कोल्हे):- मा.महापौरजी, परिपत्रकाचे वाचन केले. |
| श्री.विजय झलके:- मा.महापौरजी, प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांनी परिपत्रकाचे वाचन केले. परिपत्रक क्र. २३० दि.१५.०७.२०२१ मध्ये विभागाच्या माध्यमातून जुने देणे(वाचले) ऐसा फॉरमेट भरके देने के बोला है। हालाकी मा.महापौरजी, बजेट मे हेड मे इतना बांधील खर्च है वो ऑलरेडी नमुद है, नये काम के लिए कितना प्रस्तावित किया है वह नमुद है फिर से ये परिपत्रक निकालने की जरुरत क्या है। |

मुख्य लेखा व वित्त अधिकारी(श्री.कोल्हे):- मा.महापौरजी, सदर पत्र हे ३१.०६.२०२१ चे आहे आणि जे परिपत्रक वाचले त्या संदर्भात काढले होते. सदर जे परिपत्रक काढले ते बजेट एक-दीड महिना वेळ लागला त्या बजेटच्या अंमलबजावणी करिता जे परिपत्रक काढले होते त्या संदर्भात काढलेले आहे.

महापौर :- बजेट इम्प्लीमेंट करीत असतांना निगम आयुक्त महोदयांनी जी नोटशिट लिहिली त्याच्या आधारावर हा विस्तृत आहे असे आपले म्हणणे आहे काय? बजेट तयार करीत असतांना स्थायी समिती अध्यक्षांनी बांधील खर्च, जुने देणे हे सर्व आकडे घेतले हे कुठुन घेतले.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी(श्री.कोल्हे):- मा.महापौरजी, संबंधित विभागाला विचारुनच घेतले असेल. प्रस्ताव येतांना त्या पर्टीक्युलर हेडमध्ये विविध नावाखाली तरतूद उपलब्ध आहे.

श्री.विजय झलके:- मा.महापौरजी, ज्यावेळी मा.स्थायी समिती अध्यक्षांचे बजेट तयार होते त्यावेळी प्रत्येक विभागाकडून माहिती मागविण्यात येत असते. सर्व विभागप्रमुखांनी बजेट तयार करीत असतांना त्या विभागाची माहिती दयावी असे लिहितात. त्यावेळी वित्त विभागाकडून सुध्दा माहिती येत असते तर ही डबल डबल माहिती मागविण्याचे कारण काय?

मुख्य लेखा व वित्त अधिकारी(श्री.कोल्हे):- मा.महापौरजी, ही माहिती यासाठी लागते. त्या पदाअंतर्गत नवीन कामे करण्यासाठी किती तरतूद उपलब्ध होवू शकते एवढेच चेक करण्यासाठी माहिती लागते.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, या पध्दतीने परिपत्रक काढून नगरसेवकांच्या विकासकामे कसे लंबे करायचे आणि कसा त्रास द्यायचा या पध्दतीने केले जाते. बजेट यांनी तयार केले, बजेटमध्ये मागचे वर्कआर्डर किती, किती फाईलचे वर्कआर्डर झाले याची माहिती नाही. मा.स्थायी समिती अध्यक्षांनी यांना माहिती मागविली तर यांनी अर्धवट माहिती दिली. मा. महापौरजी, आपला अकाऊन्ट विभागात शासनाकडून जे अधिकारी मागवितो कारण आपल्याकडे तेवढा अनुभवी अधिकारी नसतो. तो तेवढा शिक्षित नसतो. त्यामुळे आपला कॅफो १२.०४.७६ प्रमाणे महानगरपालिकेला पाहिजे आहे. आपल्याकडे अनुभव कमी असल्यामुळे शासनाकडून चांगला अनुभवी असलेला अधिकारी येतो आणि हे परमश्रध्येय कोल्हे साहेब हे याच्या आधी पण कॅफो होते. हे कॅफो असतांना आयुक्तांचे बजेट इतके चुकीचे बजेट आहे. इतक्या त्रुटया त्याच्यात आहेत तर त्याला आयुक्त जबाबदार नाहीत तर त्याला कॅफो जबाबदार आहेत.मा.स्थायी समितीने मागितलेली माहिती ती पुर्णपणे ठेवू शकत नाही. यांना दिलेली माहितीसाठी डबल डबल परिपत्रक काढावे लागते याचा अर्थ ते काम करण्यास सक्षम नाही असा संशय निर्माण होतो. यांना कडक शब्दात तंबी दयावी. नगरसेवक लोकहिताची कामे करीत असेल तर अशी चुकीचे परिपत्रक काढून नगरसेवक आणि नागपूर शहरातील नागरिकांची हेळसांड होत असेल तर त्यांना एकदा योग्य शब्दात तंबी द्यावी. आणि हे जर अकार्यक्षम असतील तर त्यांना कार्यमुक्त करुन परत त्यांच्या विभागात पाठविण्यात यावे अशी आपल्याला सभागृहाच्या माध्यमातून मा.महापौरजी आपल्यालाला विनंती करतो.

महापौर:- मा.सदस्य श्री.प्रविणजी दटके यांनी जी भावना मांडली ती अत्यंत गंभीर आहे, बजेट तयार करीत असतांना संबंधित संपुर्ण विभाग प्रमुखांकडुन माहिती गोळा करण्यांत येते, आणि जे आकडे विभाग प्रमुख देतात त्याप्रमाणे त्याचे समायोजन करण्याकरिता महानगरपालिकेच्या बजेटमध्ये नियोजन करण्यांत

येते. संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे बजेटमध्ये नियोजन करण्यांत आलेले आहे. त्यांनी जे आंकडे दिले होते त्यानुसारच करण्यांत आलेले आहे. अशा परिस्थितीत तीच बाब तीन वेळेस विचारणे योग्य नाही. मा.स्थायी समिती अध्यक्ष यांनी अर्थसंकल्पावर दिलेले भाषण मला आठवते त्यामध्ये त्यांनी नमुद केले आहे कि, जुने देणे व बांधील खर्च हे त्या विभागाचे प्रमुख खर्चाच्या सुचना प्रस्तावासोबत करेल आणि त्याचे नियोजन ते स्वत:च्या स्तरावर करतील एवढी स्पष्ट भुमिका त्यांनी ठेवलेली आहे. यापूर्वी जेवढे स्थायी समिती अध्यक्ष होते त्यांनी बांधील खर्चाकरिता वेगळे नियोजन ते स्वत:कडे ठेवत होते. या स्थायी समिती अध्यक्षांनी ही जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखांना दिलेली आहे व ते आपल्या भाषणामध्ये सुध्दा सांगितले आहे. हे सर्व असतांना सुध्दा एकच गोष्टी वारंवारं विचारण्याचे प्रयत्न करुन हा विषय प्रलंबित करण्याच्या पध्दतीचे काम लेखा व वित्त अधिकारी करीत असेल तर हे चुकीचे आहे. मी विशेषत: नमुद करु इच्छितो कि, लेखा व वित्त अधिका-यांकडे एखाद्या कर्मचा-यांच्या पगाराचे बील येते तेव्हा त्यांनी किती कर्मचा-यांच्या पगाराच्या बिलामध्ये त्रुटी काढल्या आहेत ही सर्व त्रुटी व चाचणी फक्त मा.सदस्यांच्या जनतेच्या कामासाठी असलेल्या नियोजनामध्येच का होते, ही सर्व बाब तपासली पाहिजे. लेखा व वित्त अधिका-यांना निर्देश देण्यात येते की परिपत्रकामध्ये काय पाहिजे, काय नाही पाहिजे हे ज्या दिवशी बजेट एम्प्लीमेंट झाले त्याच दिवशी तपासुन घ्यावयास पाहिजे होते, जेव्हा प्रस्ताव तयार होते तेव्हा त्याची सखोल चौकशी होवुन आपल्यपर्यंत तो प्रस्ताव येतो, आणि त्यामध्ये जे नवीन कामे आहे त्याचे नियोजन व त्याबाबत सुचना मा.सदस्य करतात, बांधील खर्चामधुन एकही सुचना आपल्याकडे येत नाही. बांधील खर्च म्हणजे जे काम झालेले आहे, ज्यांचे बील प्रलंबित आहे, जे कार्यादेश होवुन काम प्रलंबित आहे असेच काम असतात, म्णुन बांधील खर्चाच्या कामाची यादी वेगळी आहे, आणि प्रस्तावित कामाची यादी वेगळी आहे, आणि आपण प्रस्तावित कामाच्या संदर्भातील सुचना न घेता सरसकट आपल्याकडे ज्या कामाची सुचना मा.सदस्यांनी केलेली आहे, त्याचे नियोजन करण्यांत यावे, ते काम थांबविण्याच्या दृष्टीने कामचुकारपणा करण्यांत येवु नये असे निर्देश आपणांस देण्यात येते आणि यआपण जे परिपत्रक काढलेले आहे, ते परिपत्रक आपल्या दृष्टीने तर्कसंगत असले तरी ते परिपत्रक अधिका-यांच्या सुचनेपर्यंत मर्यादीत ठेवावे, असे निर्देश लेखा व वित्त अधिकारी यांना सभागृहाच्या माध्यमातुन देण्यांत येत आहे.

**प्रश्न क्र. २५९**:- जिम ग्रीन देखभाल व दुरुस्ती संदर्भात प्रश्न

श्रीमती वैशाली नारनवरे:- मा. महापौरजी, माझा प्रश्न असा आहे की महानगरपालिकेच्या जागेवर ग्रीन जीम जे लावण्यात आले आहे. माझ्या प्रभागात जे ग्रीन जीम लावण्यात आले आहे. ज्या सायकली लावण्यात येतात त्या सायकलीला पायडल नाही, त्या सायकलीला सीट नाही. जेव्हा कंत्राटादाराला हे काम दिले आहे तर प्रशासनाने त्या कंत्राटदाराच्या कामावर देखरेख ठेवली पाहिजे. ही जबाबदारी आहे कारण कंत्राटदार जो असतो तो प्रत्यक्ष येवून नगरसेवकांना भेटत नाही. कोणीही कंत्राटदार येवून भेटत असतील असे मला वाटत नाही. झोन निहाय जे कंत्राटदार नेमले आहे ही त्यांची जिम्मेदारी बनते की त्यांनी जबाबदारीने नगरसेवकांना भेटले पाहिजे. जी परिस्थिती माझ्या प्रभागाची आहे तीच इतरही प्रभागाची असू शकते. ही बाब स्वास्थ्याशी संबंधित आहे या प्रश्नाची गंभीरता आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने कंत्राटदाराची

यादी मा.सदस्यांना देण्यात यावी.

महापौरः- मा.सदस्या सौ. वैशाली नारनवरे इन्होने जो प्रश्न उठाया है वह अत्यंत गंभीर है और प्रशासनाने जो उत्तर दिया है वहा स्वयंम स्पष्ट है संबंधित कंत्राटदार की ५ वर्ष तक जबाबदारी है और सारी के सारी गॅरंटी पिरेड मे है ऐसी अवस्था मे अगर कंत्राटदार की जबाबदारी होने के बावजुद भी ग्रीन जिम के अॅप्रटस वहापर वर्कींग स्थिती मे नही हे तो संबंधित डिपार्टमेंट जिसने इस काम को एक्झीक्युट किया है उसकी उसपर निगरानी नही है य प्रस्तावित होता है। इसलिये सारी ग्रीन जिम की निगरानी की व्यवस्था जिस डिपार्टमेंट के माध्यम से यह काम एक्झीक्युट हुआ है उस डिपार्टमेंट ने स्वयंम करानी चाहिये। आनेवाले ८ दिन के अंदर जो ग्रीन जिम खराब है उसको रिपेअर करने के निर्देश देना चाहिये अन्यथा संबंधित ठेकेदार की सिक्युरीटी डिपॉझीट जप्त करने की कारवाई करनी चाहिये ऐसे निर्देश प्रशासन को दिये जाते है। साथ ही साथ संबंधित जिस व्यक्तीकों जिम्मेदारी दी गयी है उसपर निगरानी रखने की वह अगर अपना कार्य नही कर रहा है तो उसपर शासकीय दृष्टी से आवश्यक दंडात्मक कारवाई करने के निर्देश इस सभा के माध्यम से दिये जाते है।

**प्रश्न क्र. २६०:-** आसीनगर झोन अंतर्गत रस्त्यावरील गड्डे बुजविण्यासंदर्भात प्रश्न

निगम आयुक्तः- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र. २६१:-** नागपूर महानगरपालिकेतील १० झोनचे वेगवेगळया देखभाल दुरुस्तीचे निविदा मागविण्यात का येत नाही ? या संदर्भात प्रश्न

निगम आयुक्तः- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र. २६२:-** शांतीनगर LPG शववाहिनी करीता किती निधी केव्हा व कोणत्या खासदार/आमदारांकडून प्राप्त झाला होता? संदर्भात प्रश्न

श्रीमती आभा पांडेः- मा.महापौरजी, खासदार आणि स्वास्थ्य विकास कार्यक्रमा अंतर्गत मा. खासदार श्री.अविनाश पांडेजी जे राज्यसभा सदस्य होते. त्यांनी शांतीनगर एलपीजी शवदाहिनीकरिता ४९.९४ करोड रुपये शांतीनगर येथे एलपीजी शवदाहिनी बांधण्याकरिता दिले होते. मा.महापौरजी, त्याचा कार्यदेश ३ जानेवारी २०१५ ला देण्यात आला होता आणि कंत्राटदाराला सहा महिन्याची मुदत देण्यात आली होती. मा.महापौरजी, आज पाच वर्ष लोटल्यावरही शांतीनगर एलपीजी शवदाहिनीचे काम पुर्ण झालेले नाही मा.महापौरजी. २०१६ मध्ये प्रशासकीय मंजुरी या प्रस्तावाला होती.. २०१७ च्या जानेवारीला या मधून वर्कआर्डर दिले आणि सहा महिन्याची मदत दिली. परंतु मा.महापौरजी, संबंधित विभागाने ५ वर्ष लोटल्यावरही यावर कुणाचे नियंत्रण नव्हते, कोणतेही काम ठेकेदाराने केले नाही, फक्त एक छोटे स्ट्रक्चर त्याने त्या ठिकाणी उभारलेले आहे. म्हणून यामध्ये एक प्रश्न विचारायचा होता, या कामात कोणत्या कामाचा निधी कंत्राटदाराला देण्यात आला. यांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने दिले, कंत्राटदारसह ३ कामाकरिता १२ लक्ष ४१ हजार ६९८ निधीचा भुगतान करण्यात आला. हे भुगतान करण्यात आले तेव्हा ७० गॅस प्लॉन्ट जे अजूनही बनायचे आहेत. फक्त बांधकामासाठी १२ लक्ष ४१ हजार ६९८ निधी कंत्राटदाराला देण्यात आला. मा.महापौरजी, मी जेव्हा प्रशासनाला हे विचारले जेवढा निधी या कामाकरिता उपलब्ध करुन देण्यात

| |
|---|
| आला होता तो निधी शिल्लक आहे काय? मा.महापौरजी, प्रशासनाने गोल गोल उत्तर दिले. एकुण १७ लक्ष ५८ हजार ३०२ इतका निधी शिल्लक आहे. मा.महापौरजी, या कामाकरिता ४९ लक्ष ९४ हजार इतका निधी उपलब्ध होता आणि त्याचे वर्कआर्डर देण्यात आले. दोन्ही कामाची बेरीज केली तर २९ लक्ष गेले कुठे? मलाप्रशासनाकडून उत्तर पाहिजे आहे की जी तफावत निधीमध्ये दिसत आहे. यांनी कंत्राटदाराकडून काम केलेले आहे काय? मा.महापौरजी मला हे विचारावयाचे आहे. |
| महापौर :- प्रशासनाने निवेदन करावे. |
| कार्यकारी अभियंता(लोककर्म):-मा.महापौरजी, या कामाचे ४९ लक्ष रुपयाचे प्राकलन आपण डीपीसीला सादर केले होते. तेवढया रक्कमेला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आणि त्याचे ४६ लक्ष १८ हजार रुपयेचे टेंडर काढण्यात आले होते. ते मंजूर झाले. |
| श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, आवाज येत नाही. |
| अधिक्षक अभियंता(श्री.पोहेकर):-मा.महापौरजी, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या प्रश्नाचे उत्तर खालीलप्रमाणे आहे. या प्राकलनास ४९.४३ लक्ष इतके रुपयाचे खासदार श्री. अविनाशजी पांडे यांच्या कार्यकाळाअंतर्गत मंजूरी प्राप्त झाली होती. त्यापैकी ४६ लक्ष १८हजार एवढया रक्कमेच्या कार्यदेशास दिनांक ०३.०१.२०१७ रोजी प्रथम कार्यदेश देण्यात आला. त्यामध्ये प्रावधान लक्ष ६० मध्ये एलपीजी शवदाहिनी शेड २.३५ लक्ष, चिमणी २६.१५ लक्ष, आरसीसी १.८४ लक्ष, असे एकंदरीत ४६.१८ लक्ष एवढे होते त्यापैकी कंत्राटदारास आतापर्यंत स्थापत्य कामाचे रु.१२,४१,६९८ राशीचे प्रथम देयक देण्यात आले आहे. |
| श्रीमती आभा पांडे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, सन्माननीय अधिका-यांनी सांगितले की ४६ लक्ष १८हजार रुपयाचे कार्यदेश देण्यात आले होते. मा.महापौरजी, रु.१२,४१,६९८ राशीचे प्रथम देयक त्या कंत्राटदाराला देण्यात आले. एकुण ३० लक्ष निधी उपलब्ध करुन देत असतांना १७ लक्ष ५८ हजार ३०२ रुपये एकुण खर्च झाला. |
| अधिक्षक अभियंता(श्री.पोहेकर):-मा.महापौरजी, सन्माननीय मॅडम येथे आपल्याला ४९.९४ लक्ष रु.ची प्रशासकीय मान्यता प्राप्त होती त्यापैकी ३० लक्ष रुपये निधी प्राप्त झाले.रु.१२,४१,६९८ राशी कंत्राटदाराला देण्यात आली आणि १७,५८,३०२/- रुपये निधी शिल्लक आहे. |
| श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी,३० लक्ष रुपये निधी प्राप्त झाले. त्यामध्येरु.१२,४१,६९८ राशी कंत्राटदाराला देण्यात आली आणि १७,५८,३०२/- निधी शिल्लक आहे. याच्यामध्येच आपल्याला चिमणी वगैरे काम करायचे आहे.मा.महापौरजी, वाचलेल्या फंडामध्ये वॉटरटॅन्क, चिमणी आणि गॅसबॉयलर हे काम १७,५८,३०२/- रुपये मध्ये करणे अपेक्षित आहे. हे काम उपलब्ध निधी मध्ये होवू शकेल काय? |
| अधिक्षक अभियंता(श्री.पोहेकर):-मा.महापौरजी, उर्वरित राशीची मागणी करावी लागणार आहे. |
| श्रीमती आभा पांडे:-म्हणजे मा.महापौरजी, जे ५ वर्ष लोटले. कोरोना काळामध्ये शांतीनगर घाटावर जेव्हा मृत देह आणले जात होते तेव्हा मृत देह बाहेर ठेवण्यात येत होते आणि घाटावर जागा नव्हती. मा.महापौरजी, प्रशासनाने या कामात दिरंगाई केली हा प्रोजेक्ट दिलेल्या मुदतीत पुर्ण केला पाहिजे होते. |

मा.महापौरजी, जी पीएमसी आपल्याकडे होती, यांनी उत्तरात सांगितले आहे मे.स्पेक डिझाईनर लिमीटेड यांनी सदरहू कामाचे निरीक्षण केले. नंतर सॉईल इनवेस्टीगेशन प्राप्त झाल्यानंतर डिझाईन प्राप्त झाले व डिझाईन मध्ये कॉंक्रिंट ग्रेड बदलामुळे कामास उशीर झाला तदनंतर कामास प्रत्यक्ष सुरुवात झाली. काम सुरु करुन अस्तित्वातील बर्नींग शेड हटवून त्या जागी उर्वरित काम करणे नियोजित होते, त्यास स्थानिक पातळीवर विरोध झाल्यामुळे उर्वरीत काम रेंगाळले. या ठिकाणी सद्यस्थितीत चिमणीचे बांधकाम, गॅस, गोडाऊन, इतर किरकोळ कामे शिल्लक आहे. महा.महापौरजी, जर यांच्या कडे जागा नव्हती तर यांनी कामाला कशी सुरुवात केली हा पहिला प्रश्न आहे. शांतीनगर घाटाच्या फाईलमध्ये जे डिझाईन बनविण्यात आले होते ते दुस-या ठिकाणचे होते आणि बॉयोगॅसचे डिझाईन हे दुस-या ठिकाणचे होते. यांच्याकडे जागा नव्हती तर मग ती जागा कशी सिलेक्ट केली हा मोठा प्रश्न आहे मा.महापौरजी. मा.खासदार महोदय अविनाशजी पांडे यांनी निधी उपलब्ध करुन दिला होता त्यांचे स्वप्न पुर्ण झाले नाही मा.महापौरजी, मी आपणांस सांगू इच्छिते की अजूनही त्यामध्ये काम झाले नाही, वारंवारं तक्रार करुन प्रोजेक्टचे कोणीही अधिकारी उत्तर देण्यास तयार नव्हते. प्रोजेक्टच्या अधिका-याकडून वारंवारं ही फाईल झोनला पाठविण्यात आली की आता पुढील कामे झोनने आपल्या स्तरावर करावे. मा.महापौरजी, मी ती फाईल वाचलेली आहे. प्रोजेक्ट विभागाने चुका केल्या आणि आता झोनला काम करण्याकरिता फाईल पाठवित आहेत. यांनी उत्तरात म्हटले की कामाला सुरुवात केली असतांना कोव्हीड-१९ लॉकडाऊन लागल्यामुळे तसेच चिमणीच्या कामाकरिता स्किल्र्ड लेबर च्या अभावामुळे काम बंद झाले. सदरहू कामास काही तांत्रिक व स्थानिक/अपु-या जागेच्या अडचणी असल्याने कामास उशीर झाला. मा.महापौरजी, प्रशासन दिशाभूल करीत असेल तर आपण गंभीरतेने या विषयाची दखल घेवून हा प्रोजेक्ट पुर्ण करुन दयावा लागेल मा.महापौरजी. ही काळाची गरज आहे असे मी आपणांस निवेदन करते. मा.महापौरजी, जागा अभावी दुसरी जागा निवडली, जर जागा नव्हती तर वर्कआर्डर कशाला दिला. वर्कआर्डर आपण तेव्हाच देतो आपले सर्व तयार असते. याचा वर्कआर्डर दिला, या प्रोजेक्टकरिता कन्सलटंसी नियुक्त केली. जागेच्या उपलब्धेबाबत उशीर झाला या कारणाने प्रोजेक्टच्या कंन्सलटंसी ने पैसे उकळले मा.महापौरजी. जे १२ लक्ष रुपये खर्च झाले त्या ठिकाणी आता कुत्रे खेळत आहेत. आदरणीय अविनाशजी पांडे यांनी जो निधी उपलब्ध करुनदिला तो कुत्रे खेळण्याकरिता उपलब्ध करुन दिला काय? मा.महापौरजी, माझे आपल्याला निवेदन आहे की १२ लक्ष रुपये जे कंत्राटदाराला दिले ते त्यांच्याकडून काम करुन घेतले पाहिजे. आणि पुढचा निधी उपलब्ध करुन ते काम करुन घेतले पाहिजे आणि नाही होत असेल जे कंत्राटदार आहे आणि जी पीएमसी आहे त्यांच्याकडून वसुल करावे लागेल. ज्या प्रमाणे आपण अधिका-याच्या विरोधात बोलतो, जे प्रोजेक्ट घेतो तर त्याला पुर्ण करण्याची जबाबदारी सुध्दा त्यांच्यावर देण्यात यावी. ज्या सुविधा आम्हांला जनतेला द्यावयाच्या आहेत त्या वेळेवर दिल्याच पाहिजेत. मुलभुत सुविधा दिल्या पाहिजे. हा निधी त्यांच्याकडून वसुल करावा नाही तरी आपल्याकडून मा.महापौरजी अपेक्षा करते, विश्वास करते की येणा-या तीन महिन्यामध्ये याच्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्न कराल, किंवा निधी उभा करुन दयाल. आणखी एक माझी मागणी आहे मा.महापौरजी, त्या कंत्राटदाराला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे.त्यांच्या मुदतीत काम न केल्यामुळे कॉस्ट

| |
|---|
| वाढली आहे त्यामुळे त्यांना सुध्दा ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. आणि जे दोषी अधिकारी असतील त्यांच्यावर गंभीर चौकशी झाली पाहिजे. ज्यांनी या शवदाहिनीचे काम केले नाही त्यांच्यावर कठोरतेने कार्यवाही ही झालीच पाहिजे असे मी निवेदन करते. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले धन्यवाद. |
| महापौरः- प्रशासनाने या निवेदनावर आपले उत्तर सादर करावे. |
| अधिक्षक अभियंता(श्री.पोहेकर):-मा.महापौरजी, जागेची अडचण आहे. काम केले आहे ते योग्य केलेले आहे असे दिसून आले आहे. कंत्राटदाराला तीन महिन्यात काम करण्याचे आदेश सुध्दा देण्यात आले आहे. उर्वरित निधी आहे तो २०२० च्या पत्रान्वये आदरणीय अविनाशजी पांडे यांच्या निधीतून लावण्यात आला आहे. बाकी निधी शिल्लक असलेला निधी.. |
| श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, प्रशासनाने उत्तर दिले त्यावर मला पुन्हा बोलावयाचे आहे. त्यांनी सांगितले की कंत्राटदाराने केलेले काम योग्य आहे. मा.महापौरजी, त्याचा तपासणी केल्याशिवाय असे सर्टीफिकेट देता येत नाही. अजूनही उत्तर देतांना ते खोटे बोलत आहे प्रशासनाची आणि आपली दिशाभूल करीत आहेत. |
| महापौरः- मा.सदस्या सौ.आभा पांडे यांनी जो विषय घेतला आहे तो विषय गंभीर दिशेने चाललेला दिसत आहे. कारण ज्याप्रमाणे आरोप करण्यात आले त्या घाटावर जर जागाच नव्हती तर तेथे अशा प्रकारची यंत्रणा का प्रस्तावित करण्यात आली आहे ही खरी गोष्ट आहे. कोणत्याही प्रकारचे यंत्र जर कुठे लावायचा असेल तर त्या प्रकारची जागा तेथे उपलब्ध आहे किंवा नाही याकडे लक्ष देणे नितांत आवश्यक आहे. त्या कामासाठीच आपण पी.एम.सी. नेमतो. जर पी.एम.सी. नेमल्यानंतरही अशा प्रकारची चुक झाली असेल तर ज्या अधिका-यांनी हा विषय प्रस्तावित केलेला आहे त्याला निगम आयुक्तांनी रितसर कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकुण घ्यावे आणि त्यांच्या नियोजनामुळे अशा प्रकारे शासनाच्या निधीचा फसवणुक होत असेल तर संबंधित अधिका-यांवर ताबडतोब कारवाई करण्याचे निर्देश सभेच्या माध्यमातुन देण्यात येत आहे. सोबतच संबंधित कंत्राटदाराची जर चुक असेल तर त्या कामाची सुध्दा चाचणी करुन त्या दिशेने सुध्दा आपण लक्ष दिले पाहिजे. आणि जर चुक असेल तर नियमाप्रमाणे जी काही कारवाई प्रस्तावित आहे ती केली पाहिजे. शासनाकडुन जो अपेक्षित निधी आहे तो निधी प्राप्त करण्याच्या दृष्टीने सुध्दा संबंधित कार्यालयासोबत विभाग प्रयत्न करीतच आहे त्या सोबतच निगम आयुक्तांनी सुध्दा स्वत:च्या संबंधांचा वापर करुन तो निधी हे काम पुर्ण करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यासाठी काटेकोरपणे लक्ष दिले पाहिजे असे निर्देश सभेच्या माध्यमातून देण्यात येत आहे. |
| **<u>प्रश्न क्र. २६३</u>:-** माझे प्रभाग ७ मध्ये स्थायी समिती मधून मी सदस्य असतांनी २५ लाखाची फाईल स्वान-पोलची तयार करुन प्रभागात ते लावण्यात आले. या संदर्भात प्रश्न |
| श्रीमती मंगला लांजेवार :- मा.महापौरजी, २०१८ मे जब मै स्थायी समिती की सदस्या थी तब २५ लक्ष रुपये की फाईल स्वान-पोल,एलएडी लाईट मेरे प्रभाग क्र ७ मे लगाने का प्रस्ताव तैयार किया था। मगर मा.महापौरजी, पोल तो लग गये मगर एलएडी लाईट अभी तक लगी नही है। मेरे प्रश्न पर प्रशासनने उत्तर दिया है की अभी टेंडर की प्रक्रिया चालू है, मा.महापौरजी, मेरा निवेदन है की जल्द से जल्द निविदा मंजूर कर |

| |
|---|
| हमारे प्रभाग मे एलएडी लाईट लगाये जाये। |
| महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. |
| कार्यकारी अभियंता (श्री.मानकर) :- मा.महापौरजी, मा.सदन. मा.सदस्या श्रीमती मंगला लांजेवार यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देतो की सदर कामासाठी दुसरी जी निवीदा देण्यात आली आहे निविदा मंजूर झाली असून १५ दिवसांत फिटींग येवून जातील आम्ही ते काम पुर्ण करु असे मी आश्वासन देतो आणि ग्वाही देतो. |
| **<u>प्रश्न क्र. २६५</u>** :- नागपूर महानगरपालिकेअंतर्गत नागपूर शहर स्थित सर्व म.न.पा. दहन घाटावर म.न.पा.तर्फे विविध वस्तु जसे की, लाकुड, गोबरी संबंधित मृत पावलेल्या व्यक्तीच्या दाह संस्काराकरिता निशुल्क पुरविण्यात येते. त्याचप्रमाणे मुस्लिम कब्रस्थानामध्ये सुध्दा सुविधा पुरविण्यात येते काय? येत असल्यास कोणकोणत्या सुविधा पुरविण्यात येते याची सविस्तर माहिती येत्या म.न.पा. सभागृहात देण्यात यावी. |
| श्री.इब्राहीम टेलर :- मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिका अंतर्गत नागपूर शहर स्थित सब म.न.पा. दहन घाटोपर विविध वस्तु जैसे की, लकडीया, गोबरी संबंधित मृत व्यक्ती के दाह संस्कार के लिए निशुल्क दी जाती है, उसी प्रकार मुस्लीम कब्रस्थाना मे सुविधा दी जाये जैसे की लकडींया लगती है और खोदाई लगती है वह सुविधा दी जाये। |
| महापौर :- मा.सदस्य श्री. मोहम्मद इब्राहीम इन्होने जो विषय रखा है उस विषय के संदर्भ मे महानगरपालिका के अधिकारी के साथ चर्चा करके उसमे महानगरपालिका के प्रचलित नियमो के अंतर्गत शासन के निर्देश के अनुरुप क्या किया जा सकता है इसके बारे मे विस्तृत चर्चा करे अगर प्रशासन को इस विषय मे सकारात्मक सहयोग देने के निर्देश दिये जाते है। |
| महापौर :- निगम सचिवांनी लक्षवेधीचे वाचन करावे. |
| निगम सचिव :- मा.सदस्य,श्री.प्रविण दटके यांनी नागपूर मनपा समाजकल्याण विभाग मध्ये काही कर्मचारी समुह संघटक या पदावर सन २००८ पासून कार्यरत आहे. हे समुह संघटक सरकारच्या व नागपूर मनपाच्या सर्व योजना झोननिहाय वस्ती पातळीवर राबविण्याचे काम करीत आहे. या पुर्वी सन २००४ मध्ये अशाच ५ समुह संघटकांना या विभागाने मनपा मध्ये कायम करुन घेतले आहे त्यानुसार ते आता निवृत्त झालेले आहे ही पदे पण रिक्त आहे या अनुषंगाने सादर केलेली लक्षवेधी. |
| श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, प्रशासनाने माझ्या लक्षवेधीवर निवेदन करावे. |
| अति.आयुक्त (श्री. संजय निपाणे) :- मा.महापौरजी, प्रशासनाच्या वतीने या लक्षवेधीवर निवेदन करतांना सांगतो की, पुर्वी नेहरु रोजगार योजना जी चालु होती त्यावेळी मनपाच्या आस्थापनेवर ५ मंजूर पदे होती समाजविकास विभागामध्ये या पाच मंजूर पदावर त्यावेळी नेहरु रोजगार योजना मध्ये नेमलेल्या ५ समुह संघटकांना सामावून घेण्यात आले होते त्यानंतर ही नेहरु रोजगार योजना ही सुवर्ण जयंती योजना म्हणुन कन्व्हर्ट झाली त्यावेळी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेची अंमलबजावणी ही राज्य शासनामार्फत संचालक नगरपालिका प्रशासन यांच्या अंतर्गत जिल्हाधिकारी मार्फत होते आणि त्यानंतर ती योजना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राबवायची होती. यामध्ये २० मंजूर पदे होती मानधन तत्वावर त्यापैकी १४ पदे |

| |
|---|
| आपण भरलेली होती. आणि जुने ५ असे १९ कार्यरत होते. या पाच पैकी पाच कर्मचारी सेवा निवृत्त झाले. आणि १४ पदे कर्मचारी आपल्याकडे राहिले. दरम्यानच्या काळामध्ये तुंबराम नावाच्या एका कर्मचा-याला अनुकंपा तत्वावर या पाच पदापैकी एका पदावर घेण्यात आले म्हणुन या पाच पदापैकी एका पदावर एक कर्मचारी कार्यरत आहेत. यानंतर ०१-०४-२०१४ पासुन एन.यु.एल.एम. नावाची योजना सुरु झाली. त्यावेळी असे झाले की सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेमध्ये जे १४ कर्मचारी कार्यरत होते त्यांना तसेच्या तसे नविन योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आले काम करण्यासाठी मानधन तत्वावर यानंतर सन २०१४ मध्ये जिल्हाधिकारी यांनी आपल्याला १० लोक दिले ही एन.यु.एल.एम. योजना राबविण्यासाठी आणि २०१८ मध्ये आपण ८ लोक घेतले असे एकुण ३२ झाले. या ३१ पैकी १ मृत झाला म्हणुन त्यांना सोडुन दिले असे ३० कर्मचारी आज कार्यरत आहेत. एन.यु.एल.एम. मध्ये मानधन तत्वावर १६७६० रुपये मानधन तत्वावर हे लोक घेत असतांना सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने करीता लोक हे आपल्याला जिल्हाधिकारी महोदय यांनी दिली होती. एन.यु.एल.एम. मधील पहिला जो लॉट होता १० लोकांचा तो सुध्दा जिल्हाधिकारी यांनी आपल्याला दिला. त्यानंतर जी ८ लोक आहे ती मा.जिल्हाधिकारी यांनी एन.यु.एल.एम. मिशनच्या संचालकांच्या सुचनेनूसार आपण भरलेली होती. मा.महापौरजी, ही सर्व जी लोक आहेत सद्यस्थितीत एन.यु.एल.एम. या योजनेअंतर्गत मानधन तत्वावर कार्यरत आहेत. ही वस्तुस्थिती मान्य करायला हरकत नाही की २००४मध्ये पाच लोकांना नेहरु रोजगार या पदावर आपण सामावून घेतले होते परंतु आजच्या स्थितीमध्ये आपल्याला असे काही करायचे असेल तर या मंजूर पदाचा जो रिक्रुटमेंट रुल आहे ते आणि नविन पदभरती करीत असतांना ही पदे जर सरळ सेवेची असतील समाज विकास विभागाच्या आस्थापनेवर त्याकरीता जी काही प्रक्रीया आहे त्या पक्रीयेमार्फत भरावी लागणार आहे. |
| श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, आपण १७ पैकी ५ लोक आपण घेतले होते. या महानगरपालिकेत आपण अनेक डॉक्टर परमनंट केले, समुह संघटकांना सभागृहाचा ठराव लावून त्यांना सुध्दा परमनंट केले. आणि १७ पैकी ५ समुह संघटकांना जो काही नियम निकष होता आणि त्या समुह संघटकांनी अनेक वर्ष या महानगरपालिकेला आपली सेवा दिली आहे. दीड हजार  रुपयात आपण त्यांच्या कडुन अनेक प्रोग्राम करुन घेतले आहे. आरोग्य मेळावे करुन घेतले आहे. कस्तुरचंद पार्क येथे महिलांच्या आरोग्याचे मेळावे घेतले आहे. अनेक योजना महिला व बाल कल्याण विभागाच्या यांच्या भरवश्यावर चालत आहे. त्यामुळे माझी आपल्याला ऐवढीच विनंती  आहे. आपण अनेक निर्णय या सभागृहात कर्मचा-यांच्या बाजूने केले आहे. आपल्या सेवेतील २०-२० वर्ष या महानगरपालिकेला सेवा दिली आहे. आपण कर्मचा-यांचे नेते आहे त्यामुळे आपल्याला यांची सर्व व्यथा माहिती आहे. त्यामुळे माझी आपणांस विनंती आहे की ज्या पध्दतीने आपण डॉक्टर, असतील त्यामध्ये आयुर्वेद असतील, युनानी असतील त्या डॉक्टरांना परमंट केले, अनेक ड्रायव्हर यांना परमनंट केले त्याचबरोबर आपल्याच कार्यकाळात माजी मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी महानगरपालिकेमध्ये काम करणारे सर्व ऐवजदार आपण परमनंट केले त्यामुळे या समुहसंघटकांवर कोणताही अन्याय होऊ नये म्हणुन त्याच धर्तीवर ज्या १७ पदापैकी ५ पदे आपण मंजूर केले होते त्याप्रमाणे ते १२ पदे आपण भरावे अशी या सभागृहाच्या माध्यमातून आपणांस माझी विनंती आहे आपण यावर निर्णय दयावी अशी आपणांस विनंती आहे. |
| महापौर :- नागपूर महानगरपालिकेत यापुर्वी पुर्व निगम आयुक्तांसोबत झालेल्या बैठकीमध्ये आकृतीबंध तयार करुन महानगरपालिकेतर्फे शासनाकडे पाठविण्यात आला होता त्यामध्ये सर्व समुह संघटिकांचा समावेश करण्याचा विषय नोंदविण्यात आला होता परंतु तो आकृतीबंध शासनाकडे प्रलंबित आहे असून त्यावर निर्णय झालेला नाही. त्यामुळे रितसर नविन पध्दतीने मानवी दृष्टीकोण लक्षात घेता एका |

| |
|---|
| माणसाकडून किती दिवस कमीत कमी पैसे देऊन काम करुन घ्यायचे ही बाब लक्षात घेता मानवी दृष्टीकोणातून ही बाब नियमात बसवून रितसर सभागृहापुढे या समुह संघटकांच्या संदर्भात प्रस्ताव सभागृहापुढे सादर करण्याचे निर्देश या सभेच्या माध्यमातून देण्यात येत आहे. |
| महापौर :- निगम सचिवांनी स्थगण प्रस्तावाचे वाचन करावे. |
| निगम सचिव (डॉ.रंजना लाडे) :- मा.महापौरजी, मा.सदन स्थगण प्रस्ताव मा.सदस्य श्री. जितेंद्र घोडेस्वार यांच्या कडुन प्राप्त झालेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्म शताब्दी स्मारक व संशोधन केंद्र यशवंत स्टेडियम, धंतोली येथील स्मारकाच्या बांधकामाबाबत मागिल २९ वर्षापासून प्रलंबित प्रश्नाबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यास्तव स्थगण प्रस्ताव सादर करीत आहे. माझा स्थगण प्रस्ताव वरील नियमांच्या १ ट नूसार स्वीकृत करुन सभागृहात चर्चा घडवून आणावी ही नम्र विनंती.<br>मा.महापौरजी, दुसरा स्थगण प्रस्ताव मा.सत्तापक्ष नेता श्रीअविनाश ठाकरे यांचा प्राप्त झालेला आहे. नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिका, नगर रचना विभागाव्दारे नागपूर महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम/विकास परवानगी देण्याकरीता विविध शुल्क आकारल्या जातात सन २०२०-२१ मध्ये नागपूर महानगरपालिका प्रशासनाने नागपूर महानगरपालिका सभागृहाची पुर्व मान्यता न घेता हा विषय सभागृहात सादर न करता अचानकपणे बांधकाम / विकास परवानगी देण्याकरीता एम.आर.ॲन्ड टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम १२४ बी अंतर्गत विकास शुल्कात (Development Charges) १०० टक्के वाढीने वसुल करणे सुरु केले आहे. विशेष म्हणजे ही रक्कम जमिनीच्या किमतीच्या टक्केवारीत घेण्यात येते त्यामुळे नागरिक / विकासकांवर मोठयाप्रमाणात आर्थिक भार लादला गेला आहे. कोविड – १९ महामारीची बिकट परिस्थिती आणि बांधकाम व्यवसाय क्षेत्रात आलेली घसरण यामुळे अगोदरच विकासाला खिळ बसलेली आहे, उद्योग धंदे ठप्प झाल्यागत असून बांधकाम कामगारांचे हाल होत आहे. या भरमसाठी शुल्क वाढीमुळे या व्यवसायावर आणखी आघात होवून यामध्ये सामान्य नागरिक आर्थिक संकटात असल्यामुळे तो भरडल्या जात आहे. या क्षेत्रात यामुळे संकट ओढवले आहे तेव्हा याबाबत ठोस निर्णय घेण्याकरीता चर्चा घडवुन आणण्यासाठी प्रश्नाबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यास्तव स्थगण प्रस्ताव मान्य करुन चर्चेस अनुमती दयावी ही विनंती. |
| महापौर :- सभागृहाच्या समोर दोन स्थगण प्रस्ताव आलेले आहे. नियमाप्रमाणे जनतेच्या हिताच्या दृष्टीने हितगुंज करणा-या विषयाला प्राथमिकता दयावी असा विषय असतो. त्या दृष्टीने दोन्ही विषयाचे वेगवेगळे वळण आहे. एक नागरिकांच्या हिताशी जुडलेला विषय आहे. दुसरा सामाजिक भावणेशी जुळलेला विषय आहे. म्हणुन यामध्ये भेद न करता दोन्ही स्थगण प्रस्तावावर आपण चर्चा करु. सुरुवातीला मा.सदस्य श्री.जितेंद्र घोडेस्वार यांनी चर्चेस सुरुवात करावी. |
| श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, मा.आयुक्तजी, यशवंत स्टेडीयम येथील पटवर्धन मैदान येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जन्मशताब्दी स्मारक व शोध केंद्र बांधण्याचा प्रस्ताव ३१ डिसेंबर १९९२ रोजी एकमताने पास करण्यात आला. सभागृहात पाच हजार क्षमतेचे व आंतरराष्ट्रीय दर्जाचे तसेच व्ही.आय.पी व व्ही.व्ही.आय.पी. दर्जाचे कार्यक्रम होतील असा प्रस्ताव आहे. त्या प्रस्तावाला अनेक वर्ष होऊन गेले त्यामध्ये अनेक पक्षाने सत्ता उपभोगली परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक बनविण्याकरीता तेथे एक विटही लावण्यात आलेली नाही. नागपूर महानगरपालिका व राज्य सरकारने स्मारका करीता जागा देऊन विनाविलंब ते स्मारक बनवावे तेथे बहुजन समाज पक्ष तसेच अनेक आंबेडकरी संस्था व संघटनांनी अनेकदा निवेदन देऊन आंदोलन केलेले आहे. परंतु ते जातीवादी असल्यामुळे प्रशासनाने व शासनाने |

शहराच्या माध्यभागी ते स्मारक होऊ नये ती जागा बस स्टॅन्डला देण्याचे शडयंत्र रचले होते परंतु ते शडयंत्र बसपा नगरसेवकांनी २० जुन २०१६ रोजी हाणुन पाडले परिणामत: मनपा व राज्य शासनाने संपुर्ण खुली जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक व सांस्कृतिक शोध केंद्राला देण्याचा ठराव पास केला परंतु परंतु अजून पर्यत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व महापौर यांनी ती जागा मनपा स्मारक समितीला दिलेली नाही. बसपा चे राष्ट्रीय अध्यक्ष कांशीरामजी यांनी संपुर्ण देशभरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात सभा घेऊन त्यांच्या जन्मशताब्दी स्मारका करीता निधी जनमानसात जाऊन मनविण्यात आल्याने मोठया प्रमाणात जनजागृती होत असल्याने तत्कालिन सरकारने (१९९१ सन) काँग्रेसच्या पायाखालील वाळु सरकत असल्याचे दृश्य बघून समाजाला थोपविण्याकरिता तर ही घोषणा केली नसावी. परंतू मनपाच्या सर्वसाधारण सभागृहात उपरोक्त ठराव सर्व संमतीने पारीत झाल्याने शासन, प्रशासन विरुध्द जनसमाजाच्या आत्मसन्मानाचा हा लढा तयार झाला. डॉ.बाबासाहेबांच्या १२५ व्या जन्मशताब्दी वर्षाचा उदो-उदो करण्याऱ्या भाजप सरकारने बाबासाहेबांचे गाणे म्हणून - म्हणून मोठा झालेल्या "सुरेश भटांचे" ठराव व मागणी नसतानाही करोडो रुपये खर्चुन रेशीमबागेत सांस्कृतिक स्मारक बनविले. अंबाझरी येथे स्वामी विवेकानंद यांचेही स्मारक बनविले परंतू लाखो करोडो अनुयायी असलेल्या बाबासाहेबांच्या स्मारकाला एकही विट न लावल्याने हा त्यांचा व त्यांच्या अनुयायांचा अपमान होय. नागपूर महानगरपालिकेने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मशताब्दी स्मारक व शोध केंद्र बनवावे याकरीता राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख त्यांना २६-०८-२००२ रोजी व १५-१२-२००४ रोजी श्री.सुशीलकुमार शिंदे यांना १९-०८-२००४ रोजी श्री.पृथ्वीराज चव्हाण यांना व २१-१२-२०१२ तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांना २०-०८-२०१६, ३१-१२-२०१७ या शिवाय महानगरपालिकेला ३१-०७-१९९६, ०७-०८-१९९६ शिष्टमंडळाव्दारे निवेदन दिनांक २१-०९-१९९६ ला धरणे, दिनांक २०-११-१९९६ ला दोन लाख सहयांचे निवेदन मोर्चाव्दारे देण्यात आले. २७-०६-२००२, ११-०६-२००२, २६-०८-२००२,०५-११-२००३ आणि १९-०८-२००४, १५-१२-२००४,१५-१७-२०११, १७-१२,२०११, २१-१२-२०१२, ०५-१२-२०१२, २१-१२-२०१२,३१-०१-२०१३, २०१३, २०१४, २०१५,२०१६ तसेच २०१७ मा.महापौर, मनपा आयुक्त, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त महसुल विभाग, आदिंना निवेदन दिली बसपाचे नगरसेवक या विषयावर शासनाचे या विषयावर निषेध नोंदविला दिनांक ०७-०७-२०२१ महापौर मनपा दालनासमोर माझ्या नेतृत्वामध्ये सर्व बसपा नगरसेवकांनी सकाळी ११ वाजेपासून तर सायंकाळी ०५ वाजेपर्यत धरणा प्रदर्शने केली. त्या धरणा प्रदर्शनाला सन्माननिय विरोधी पक्ष नेते श्री.तानाजी वनवे, जेष्ठ नगरसेवक श्री.मनोज सांगाळे, सौ.भावना संतोष लोणारे इत्यादी नगरसेवक धरणा प्रदर्शन आंदोलनात सहभागी होतो. मा.महापौर श्री.दयाशंकर तिवारी साहेबांच्या दालनासमोर येऊन निवेदन स्वीकारले, अति.आयुक्त श्री.राम जोशी साहेबांनी त्या ठिकाणी येऊन निवेदन घेतले, या निवेदनाचा विचार न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा शासन व प्रशासनास देण्यात आला. २०१६ ला हिवाळी अधिवेशनाच्या दरम्यान तत्कालीन राजस्व मंत्री महसुल श्री.एकनाथराव खडसे यांनी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव श्री.नितीन करीर यांनी राजस्व सचिव असलेले श्री.मनुकुमार श्रीवास्तव, विभागीय आयुक्त श्री.अनुप कुमार तसेच तत्कालीन मनपा आयुक्त श्री.श्रावण हर्डीकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना १४ एप्रिल २०१६ रोजी सदर जागा मनपाला

| |
|---|
| हस्तांतरीत करण्याचे आदेश दिले होते. सोबत नकाशामधील काम विनाविलंब सुरुवात करण्याचे सुध्दा आदेश देण्यात आले होते. तत्कालीन महापौर सौ.जिचकार तसेच तत्कालीन आयुक्त श्री.अभिजित बांगर यांनी प्रोजेक्ट तयार असल्याचे सांगितले त्यांनी शासनाकडे पाठवून मंजूरी प्रदान करु असे सुध्दा त्यांनी सांगितले होते परंतु त्याचे पुढे काय झाले. हल्ली त्या जागेवर असलेली स्टार बसचा डेपो मोरभवन येथे हलवुन सदर जागेची लिजच्या संदर्भात या पुर्वी केलेली विनंती मंजूर करावी. दिनांक ०५-०६-२०२१ ला नागपूर जिल्हाचे पालकमंत्री तथा उर्जामंत्री डॉ.नितीनजी राऊत यांना सुध्दा निवेदन देण्यात आले. सर्व बसपा नगरसेवकांच्या माध्यमाने भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आपल्यावर व आपल्या देशावर फार उपकार आहे. आजपर्यंत त्यांना साजेशे असे एकही स्मारक आपल्या राज्यामध्ये उभे करु शकलो नाही त्यामुळे नागपूर शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी स्मारक व शोध केंद्र बनविण्याची योजना नागपूर मनपा ने २९ वर्षापूर्वी केली त्यासाठी मनपा दरवर्षी २ करोड रुपयांचे प्रावधान करीत असते. यशवंत स्टेडीयम व पत्रकार भवन पाडून तेथे कायापालट करण्याची घोषणा नागपूरचे खासदार तसेच केंद्रीय मंत्री श्री.नितीनजी गडकरी यांनी १८ सप्टेबर रोजी नागपूर शहरातील यशवंत स्टेडियम पाडण्याची घोषणा केली. परंतू त्या जागेवर मागील अनेक वर्षापासुन आंबेडकरी जनतेची मागणी असलेले व शासकीय स्तरावर प्रलंबित ठेवण्यात आलेले डॉ.बाबासाहेबआंबेडकर जन्मशताब्दी स्मारक (शोध केंद्र) चा साधा उल्लेखही यांनी केला नाही. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या दिक्षाभुमीच्या परिसरातील उत्तर व पुर्वेकडील कृषी विभागाची शासकीय जागा अनेक दिवसांपासुन आंबेडकरी जनतेची व स्मारक समितीची मागणी असुन सुध्दा ती जागा मिळाली नाही. मा.केंद्रीय मंत्री व नागपूरचे खासदार श्री.नितीनजी गडकरी असून महापौर महोदय आपणही नागपूरचे आहात येथील पिण्याच्या पाण्याची समस्याअजुनही सुटलेली नाही, रस्त्याचा प्रश्न, अनधिकृत ले-आऊटचा प्रश्न, झोपडपट्टयांचा प्रश्न जैसे थे आहे. येथे बसेसची पुरेशी सोय नाही. मा.महापौरजी, जन्मशताब्दी स्मारकाचा प्रश्न त्वरीत निकाली काढुन आपण गुणवादी नसून मानवतावादी आहे याचा परिचय दयावा आपण माझ्या स्थगण प्रस्तावावर चर्चा घडवून यावर निर्णय घ्यावा ही विनंती करुन अपेक्षा बाळगतो व मा.महापौरजी आपले धन्यवाद करतो, जय हिंद जय भारत. |
| महापौर :- प्रशासनाने या विषयावर निवेदन करावे. |
| अति.आयुक्त (श्री.संजय निपाणे) :- मा.महापौरजी, उपरोक्त विषयाच्या संदर्भात १३.६५ एकर जागा १५ वर्षाकरीता नागपूर महानगरपालिकेला मिळाली होती त्याची लिज १९७७ साली संपली त्यानंतर सन १९७७, १९९३,२००२, ०५-१२-२००२, ०४-१२-२००४, ०३-०१-२००४, ३०-१०-२००५, ३०-०८-२०१०, ०६-०४-२०११, ३०-०३-२०११, ०८-०१-२०१३ व २५-११-२०१३ या पत्रान्वये लिज नुतणीकरणाकरीता वारंवार विनंती केलेली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय यांचे तर्फे १४-०२-२०१४ रोजी शासनास लिज नुतणीकरण करण्याचे शासनास कळविले आहे. तदनंतर प्रधान सचिव महसुल व वन विभाग यांनी ३०-०१-२०१५ व ०६-०५-२०१५ या पत्रान्वये लिज नुतणीकरणाची विनंती करण्यात आली त्या अनुषंगाने शासनास केलेल्या पाठपूरावा ०३-०७-२०१६ रोजी मा.मुख्यमंत्री कार्यालय नागपूर येथील आढावा सभेमध्ये संबंधित जागेचा विकास करण्याच्या दृष्टीने मा.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शोध केंद्र व उर्वरीत जागेचा आराखडा तयार करण्याचे आदेश देण्यात आले होते. जागेच्या भाडेपट्टयांचे नुतणीकरण करण्याचा प्रस्ताव शासनास |

| |
|---|
| सादर करण्यास मनपा ने ०१-१२-२०१६ रोजी ठराव क्र ३७९ अन्वये मंजूरी प्रदान केली असून दिनांक ०६-०४-२०१७ च्या पत्रानुसार शासनास विनंती करण्यात आलेली आहे. त्यानंतर तत्कालीन आयुक्त यांनी २०-११-२०१८ रोजी शासनास पत्र पाठविले आहे की महानगरपालिका सर्व साधारण सभा ठराव क्र २३४ व २३५ अन्वये मा.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी स्मारकाकरीता यशवंत स्टेडीयम येथील संपुर्ण जागा विनाअट हस्तांतरीत करावी असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आलेला आहे. सबब भाडेपट्टा नुतणीकरणास शासनाने मान्यता प्रदान करावी या विनंतीसह सविनय सादर असे पत्र दिले आहे. आणि सोबतच तत्कालीन मुख्यमंत्री यांनी सुध्दा प्रस्ताव तयार करण्यास सांगितला होता त्याप्रमाणे इस्टेट विभागाला त्याप्रमाणे प्रस्ताव तयार करणे सुरु आहे. |
| श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, मागच्या २९ वर्षापासून हा प्रस्ताव आहे परंतु कार्यान्वीत झालेला नाही. मनपा स्तरावर त्याचा प्रोजेक्ट तयार करुन राज्य शासनाला ती नस्ती पाठविण्यात आलेली आहे काय ? लिजचे ५ लाख ७१ हजार रुपये भरण्याकरीता सुध्दा आदेश देण्यात आलेला नाही. त्या प्राजेक्टची माहिती आपणांस अवगत आहे काय. मा.आयुक्त साहेबांना मी वारंवार निवेदन केलेले आहे परंतु मा.आयुक्त श्री.राधाकृष्णन साहेबांना या विषयाची कल्पना नव्हती. मा.अति.आयुक्त श्री.राम जोशी साहेब व मा.आयुक्त एकत्र बसले असतांना या विषयाची माहिती दिली. या विषयाच्या संदर्भात मी काल आपल्याला सुध्दा पत्र दिले. या विषयावर मनपा प्रशासन व शासन गंभीर नसल्याचे आढळुन येते. |
| श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन यशवंत स्टेडीयमची ही सर्व जागा तत्कालीन महापौर प्रविणजी दटके असतांना आणि त्यावेळी मी भारतीय जनता पार्टीचा पदाधिकारी असतांना मा.श्री.देवेद्रजी फडणवीस मुख्यमंत्री असतांना तशा पध्दतीचा प्रस्ताव मंजूर केला होता. भारतीय जनता पार्टीचे सरकार या राज्यामध्ये असतांना व मा.श्री.देवेद्रजी फडणवीस मुख्यमंत्री असतांना या सभागृहाने संदीपजी जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती आणि ही संपुर्ण जागा परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला देण्यात यावी आणि त्याचे युजर चेंज करण्यात यावे त्यावर ३७ (१) ची कारवाई करण्यात यावी अशा पध्दतीच्या बाबी या संदर्भाने घेतल्या माझी आग्रहाची आणि नम्र विनंती आपल्याला अशी आहे आता महाविकास आघाडीचे सरकार आहे. आणि हा सर्व प्रस्ताव राज्य शासनाच्या अधिन थांबलेला आहे. महानगरपालिकेने या पुर्वी समिती या विषयाकरीता केली होती परंतु ते सर्व काम थांबल्या गेले त्याचपध्दतीने जर फॉलोअप घेण्यासाठी जर या सभागृहाच्या मार्फत निर्देश जर समिती केली तर कदाचित हा प्रश्न मार्गी लागू शकेल अशी मी आपणांस नम्र विनंती करतो. या विषयासंदर्भात एक समिती तयार करुन राज्यशासनाकडे हा जो प्रस्ताव आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी संपुर्ण जागा देण्यासाठी आपण समिती निर्माण करावी. |
| श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, त्याचे प्रोजेक्टच तयार झालेले नाही. या प्रस्तावाच्या संदर्भात अनेक वेळा समित्या झालेल्या आहेत. |
| महापौर :- आपल्याला जागा मिळण्याच्या पर्वी आपण प्रस्ताव तयार करु शकतो काय ? या संदर्भात प्रशासनाने उत्तर दयावे. |
| निगम आयुक्त :- मा.महापौरजी, आपण अत्यंत महत्वाचा मुद्या उपस्थित केलेला आहे. सभागृहाने ऑलरेडी या विषयामध्ये स्मारक करण्याकरीता ठराव केलेला आहे परंतु शासनाकडून अद्याप जागा मिळाल्याशिवाय आपण अधिकृतरित्या कुठलाही प्रकारचा प्रस्ताव तयार करु शकत नाही. मात्र कामाचे महत्व लक्षात घेऊन सन्माननिय पालकमंत्री सुध्दा याकरीता पाठपूरावा करीत आहेत त्यांच्या कॅबिनेटमध्ये |

आपण या प्रस्तावाच्या संदर्भात आर्कीटेक्ट कडुन ढोबळ इस्टिमेट पालकमंत्र्यांच्या कार्यालयात पाठविले आहे. १९७७ पासून या जागेच्या संदर्भात लिज रिन्युअलसाठी प्रयत्न करीत आहोत ते मार्गी लागल्याशिवाय आपण काहीच करु शकत नाही. उद्या एखादा सदस्य आपल्याला विचारु शकते तेथे ऐवढा खर्च कसा काय केला त्यामुळे ते नियमाला धरुन राहणार नाही. परंतु कामाचे महत्व लक्षात घेऊन त्यामध्ये एक ऑलरेडी नामांकित आर्किटेक कडुन ढोबळ इस्टीमेट तयार करुन पालकमंत्री कार्यालयाला उपलब्ध करुन दिले आहे.

महापौर :- जनभावना लक्षात घेता प्रशासनाने लिज नुतणीकरणाची कारवाई ताबडतोब करण्यासाठी युध्दस्तरावर प्रयत्न करावे. प्रशासनाने  ढोबळ इस्टीमेट तयार केले असेल तरीही या सभागृहाच्या माध्यमातून असे निर्देश देण्यात येते की, भारतरत्न परम पुज्यनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे विश्व स्वरुप असल्यामूळे एका वैश्विक स्तरावर निविदा काढून याचे डिझाईन कसे असायला पाहिजे याची स्पर्धा घ्यावी, आणि त्या स्पर्धातून निवडून आलेल्या डिझाईनच्या आधारावर पुढील प्रारुप  तयार करावे असे सभागृहाच्या माध्यमातून निर्देश देण्यात येत आहे. याकरीता लागणारा निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी सन्माननिय पालकमंत्री यांच्या प्रेसच्या माध्यमातून त्यांचे निवेदन ऐकले आहे. विश्वस्तरीय निविदा काढुन स्पर्धा घेण्याचा जो आपण विचार करीत होतो त्या दृष्टीने मा.पालकमंत्री महोदयांची देखील काही सुचना किंवा कल्पना असेल किंवा बसपा गटनेता तसेच सर्व पक्षांच्या नेत्यांची काही कल्पना असेल त्याचा समावेश यामध्ये करण्यात यावा. या विषयाच्या संदर्भात मा.सदस्य श्री.धर्मपाल मेश्राम यांनी सुचविल्याप्रमाणे एक सर्व पक्षीय समिती याकरीता नेमण्याची घोषणा लवकरात लवकर करण्यात येईल. लिज नुतणीकरणासाठी  समितीची आवश्यकता नाही त्यामुळे प्रशासनाने आपल्या स्तरावर प्रयत्न करावा. मा.पालकमंत्री महोदय प्रेसच्या माध्यमातून सांगत आहे की या विषयाच्या संदर्भात माझी विशेष रुची आहे जर त्यांच्यामध्ये ती रुची असेल तर ते हा विषय लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी स्वत: प्रयत्न करतील अशी मला खात्री आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, सर्वप्रथम मी आपले धन्यवाद व्यक्त करतो कि आपण लोकहिताच्या स्थगन प्रस्तावाला या सभागृहामध्ये चर्चेला ठेवला, याबद्यल मी आपले आभार व्यक्त करतो. सोबतच आपण श्री जितेंद्र घोडेस्वार यांचा सुध्दा स्थगन प्रस्ताव या सभागृहात चर्चेसाठी ठेवला होता,  हा प्रश्न १९७७ पासून प्रलंबित आहे आणि सर्वांची भावना आहे कि तो स्मारक या नागपूर शहरामध्ये व्हावा, जनप्रतिनिधी सर्वांनी यासाठी प्रयत्न कले आहे काही तांत्रिक अडचणीमुळे सर्वांची इच्छा असून देखील तो स्मारक अजूनपर्यंत पुर्ण होवु शकला नाही. परंतु आज आपण याठिकाणी जो निर्णय दिला त्या निर्णयामुळे निश्चितच तो स्मारक लवकरच तयार होईल, आपण दिलेल्या निर्णयाबद्यल मी आपले धन्यवाद याठिकाणी व्यक्त करतो. मा.महापौरजी, मी माझा जो स्थगन प्रस्ताव मांडला होता तो नागपूर शहरामध्ये मेट्रो सुरु झाल्यापासून जो विकास शुल्कामध्ये १०० टक्के वाढ झालेली आहे आणि त्यामुळे तो आर्थिक बोजा सामान्य नागरिकांवर बसविला जात आहे त्याच्यावर चर्चा करण्यासाठी मी याठिकाणी स्थगन प्रस्ताव मांडला आहे. आणि याचे कारण असे आहे कि दिनांक ०७.०१.२०२१ रोजी नागपूर महानगरपालिकेकडुन एक जाहिरात प्रसिध्द झाली, ती जाहिरात मी पुर्ण वाचत नाही, परंतु त्या जाहिरातीत नागरिकांवर भुर्दंड बसविणारा जो भाग आहे त्याचे मी याठिकाणी वाचन करतो. नागपूर शहरात मेट्रोचा प्रकल्प जाहिर झाल्यानंतर विकास शुल्कामध्ये १०० टक्के वाढ करण्याबाबत, आणि ही जी नोटीस आहे आणि या नोटीसनंतर एक उदाहरण माझ्यापुढे आलेला आहे, मी एक उदाहरण आपणांस देवु इच्छितो कि, मी का हा स्थगन प्रस्ताव आणलेला आहे  कारण कि, हा लोकांच्या जिव्हाळयांशी निगडित प्रश्न आहे. मी आपणांस उदाहरण देवु इच्छितो कि, श्री शत्रुघन सोनी, धंतोली यांनी त्यांच्या तीन हजार प्लॉटच्या डेव्हलपमेंटकरिता अर्ज केला होता, आणि त्यांनी कंस्ट्रक्शन मागितला होता २८०० स्के.फिट त्यांनी ३००० हजारच्या प्लॉटवर २८०० चा कंस्ट्रक्शन

मागितला होता. पांच वर्षापूर्वी त्यांना डिमांड सवा लाखाच्या जवळपास आली असती, परंतु आज ती डिमांड ५ लाख ४२ हजार ५३१ रुपयांची आलेली आहे. असेच अनेक सर्वसामान्य नागरिक आहे ज्यांची परिस्थिती चांगली नाही, सोनी ही सर्वसामान्य नागरिक आहे, आज त्यांना ८.४२ लक्ष रुपयांची डिमांड आलेली आहे. प्रश्न असा आहे कि, आता ते ८४२ लक्ष रुपये कसे भरतील हा मुळ प्रश्न याठिकाणी उभा होत आहे. आणि हे कशामुळे घडले तर याची सुरुवात १२ जून २०१९ ला एक नोट या संदर्भात विभागाच्या मार्फत बनविण्यांत आली आणि त्याच्यामध्ये ३०-०६-२०१६ नुसार जे काही अमेंडमेंट राज्य सरकारच्या माध्यमातुन आलेली आहे आणि त्यानुसार हा प्रस्ताव तयार करण्यांत आला आणि तो प्रस्ताव समोर अति.आयुक्तांकडे गेला, आणि त्यावर मा.अति.आयुक्तांनी म्हटले आहे कि तुम्हाला जाहिरात प्रसिध्द करावयाची असेल ती करा परंतु त्याच्या अगोदर सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव ठेवणे आवश्यक आहे. त्यानंतर ती फाईल परत अति.आयुक्तांनी मागितली, व १०० टक्के वाढ करण्याकरिता ती फाईल मुव्ह झाली आणि त्याच्यावर चर्चा करावी लिहिला परत ती फाईल आयुक्तांकडे गेली, परत त्यावर चर्चा झाली. चर्चा होवुन ती फाईल पुढे गेली आणि पुढे जातांना ११.०२.२०२१ ला याच्यावर अति. आयुक्तांनी म्हटले आहे कि या संदर्भात विधी अधिका-यांचे अभिमत घेण्यांत यावे, अशी शिफरस आहे, आणि आता ही शिफारस कशासाठी आहे याच्यामध्ये ज्यावेळेस मा.गावंडे साहेब तत्कालीन .सहसंचालक, नगररचना होते मला आठवते त्यावेळेस १२४ (B) च्या अनुषंगाने १०० टक्के शुल्क वसुल करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे त्याच्यावर त्यांनी असे लिहिलेले आहे कि, वरील तरतुदीचा विचार करता अधिनियमातील कलम १२४ (B) ३ मधील शासनाच्या विकास शुल्क दराबाबत केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने विकास आकार शुल्क कमी व जास्त करण्याच्या संदर्भात विकास शुल्क १०० टक्के लागु करण्याच्या संदर्भात त्यांनी आपले मत दिले त्याच्यावर अति.आयुक्तांनी आपला मत लिहिले कि, याच्यावर विधी अधिका-यांची मत घेण्याची शिफारस करण्यांत येत आहे. आणि त्याच्यावर परत मा.आयुक्तांशी चर्चा करण्यांत आली आणि त्यानंतर त्याच्यावर लिहिण्यात आले कि एमआरटी टॅक्ट १९६६ सॅक्शन १२४ नुसार प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे. परंतु याच्यावर कायदेशीर अभिमत कुठल्याही प्रकारचे घेण्यांत आलेले नाही. एका ठिकाणी सहसंचालक, नगररचना यांनी म्हटले आहे कि, १२४ ब याला लागु होत नाही. आणि अति.आयुक्तांनी म्हटले होते कि हा प्रस्ताव सभागृहापुढे आणावे, आणि त्यानुसार विधी विभागाचे मत घेण्यासाठी प्रस्तावित केले होते. परंतु विधी विभागाचे मत याच्यावर घेण्यांत आलेला नाही. आणि साधरणत: २६.०३.२०२० ला नागपूर महानगरपालिकेकडुन शासनाला एक पत्र पाठविण्यांत आले, पुर्ण पत्र मी वाचत नाही, त्याचा पॅरा क्रमांक ११ मी या ठिकाणी सांगतो. शासनानी नागपूर शहराकरिता मेट्रो रेल प्रकल्प महत्वपुर्ण घोषित केल्यामुळे, १२४ ब नुसार विकास आराखडयात १०० टक्के वाढ करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर्हु वाढ महानगरपालिका स्तरावर प्रस्तावित आहे. मा.महापौरजी, याचा अर्थ महानगरपालिका सभागृहाच्या स्तरावर प्रस्तावित आहे, असा माझा याठिकाणी मत मी नोंदवितो. आणि याच्यामध्ये कुठल्या प्रकारची महानगरपालिकानी १२४ ब नुसार कार्यवाही केलेली आहे, असे प्रस्तावित नाही. याच्यामध्ये सभागृहाचे कोणत्याही प्रकारचे मत महानगरपालिकांनी मा.प्रधान सचिवांना पत्र पाठवित असतांना घेतलेले नाही. याच्यानंतर २६.०३२०२० ला हे पत्र शासनाकडे पाठविले ३० नोव्हेंबर २०२० ला शासनाकडुन मा.आयुक्तांना एक पत्र आला कि, संदर्भाकिंत पत्राच्या अनुषंगाने आपण पुर्वलक्षी प्रभावानी ज्या दिवशी पत्र निघाले त्या दिवसापासून हे शुल्क घ्यावे, हे विकास शुल्क परवानगीच्या अनुषंगाने वसुल करणे आवश्यक आहे. याच्यामध्ये १५ जानेवारीला एक विभागीय पुस्तिका प्रकाशित झाली, आयुक्त यांच्याकडुन त्याच्यामध्ये नागपूर शहराकरिता मेट्रो रेल्वे नागरी प्रकल्प जाहिर झाल्यामुळे १०० टक्के वाढ अपेक्षित आहे.आणि श्री राधाकृष्ण बी यांच्या सहीनी हा जी.आर. १५ जानेवारीला

निघालेला आहे. आणि त्याच्यानंतर मा.आयुक्तांनी राज्य शासनाला एक पत्र पाठविले त्या पत्रामध्ये त्यांनी विचारले कि, हा जो १०० टक्के विकास शुल्क आकाराव्याचे आहे हे नागपूर मेट्रो झोनमध्ये आहे काय ? कि पुर्ण शहराकरिता लागु करावयाचे आहे. त्यानंतर नागपूर महानगरपालिकेला शासनाकडुन पत्र आले परंतु त्याची नोंद मला कुठे ही सापडली नाही. आणि ०४.०३.२१ ला मा.आयुक्त, मा.सहा.संचालक, नगरविकास यांनी परिपत्रक काढुन पुर्वलक्षी प्रभावानी १०० टक्के वाढ प्रस्तावित केलेली आहे. आणि यात मा.महापौरजी एक गोष्ट मला बोलावयाची आहे हा जो एमआरटीपी ॲक्ट १९६६ सॅक्शन १२४ ब काय आहे हे मी तुम्हाला याठिकाणी सांगु इच्छितो. १२४ ब अमेंडमेंट आहे, नागरी वाहतुकीच्या संदर्भात याच्यामध्ये राज्य शासनानी काय म्हटले आहे, ते मी वाचुन दाखवितो. आता १२४ ब ची प्रक्रिया महाराष्ट्र शासनानी त्याठिकाणी केलेली आहे. ही प्रक्रिया केव्हा लागु करायची, ही प्रक्रिया १२४ ब (३) मध्ये राज्य सरकारनी दिलेली आहे. प्राधिकरण हा शब्द अतिशय महत्वाचा आहे, प्राधिकारी नाही, प्राधिकरण दर वाढविण्यापूर्वी व कमी करण्यापूर्वी व अश्या दरांनी विकास आकार बसविण्यापूर्वी प्राथमिक पध्दतीने कार्यपालन होणे, त्याच्यामध्ये ३ (अ) मध्ये जे म्हटलेले आहे, त्यांनी ज्या दरांनी विकास आकार बसविलेले असेल ते दर विशेष बैठकीत सम्मत केलेल्या ठरावाव्दारे मान्य होईल. माझा याठिकाणी पहिला प्रश्न आहे प्रशासनाला कि, प्राधिकरणानी म्हणजे नागपूर महानगरपालिकेनी अश्याप्रकारचा कुठला ठराव केलेला आहे काय ? हा माझा पहिला प्रश्न राहिल याठिकाणी आणि दुसरा प्रश्न असा आहे कि, ब मध्ये म्हटले आहे कि, असा ठराव सम्मत करण्यांत आल्यानंतर प्राधिकरण राज्य सरकारला त्यांची मान्यता घेण्याकरिता पुढील कार्यवाही पाठवेल, आणि याठिकाणी राज्य सरकारनी तुम्हाला परवानगी दिलेली आहे काय ? तुम्ही राज्य सरकारला पत्र पाठविले त्याच्यावर राज्य सरकारचे उत्तर आलेल आहे काय ? त्याची सुध्दा माहिती मला प्रशासनाकडुन अपेक्षित आहे. आणि तिसरा महत्वाचा मुद्या हा आहे कि, हया १०० टक्के विकास शुल्क वाढीसाठी प्रशासनानी काय प्रोसेस केलेली आहे. तो प्रोसेस प्रशासनानी केली नाही, हा माझा पहिला आरोप आहे याठिकाणी ही प्रोसेस फॉलो न केल्यामुळे टॅक्नीकल ग्राउंडवर हे झालेले नाही आणि त्याचा भुर्दंड नागपूर शहराच्या जनतेवर बसत आहे. याची आवश्यकता नागपूर शहराच्या जनतेला आहे काय ? आणि ही जी अमाउंट आहे आपण ती कोणत्या अकाउंटमध्ये टाकतो आहे आणि आपण आपल्या पांच टक्क्यांचा जो शेअर आहे, तो नागपूर मेट्रोला द्यावयाचा आहे. अश्याप्रकारचा हा प्रस्ताव आहे, आपल्याला त्याच्यातला पैशा मिळणार नाही तो आपण वसुल करुन नागपूर मेट्रोला देणार आहे. मी यामध्ये म्हटले आहे कि जी रक्क्म वसुल करुन मेट्रोला द्यावयाची आहे मग प्रश्न असा उपस्थित होतो कि, पांच टक्के रक्कम नागपूर महानगरपालिकेला शेअर म्हणुन या प्रकल्पाला महानगरपालिकेला द्यावयाचा आहे. म्हणुन महानगरपालिकेनी १०० टक्के वाढीव शुल्क वुसल करुन हा जो पैसे मेट्रोला ट्रांस्फर करावयाचा आहे अश्याप्रकारची ही तरतुद केली आहे काय ? मा.महापौरजी, याठिकाणी प्रश्न उपस्थित होतो कि नागपूर मेट्रोला पांच टक्के जो शेअर द्यावयाचा आहे तो शेअर किती येतो, सन २०१२ ला मी स्थायी समिती अध्यक्ष असतांना एक प्रस्ताव पारीत केला होता कि, ते अमेंडमेंट झाले, टोटल प्रकल्प माझ्या माहितीनुसार ९ हजार कोटी रुपयांचा होता आणि याच्यामध्ये साडे चारशे किंवा पांचशे कोटीच्या दरम्यान कुठे तरी मेट्रोला हा पैसा द्यावयाचा आहे. मा.महापौरजी, याच्यामध्ये असा ही प्रश्न उपथित होतो कि आतापर्यंत आपण मेट्रोला किती रुपये दिलेले आहे. याची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही, परंतु आपण एक्झेट किती कोटी रुपये मेट्रोला दिले आहे. हे सुध्दा माहित होणे आवश्यक आहे. दुसरा महत्वाचा पार्ट असा आहे कि, असे कुठे म्हटले आहे कि, आपण मेट्रोला कॅश रेव्हेन्यु द्यावा, असे कुठेही म्हटले नाही, आपण ते कुठल्याही स्वरुपात देवु शकतो. माझ्याजवळ जी माहिती आहे, ईवन सभागृहाजवळ जी माहिती आहे, आपण अनेक प्रस्ताव मेट्रोला जागा देण्याच्या संदर्भात या

| |
|---|
| महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये आणले आहे. म्हणजे आपण बाजाराच्या जागा महामेट्रोला देतो आहे. आपल्या रस्त्यामधल्या जागा आपण महामेट्रोला देतो आहे. आपण आपल्या असेसटच्या जागा महामेट्रोला दिलेल्या आहे. हया असेसट आपल्या उत्पन्नाच्या स्त्रोत फयुचरमध्ये राहु शकतात, परंतु आपण त्या जागा महामेट्रोला दिलेल्या आहेत. याची किमत किती आहे तर असे लक्षात येते कि ती कोटी रुपयांच्या दरामध्ये आहे, यामुळे पहिला मुद्दा असा आहे कि, आपण महामेट्रोला पैसे देणे आवश्यक आहे काय ? हया असेसटस कश्यामुळे क्रियेट करतो आपण या शहराच्या जनतेच्या टॅक्सच्या पैशातुन महानगरपालिकेनी त्या जागा ताब्यात घेतल्या, त्या जागा आपल्या असेसट आहे. मग परत नागपूर शहराच्या जनतेवर याचे भुर्दड लादावयाचे काय ? त्याचे पैसे ऑलरेडी नागपूर शहराच्या जनतेनी दिलेले आाहे. त्या जनतेला परत आपण सांगायचे काय कि पुन्हा यासाठी आपण पैसे द्या. आणि तिसरा महत्वाचा मुद्दा कि २०१६ मध्ये १२४ ब मध्ये ही अमेंडमेंट का करण्यांत आली. याचा टॅक्नीकल आपण विचार केला याचा एक लॉजिकल विचार केला तर आपल्याला सहज लक्षात येईल कि, महानगरपालिकेला पांच टक्के शेअर द्यायचा आहे, तो समझा महानगरपालिकेला येवढे पैसे टॅक्सच्या स्वरुपात येवु शकते काय ? याचा सुध्दा विचार होणे आवश्यक होते. आणि हे ठरविण्याचा अधिकार त्या स्थानिक प्राधिकारणला रहावा म्हणुन मला असे वाटते कि १२४ ब मध्ये अमेंडमेंट करुन ही प्रोसेस टाकण्यांत आलेली आहे. आणि या संपुर्ण प्रकरणामध्ये गेले तर आपल्या असे लक्षात येईल कि, या शहराच्या जनतेवर भुर्दंड बसवितांना या शहराच्या जनतेनी ज्याच्यावर विश्वास टाकुन आपले विश्वस्त म्हणुन त्यांना नागपूर महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये पाठविले त्या विश्वस्तांनाच विश्वासात न घेता परस्पर हा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यांत आला आणि मला असे वाटते कि प्रशासन याबाबतीमध्ये या संपुर्ण नियोजनामध्ये प्रशासनाची कुठे तरी गल्लत होत आहे, म्हणुन या अगोदरच्या सभेमध्ये सुध्दा मी हा विषय चर्चेत आणला होता आपल्याला निवेदन केले कि, हा जो विषय आहे हा अत्यंत महत्वपुर्ण विषय आहे. याच्या अगोदर हा प्रस्ताव नागपूर महानगरपालिकेच्या सभागृहाच्या पटलावर यावयास पाहिजे होता, त्यावर चर्चा व्हावयास पाहिजे होती मेट्रोला आपण किती पैसे दिले आहे, त्याची माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे. किती पैसे द्यावयाचे आहे याची माहिती मिळाली पाहिजे, हया संपुर्ण प्रकरणाची माहिती महानगरपालिकेच्या सर्व मा.सदस्यांना असावी आणि याच्यात खरेच १०० टक्के भुर्दंड घेणे आवश्यक आहे काय ? यावर संपुर्ण मंथन व्हावे, या दृष्टीने मी हा स्थगन प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावावर सर्व मा.सदस्यांनी आपले मत मांडले तरी काही हरकत नाही. प्रशसासनानी आपले मत या विषयाच्या संदर्भात मांडावे, आपले वर्जन याठिकाणी द्यावे, मी नागपूर शहराच्या नागरिकांना न्याय देण्याकरिता या स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातुन निवेदन करीत आहे. |
| महापौर :- मा.सत्तापक्षनेत्यांनी जे निवेदन केले आहे, त्याच्यावर प्रशासनानी आपले उत्तर द्यावे. |
| श्री.राउत (संचालक,नगररचना) :- मा.महापौरजी, मोठया शहराकरिता वाहतुकीचे सक्षमीकरण करण्याकरीता आणि लोकसंख्या बघता वाहतुक नियोजित करणे ३०.०१.२०१४ रोजी एक शासन निर्णय काढण्यांत आला आणि त्यामध्ये म्हटले आहे कि, याचे आर्थिक सूत्र काय राहणार आहे, आर्थिक सूत्रानुसार जे उत्पन्न होणार आहे त्याच्यामधील ५० टक्के रक्कम मेट्रोला द्यावी, आणि दुसरे असे आहे कि विकास शुल्कामध्ये १०० टक्के वाढ करण्यासाठी तरतुद करणे, त्यानुसार ही रक्कम अश्या प्रकल्पासाठी वापरणे, या अनुषंगाने सॅक्शन १२४ ब (२) मध्ये तरतुद करण्यांत आलेली आहे. ती अशी आहे नागपूर मेट्रोनी अतिशय महत्वाचा नागरी प्रकल्प करण्याचे ठरविले असून (वाचले) याच्यामध्ये १०० टक्के विकास शुल्क वाढ करण्याचे शासनानी सूचित केले आहे. हा बदल कायद्यानुसार करण्यांत आलेला आहे. ३०.०६.२०१६ रोजी नागपूर मेट्रोचा हा प्रकल्प महत्वकांक्षी प्रकल्प म्हणुन घोषित करण्यांत आला म्हणुन ही सुधारणा झालेली |

| |
|---|
| आहे. ही सुधारणा लागु करण्यासाठी विकास शुल्कामध्ये १०० टक्के वाढ करण्यांत आली आहे. मुंबई आणि ठाणेला हे लागु होते आहे आणि त्यांनी लागु केले आहे. हे डिम सॅक्शन आहे. |
| श्री प्रविण पटके :- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, मुंबईत लागु केले आहे काय ठाण्याला लागु केले आहे काय याच्याशी महानगरपालिकेचा काही संबंध नाही. मा.महापौरजी, महाराष्ट्र राज्याचा कायद्या तयार करणारी विधान सभा व विधान परिषद आहे, असे या शहराच्या नागरिकांना वाटत आहे, ही प्रोसेस फॉलो करीत असतांना नागपूर महानगरपालिकेच्या मा.सदस्यांना विश्वासात घेण्यांत आलेले नाही. धंतोली याठिकाणी १०० टक्के विकास झालेला आहे. त्याठिकाणी १०० टक्के विकास शुल्काची डिमांड पाठविण्यांत आली आहे. हा प्रस्ताव सभागृहाच्या मा.सदस्यांना विश्वासात न घेता करण्यांत आला असल्यामुळे या सभागृहाचे मा.सदस्य हे सहन करणार नाही, ते कुठल्याही पक्षाचे असो, ठाण्यात काय झाले, मुंबईत काय झाले, त्याचा नागपूर महानगरपालिकेशी काही देणे घेणे नाही. ज्या अधिका-यांनी अश्या विचित्र पध्दतीचा प्रस्ताव तयार केला असेल, त्या संदर्भात मा.सत्तापक्षनेत्यांनी या विषयाच्या संदर्भात सखोल मत या सभागृहात ठेवले आहे. त्यांनी जो स्थगन प्रस्ताव मांडला आहे तो आपण मंजूर करावा व हा प्रस्ताव रद्द करण्यांत यावा. |
| श्री अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, पाईंट ऑफ इंफार्मेशन, मा.राउत साहेबांनी ज्या पध्दतीने वर्जन केले त्यांच्या वर्जनमध्ये असे आले कि, हे डिम सॅक्शन आहे. २०१६ ला कायद्या मंजूर झाल्यानंतर हा डिम सॅक्शन आहे आणि यांची उतरण आपण जर पाहिली तर त्या १२४ (ब) ची उतरण अशी आहे कि, माझ्यासारख्या सामान्य नगरसेवकांनी ज्याला प्रशासनाचा काहीच अधिकार नाही, त्याला असे कळते कि, ही उतरण कशासाठी टाकली या जी.आर.मध्ये तर मा.महापौरजी, १२४ क मध्ये काय म्हटलेले आहे, कलम १२४ ब अन्वये विकास आकारावयाचे संबंधाने विनिमयांना राज्य सरकारनी मंजूरी दिल्यानंतर राज्य सरकार त्यांच्या मंजूरीमध्ये विनिमयनांच्या करावयाच्या दिनांकानंतर अधिसूचना प्रसिघ्द करेल्, आणि याच्यामध्ये सगळा घोळ आहे, १२४ ब २, १, क याच्यामध्ये म्हटले आहे कि १०० टक्के वाढ करावी. पण १२४ ब २,३, च्या अनुषंगाने एक प्रोसेस आहे त्या प्रोसेसला प्रशासन कोणतेही उत्तर देण्यांस तयार नाही. ती प्रोसेस करावी लागेल, आणि ती प्रोसेस संपल्यानंतर मग १२४ ब संपणार आहे, आणि मग १२४ क सुरु होणार आहे. प्रशासनानी १२४ ब पुर्णपणे संपविला नाही, आणि ते १२४ क वर गेले मग १२४ ब चा पार्ट कशासाठी टाकला आहे. हा डिम सॅक्शन झालेला पार्ट कशाला टाकला आहे. मा.महापौरजी, दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे कि हा जो परिपत्रक जानेवारी २०१५ ला निघालेला आहे, त्यात काय म्हटले आहे. राज्य सरकारच्या परिपत्रकामध्ये मा.राज्यपाल महोदयांची सही असते, आणि राज्याच्या संबंधित विभागाचे नांव असते, परंतु हे परिपत्रक कोणी काढलेले आहे तर मा.आयुक्त, श्री राधाकृष्ण बी यांच्या माध्यमातुन हे परिपत्रक काढण्यांत आलेले आहे. मग आम्ही कोणत्या आधारावर हे गृहित धरावे कि याला राज्य सरकारची मंजूरी आहे. राज्य सरकारच्या मंजूरीचा कुठलाही उल्लेख त्या फाईलमध्ये नाही. तुम्ही १०० टक्के विकास शुल्क घ्या, पण याची आवश्यकता आहे काय ? हे सर्व डिसाईड करण्याचा अधिकार महानगरपालिकेला नाही आहे काय ? आणि महानगरपालिकेनी हे ठरवायचा म्हणुन १२४ ब ३ हे मुद्या डिम करीता टाकलेला आहे आणि ज्यावेळेला नागपूर महामेट्रो रेल या प्रकल्पाचा मुद्या आला त्यावेळी आपण १२४ ब ला बायपास करीत आहे. आणि आपण असे किती वेळेस केले आहे यावर सुध्दा सभागृहामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. अश्याप्रकारे आपण मेट्रोला किती जागा देवुन चुकलो आहे याची माहिती देण्यांत यावी, यावर निवेदन प्रशासनानी करावे. |
| महापौर :- प्रशासनानी याचे उत्तर द्यावे कि आतापर्यंत आपण मेट्रोला किती जागा देवुन चुकलो आहे, |

त्याची किमत किती आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, एक माहिती आपल्या माध्यमातुन सचिवांना विचारावयाची आहे कुठल्या सदस्यांनी स्थगन प्रस्ताव टाकला तर त्यावर मतदानाची परवानगी या सदनाला आहे काय ?

निगम सचिव :- मा.महापौरजी, स्थगन प्रस्तावासंदर्भात मतदानाबाबत लिहिलेले नाही, मात्र यावर चर्चा करण्याबाबतची प्रोव्हीजन आहे.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, समझा स्थगन प्रस्तावावर दोन मत असेल सभागृहाचे तर त्याच्यावर मतदान घेता येतो काय ?

निगम सचिव :- मा.महापौरजी, मा.सदन, यामध्ये तसे स्पष्ट नमुद केलेले नाही.

श्री प्रविण दटके :- मा.महापौर सदनाचे प्रमुख आहे, ते या स्थगन प्रस्तावावर उचित निर्णय घेतील.

महापौर :- प्रशासनानी मा.अविनाशजी ठाकरे यांनी जी माहिती विचारली आहे, त्याचे उत्तर द्यावे.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, तसा जी आर आलेला होता आणि जी आर प्रमाणे पांच प्रतिशत कॉट्रीब्युशन होता, त्यात ७३ कोटी निधी स्वरुपात आणि ३६१ कोटी भुसंपादनाच्या स्वरुपात नागपूर महानगरपालिकेचा कॉट्रीब्युशन आहे, त्या अनुषंगाने लॅन्ड देतांना आपण एक कॉटन मार्केटची लॅन्ड दिलेली आहे, सभागृहाच्या ठरावानुसार, टोटल ती लॅन्ड आहे ४७.९९६ चौरस मिटर आहे, आणि मालकी महाराष्ट्र शासनाची आहे आणि व्यवस्थापन आपल्याकडुन होत होते, त्यापैकी आपण ४८९ चौरस मिटर जागा हॅन्ड ओव्हर केलेली आहे. त्याची किमत येते ४ कोटी २३ लाख, याच्यानंतर नेताजी मार्केटची जागा आपण हॅन्ड ओव्हर केलेली आहे.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, सभागृहानी एकुण जी जागा मेट्रोला हॅन्ड ओव्हर केली आहे त्याची एकुण किंमत किती आहे आणि ती जागा किती आहे. पोद्यारेश्वर राम मंदिराच्या बाजुचा कॉटन मार्केट पर्यंतचा भाग मला असे वाटते कि आपण त्या जागेचा ठराव केलेला आहे. कॉटन मार्केट आहे, तेथे एक शाळा पण होती, भाजी मार्केट, अशी किती जागा आपण मेट्रोला दिली. त्याचे क्षेत्रफळ किती आहे, त्याची माहिती स्थावर अधिका-यांनी द्यावी.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, कॉटन मार्केटची जी जागा आहे एकुण जागा त्याचे क्षेत्रफळ आहे १७४२४ त्यापैकी म.न.पा.च्या मालकीची प्रत्यक्ष जी जागा आहे.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, सध्या किती जागा आपल्या ताब्यात आहे, आपण किती जागा देण्याचा ठराव सभागृहात केला आहे.

सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, सभागृहानी ठराव क्रमांक ३४० अन्वये नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरीता निर्णय घेतलेला आहे, नागपूर महानगरपालिकेनी ९ जागेचा ताबा नागपूर मेट्रोला खालील नमुद अटीच्या अधिन राहुन देण्याचा प्रस्ताव मंजूर केला होता. त्यात गोल बाजार तेथील जागा मेट्रोला हॅन्ड ओव्हर करण्याकरिता सभागृहानी मंजूरी दिली. जुने जलप्रदाय कार्यालय, सिताबर्डी येथील ४०६२ चौरस मिटर जागा मेट्रोला हस्तांतरीत करण्याबाबत सभागृहानी निर्णय घेतला. खोवा बाजार सिताबर्डी येथील एकुण १४०००.८४ चौरस मिटर तसेच हिंदी भाषा शाळा, सिताबर्डी येथील जागा नेताजी मार्केट, सिताबर्डी येथील एकुण आराजित ३३४.४४ चौरस मिटर हिंगणा रोड जकात नाका २४९.२६० चौरस मिटर जागा देण्याचा सभागृहानी ठराव क्रमांक ३४० प्रमाणे मंजूरी दिली आहे.

| |
|---|
| श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, या व्यतिरिक्त अजुन काही जागा देण्याचा ठराव आपण घेतला होता काय ? याची माहिती देण्यांत यावी. |
| महापौर :- प्रशासनानी उत्तर द्यावे. |
| सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, या व्यतिरिक्त नागपूर महानगरापालिकेची दिनांक २०.०४.२०१८ रोजी साधारण सभा झालेली होती त्यामध्ये ठराव क्रमांक २२१ या अनुषंगाने असा निर्णय घेतलेला होता कि, कॉटन मार्केट चौक ते खोवा मार्केट दरम्यानची महानगपालिका मालकीची व महानगरपालिकेच्या व्यवस्थापनात असलेली एकुण ६७०४२४.६४ चौरस मिटर जागेपैकी महानगरपालिकेच्या मालकीची २२७२४.६७ चौरस मिटर जागे पैकी यापैकी स्थानतरीत केलेली खोवा मार्केट या भागाकरिता ४७ चौरस मिटर जाग व हिंदी भाषी शाळा परिसरातील ६२.६८५ चौरस मिटर जागा वगळुन उर्वरीत ७०.६४ चौरस मिटर जागा अटी व शर्तीच्या अनुषंगाने देण्यांत येत आहे. |
| श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, याच्या व्यतिरिक्त अजून काही जागा आपण मॅट्रोला अलॉट केल्या आहेत काय ? त्याची माहिती सभागृहाला उपलब्ध असेल तर देण्यांत यावी. |
| सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, या व्यतिरिक्त ठराव सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही, माझ्या माहितीप्रमाणे या दोन ठरावानुसार जागा हस्तांतरीत केलेली आहे. |
| श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, आता सहा.आयुक्त, श्री मिलींद मेश्राम साहेबांनी ही माहिती सभागृहात दिली, त्या एकुण जागांची एकत्रित किंमत त्यांच्याकडे असेल त्या जागेची एकुण किंमत किती आहे, ते पण त्यांनी सभागृहात सांगावे. |
| सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, आम्ही जे कॅल्क्युलेशन केले त्या कॅल्क्युलेशनमध्ये म्हणजे इतर जागा पकडलेल्या आहेत, मेट्रोनी आपली जी जागा वापरली आहे, असे सगळया लॅन्डची माहिती आम्ही काढलेली आहे १०७८.७७ कोटी |
| श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, आणि आता आपल्याला आणखी किती निधी द्यावयाचा आहे. |
| सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, आपल्याला ४३४ कोटी रुपये द्यावयाचे होते व ६३ कोटी रुपये निधी स्वरुपात द्यावयाचे होते, ३६१ कोटी हे भुसंपादनाच्या माध्यमातुन द्यावयाचे होते. निधी स्वरुपाचा नगररचना विभागाच्या प्राप्त माहिती नुसार आतापर्यंत ५३ कोटी दिल्याचे निदर्शनास येत आहे. माझ्याजवळ दोन महिन्यापूर्वीचे आंकडे आहे, त्यानंतर नगररचना विभागानी त्यांना डायरेक्ट ट्रांस्फर केले असेल तर त्यांच्याकडुन माहिती घेणे सोयीचे होईल. |
| श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, आपण १ हजार कोटी रुपयांच्यावर्ती जमिन त्यांना हॅन्ड ओव्हर केलेली आहे. आणि ५३ कोटी रुपये दिले आहे व दोन महिन्यात नगररचना विभागानी काय दिले आहे याची माहिती आपल्याकडे नाही. आपण नागपूरच्या जनतेच्या टॅक्सचे पैसे अश्या त-हेने त्यांना देत आहे, या बाबीचा मी निषेध व्यक्त करतो. आपण कायद्याचे पालन करुन या गोष्टीकडे लक्ष द्यावे, अशी माझी सभागृहात विनंती आहे. |
| महापौर :- मा.आयुक्त महोदय या विषयाच्या संदर्भात निवेदन करु इच्छितात |
| निगम आयुक्त :- मा.महापौरजी, याठिकाणी मी सांगु इच्छितो एक अत्यंत महत्वाचा विषय आहे, ४३४ कोटी रुपये आपला कॉंट्रीब्युशन आहे ५ टक्यांचा आणि हे ५ टक्क्यांचा कॉंट्रीब्युशन दोन कॅटागिरीमध्ये देणे अपेक्षित आहे, जसे दटके साहेब सांगतात, आपला लॉस होत आहे ती बाब आम्ही पत्र स्वरुपात मॅट्रोला कळविली आहे. आमचे राईट ऑफ वे सगळया मिडियाव्दारे तुम्ही टेकन केलेले आहे, |

त्याचे व्हल्युवेशन काढुन अश्याप्रकारे संपुर्ण पैसे आमच्याकडुन दिले गेलेले आहे. कृपया आमच्याकडे काही मागणी करु नका, तुमच्याकडे जे एक्सेस पैसे आहे ते तुम्ही आम्हाला द्या, अश्याप्रकारचे पत्र आम्ही त्यांना दिले आहे. त्यानंतर त्यांच्याकडुन काही डीपीआर व ज्या अटी शर्तीवर त्यांना भारत सरकार व महाराष्ट्र सरकारनी मंजूरी दिलेली आहे, ते आपल्याला दाखविण्यांत आले, त्यांचे स्पष्ट म्हणणे आहे, जे कागदावर ते दाखवितात, ज्या पध्दतीचे आम्ही त्यांना पत्र दिले होते त्यांच्या अप्रुव्हलमध्ये राईट ऑफ वे साठी कुठलीही लॅन्ड ॲक्वीजीशन कॉस्टकरिता देय अपेक्षित नाही, म्हणजे फ्रि ऑफ कॉस्टमध्ये द्यावयास पाहिजे, या अटी नुसार भारत सरकार व गर्व्हमेंट ऑफ महाराष्ट्रानी मंजूरी दिली आहे. कुठल्याही मेट्रोनी त्यांच्या शहराकरिता राईट ऑफ वे ज्याला आपण करतो त्याला लॅन्ड फुकट भेटते त्यामुळे माझे पण जसे दटके साहेबांचे ओपिनियन होते तसेच ओपिनियन होते, यामध्ये आपले जे दायित्व आहे ४३४ पैकी ६७ कोटी रुपये आजपर्यंत आपण दिलेले आहेत. त्यांना आपण लॅन्ड ॲक्वीझेशन कुठे करतो जेथे त्यांचा स्टेशन आहे. त्याठिकाणी त्यांच्या लॅन्ड ॲक्वीझेशनचे कॉस्ट आपण कॅल्क्युलेट करतो. यापध्दतीने आपण बाकीच्या ठिकाणी जसे कॉटन मार्केटमध्ये त्यांना जागा दिलेली आहे. आणि आज रोजी आपल्याकडचे दायित्व आपण त्यांना द्यावयास पाहिजे, त्यामध्ये ३६७ कोटी रुपये शिल्लक आहे, याकरिता शासनानी आपल्याला पांच प्रकारचे मार्ग सांगीतले आहे, १०० टक्के विकास शुल्क वाढविणे, स्टॅम्प डयुटीबद्यल, स्टॅम्प डयुटी आपल्याकडुन होत नसल्यामुळे मागच्या सभेमध्ये मा.सदस्यांनी आपल्या लक्षात आणुन दिले, त्याचा आपण तात्काळ पाठ पुरावा करतो व शासनाला सांगतो कि, आम्हाला जे पैसे मिळावयास पाहिजे होते ते मिळाले नाही. राहिले हे १०० टक्के डेव्हलपमेंट चार्जेस हे कायद्यामध्ये अंतर्भुत केल्यामुळे त्याला लागु करण्यांत आले आहे. आपल्या माहितीसाठी हे लागु करण्यापूर्वी त्याचे डिटेल्स देत आहे. अश्याप्रकारे याच्यापूर्वी मुंबई व ठाण्यामध्ये अश्याप्रकारे २ वन बी ची तरतुद लागु करण्यांत आली होती, त्याप्रमाणे आपल्याला नोव्हेंबर २०२० ला आपण तारीख सहित उल्लेख करुन त्याला पब्लिश केले आहे. आपण मेट्रोला दिलेल्या निधीमध्ये ५ टक्के आपले शेअर असल्यामुळे आपण मालक असल्यामुळे उद्या ऑपरेशन मेनटेनेंसचे सुध्दा काही प्रमाणात शेअर ठेवावे लागेल. त्यामुळे त्याच्यासाठी सुध्दा ही निधी कायमस्वरुपी आपल्याला स्वत:च्या मदतीसाठी उपयोगी पडणार आहे. याकरिता हे खुप महत्वाचे आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, एक अतिशय महत्वाचा मुद्दा याठिकाणी मा.आयुक्तांनी उपस्थित केला आहे कि, स्टॅम्प डयुटीच्या माध्यमातुन जो निधी आहे, तो सुध्दा या प्रोजेक्टमध्ये आपण वापरणार आहे. मा.महापौरजी, आपण जी माहिती रजिस्टर्ड ऑफिसमधुन गोळा केली आहे, त्यानुसार २६७ कोटी रुपयांचा निधी निघालेला होता आणि २६७ कोटी रुपयांचा तो निधी असेल त्यातुन आपण ६०-७० कोटी रुपये त्यांना दिले असेल तर आपल्यावर लायबिलीटी फार कमी आहे आणि आपण दिलेल्या स्टेशनच्या जागा त्याची आपण व्हॅल्युवेशन काढली तर आपली लॉयबिलीटी ५० कोटीच्या जवळपास राहिली असती मग ही १०० टक्के वाढ कशाला प्रस्तावित करायची आणि याचा टाईम पिरीअड असला पाहिजे कि, किती वर्षामध्ये त्यांना आपल्याला ५ प्रतिशत द्यावयाचे आहे. किती वर्ष त्यांना हे पैसे द्यावयाचे आहे, किती वर्षात तो कंप्लीट करुन द्यावयाचे आहे, याबाबत प्रशासनानी माहिती द्यावी.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, त्यांच्या याच्यात म्हटले आहे कि टाईम डयुरेशनमध्ये सर्व माहिती देणे अपेक्षित आहे, मा.महापौरजी, प्रोजेक्ट कंप्लीट होण्यापूर्वी हे करणे आवश्यक आहे. आज रोजी मेट्रोचा काही पार्ट ऑपरेशनाईज्ड करण्यांत आला आहे, दुसरी माहिती मी सभागृहासमोर मांडु इच्छितो ती अशी आहे कि, यामध्ये ओरिजनल कॉस्ट ८६८० कोटी रुपयांची यामध्ये पांच टक्के ४३४ कोटीचे, आता रिव्हाईज्ड कॉस्ट वाढल्यामुळे ९७५९ कोटी जवळपास ९०० कोटीनी कॉस्ट वाढलेली आहे, त्यानुसार

| |
|---|
| आपला शेअर सुध्दा पांच टक्के वाढला पाहिजे होता परंतु आपण त्यांना क्लिअर कट सांगीतले आहे कि, याच्या व्यतिरिक्त कमिटमेंट आम्ही पुर्ण करणार नाही. अदरवाईज याच्यामध्ये आम्ही पैसे वाचविलेले आहे. जी कमिटमेंट आम्ही दिली आहे तेवढीच आम्ही पूर्तता करतो, यासाठी सुध्दा आम्हाला वेळ द्यावयास पाहिजे. कदाचित आपण २०१६ मध्ये हे राबविले असते तर आतापर्यंत याची पूर्तता झाली असती, असे मला सांगावयाचे आहे. |
| श्री.अविनाश ठाकरे :-मा.महापौरजी, यामध्ये मा.निगम आयुक्तांनी आपले मत मांडले आपल्या समोर हा फार महत्वाचा प्रश्न आहे कि, आपण या शहराच्या जनतेला दिलासा दिला पाहिजे. टोटल चर्चेवरुन हे लक्षात आले आहे कि, आपल्याला ४३४ कोटी रुपये मेट्रोला द्यावयाचे आहे. २६४ कोटी रुपये ऑलरेडी स्टॅम्प डयुटीच्या माध्यमातुन आपले जमा आहे, आपण ५३ कोटी रुपये ऑलरेडी त्यांना दिलेले आहे, आणि दोन महिन्यामध्ये आपण आणखी पैसे दिले असेल, सोबतच आपली जी जागा स्टेशन करिता आपण त्यांना दिलेली आहे, मग उरलेला जो निधी आपल्याला द्यावयाचा आहे तो देण्यासाठी एक टाईम पिरीअड टाकण्यांत यावा. त्या अनुषंगाने एक मत या सभागृहाचा आहे कि आपण ही शुल्क वाढ करु नये कारण कि, स्टॅम्प डयुटी रेव्हेन्युमधुन आपल्याला पैसा येणार आहे. यामुळे सभागृहाला असे वाटत आहे कि याठिकाणी १०० टक्के वाढ करण्याची आवश्यकता नाही. वेगवेगळया माध्यमातुन आपण तो पैसा त्यांना देवु शकतो, आणि यामुळे मला असे वाटते कि, सर्व सभागृहाचे मत घेण्याकरिता मी जो प्रस्ताव मांडलेला आहे कि, १०० टक्क्यांची वाढ करणे आवश्यक नाही, तसाही वेगवेगळया माध्यमातुन पैसा गोळा होत आहे, त्यामधुन आपण ४३४ कोटी रुपयांची ग्रँट पुर्ण करु शकतो, म्हणुन सभागृहाचे मत घेण्याकरिता हा प्रस्ताव मतदानाला टाकण्यांत यावा, अशी माझी आपणांस विनंती आहे. |
| श्री तानाजी वनवे :- पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी, कार्यालयानी याची व्हॅल्यूवेशन कशी काढली याची माहिती देण्यांत यावी. |
| महापौर :- मा.विरोधी पक्षनेते श्री तानाजी वनवे यांचे प्रश्नाचे उत्तर प्रशासनानी द्यावे. |
| सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, त्या जागेचा एरीआ आणि त्या जागेचा येणारा दर याआधारे त्याचा मुल्यांकन काढण्यांत आलेला आहे. |
| श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, हे मुल्यांकन कोणी काढले, आपल्या कर्मचा-यांनी काढले आहे काय ? किंवा कोणत्या एजंसीनी काढले आहे. |
| सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, हे मुल्यांकन स्थावर विभागाच्या माध्यमातुन काढण्यांत आलेले आहे. |
| श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, माझी माहिती अशी आहे कि, हे मुल्यांकन चुकिचे काढण्यांत आलेले आहे. याच्यामध्ये डबलचा फरक दिसतो आपल्याला महामॅट्रोला पैसे देण्याची गरज नाही, आपण जागेचा मुल्यांकन कमी काढलेले आहे. आपण मुल्यांकन कोणत्या पध्दतीने काढले, आपली येवढी महत्वाची जागा आपण त्यांना दिली आहे, ती अरबो रुपयांची जागा आहे. आपण याचे मुल्यांकन कमी काढुन एकप्रकारे म.न.पा.वर आर्थिक बोजा लादुन घेतला आहे. हया ९ जागा महत्वाच्या आहे, त्याची किंमत अरबोमध्ये आहे. याचे मुल्यांकन जर आपण एखाद्या एक्सपर्टकडुन काढुन घेतले असते तर याठिकाणी आपल्याला परत महामॅट्रोकडुन पैसे घ्यावे लागतील. अशी माझी माहिती आहे. |
| श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, मी आपल्या माध्यमातुन सचिवांना प्रश्न विचारला होता कि, याबाबत प्रस्ताव मतदानाला टाकता येवु शकते काय ? आपली सभेची संचालन नियमावली आहे पांन |

| |
|---|
| क्रमांक ७ वर वन वी मध्ये नंबर ३ मध्ये स्पष्ट लिहिले आहे. तो पॅरेग्राफ आपण वाचावयास लावला पाहिजे. |
| महापौर :- सचिवांनी तो पॅरीग्रॉफ वाचुन दाखववावा. |
| निगम सचिव :- मा.महापौरजी, स्थगन प्रस्तावाच्या संदर्भात वन वी परवानगी घेण्याची वेळ व कार्यकारीणी नियम वन ट नुसार प्रस्ताव मांडणे, पालिका सदस्यांनी प्रस्ताव मांडण्यासाठी पिठासीन अधिका-यांना महानगरपालिकेची परवानगी मागीतल्यानंतर पिठासीन अधिकारी महानगरपालिकेपुढे प्रस्ताव वाचेल व पालिका सदस्य महानगरपालिकेची परवानगी आहे किंवा कसे हे विचारेल, आक्षेप घेण्यांत आला तर पिठासीन अधिकारी स्थगन प्रस्तावास पाठिंबा देत असतील त्या पालिका सदस्यांस हात वर करण्यास सांगेल, सभेत उपस्थित सदस्यांपैकी दोन तृत्यांश सदस्य त्यानुसारर हात वर करतील तर पिठासीन अधिकारी त्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी त्यांना योग्य वाटेल अश्यावेळेपर्यंत महानगरपालिकेचे कामकाज स्थगित करेल, असे सूचित करेल. सभेत उपस्थित अश्या दोन तृत्यांश पेक्षा कमी सदस्य उठतील हात वर करतील तर पिठासीन अधिकारी महानगरपालिकेची परवानगी नसल्याचे पालिका सदस्यांस कळवेल. |
| श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, याचा अर्थ असा आहे कि दोन तृत्यांश सदस्यांच्या परवानगीने प्रस्ताव सभागृहात येत असेल तो प्रस्ताव आपण सभागृहात ठेवु शकतो. हा विषय आपण मतदानाला टाकु शकतो. हा जो स्थगन प्रस्ताव अविनाशजीनी आणला आहे त्याला आपण कृपया मतदानाला टाकावे, अशी माझी विनंती आहे. |
| अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, मा.महापौरजी मी हा जो स्थगन प्रस्ताव आणला आहे, या प्रस्तावाच्या अनुषंगाने एक ठराव महानगरपालिकेच्या पटलावर आणु इच्छितो आणि तो ठराव असा आहे कि, ३०.०६.२०१६ च्या अमेंडमेंटनुसार १२४ (ब) अनुसार जी १०० टक्के विकास शुल्कात वाढ करण्यांत आलेली आहे, महानगरपालिकेचा ५ टक्के शेअर मेट्रोला देण्याच्या अनुषंगाने ती ५ टक्के रक्कम ६३ कोटी रुपये महानगरपालिकेनी रेव्हेन्यु स्वरुपात दिलेले आहे, विकास शुल्क २०० कोटी रुपये शासनाकडे जमा आहे, नागपूर शहराच्या ज्या काही प्रापर्टी मेट्रोला स्टेशनकरिता दिलेल्या आहे, त्याची व्हॅल्युवेशन लक्षात घेता आज आपण ४३४ कोटी रुपयांच्या जवळपास पहोचलेलो आहे. ही सर्व बाब लक्षात घेता आणि ज्या प्रोव्हीजन आपल्याकडे उपलब्ध आहे त्यावरुन असे दिसुन येते कि आपल्याला विकास शुल्क घेण्याची आवश्यकता पडणार नाही. त्यामुळे मी हा ठराव मांडु इच्छितो, माझ्या ठरावाला नागपूर महानगरपालिकेच्या सर्व मा.सदस्यांनी एकमताने मंजूरी प्रदान करावी. अश्याप्रकारचा ठराव मी याठिकाणी मांडत आहे. |
| धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, माझा पाईंट ऑफ आर्डर असा होता कि, स्थगन प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यासाठी मतदान घ्यावयाचे आहे कि काय त्याचा आधी खुलासा होणे आवश्यक आहे. |
| महापौर :- विषय असा आहे कि मा.सदस्य, श्री दटके साहेबांनी सभागृहामध्ये जो विषय मांडला त्या विषयाचा वाचन सभागृहामध्ये करण्यांत आला, आणि जो वाचन करण्यात आला आहे त्याचे निष्पण असे आहे कि स्थगन प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मतदान याचा अर्थच तसा आहे, असे आपल्याला वाटले असेल म्हणुनच आपण पाईंट ऑफ आर्डर घेतला असेल असे मला वाटते पण त्याचे निष्पणच असे आहे कि सभागृहामध्ये त्याला महापौरांनी नकार दिला असेल व अश्यास्थितीत चर्चा घ्यावयाची असेल तर आपण मतदान करुन सभागृहाचे मत जाणुन घेतो त्याच्यासाठी त्याच्यात नियोजित करण्यांत आलेले आहे. असा त्याचा मानस आहे. |
| श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, नागपूर शहरात मेट्रो हा जो प्रोजेक्ट आलेला आहे, त्याच्यामध्ये |

| |
|---|
| नागपूर महानगरपालिकेचा सहभाग किंवा ज्या काही बाबी या स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने सभागृहाच्या पुढे आल्या आहेत. मी याच्या संदर्भात हे बोलु इच्छिते कि या विषयात आम्हालाही अभ्यास करुन काही मुद्दे ठेवावयाचे आहे. त्यामुळे याकरिता एक विशेष सभा आपण लावली पाहिजे. कारण कि हा खुप मोठा प्रकल्प आहे. त्या प्रकल्पाअंतर्गत ज्या मुद्याला धरुन सत्तापक्षनेत्यांनी स्थगन प्रस्ताव लावलेला आहे त्यावर आम्हाला सुध्दा चर्चा करावयाची आहे. आणि त्याच्यानंतर एक चांगला निर्णय आपण सभागृहात घेवु शकु. |
| महापौर :- मा.विरोधी पक्षनेता श्री तानाजी वनवे यांनी एक प्रश्न उपस्थित केला होता कि, ज्या प्रोसेसनुसार आपण व्हॅल्युवेशन काढली आहे ती चुकिची आहे, प्रशासनाचा यावर काय मत आहे, ते प्रशासनानी थोडक्यात नमुद करावे. |
| सहा.आयुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौरजी, व्हॅल्युवेशन काढण्याची जी पध्दत आहे, कोणत्याही जागेचा करंट रेडी रॅक्नरचा जो रेट आहे तो ६३,०५०० पर स्केअर मिटर आहे, त्याप्रमाणे त्याची कॉस्ट १० कोटी ५० लक्ष रुपये येईल, त्याचप्रमाणे प्रत्येक ठिकाणी असलेल्या त्या जागेचा रेडी रॅक्नरचा दर व त्याच्या क्षेत्रफळानुसार त्याचे मल्टीफिकेशन करुन नियमान्वये व्हॅल्युवेशन आम्ही काढलेली आहे. |
| महापौर :- मा.विरोधी पक्षनेते, मेश्राम साहेबांनी सविस्तर सांगीतले आहे, आणि ती शासनानह निर्धारीत केलेली पध्दत आहे, त्याप्रमाणे मुल्यांकन करण्यांत आलेले आहे. |
| श्री तानाजी वनवे :- मा.महापौरजी, त्यांनी कोणत्या पध्दतीने व्हॅल्युवेशन केले आहे त्याचे डिटेल्स त्यांनी दिले तर आम्ही आमच्या पध्दतीने त्याचे दर काढु. |
| महापौर :- प्रशासनाला निर्देश देण्यांत येते कि, प्रशासनानी जे व्हॅल्युवेशन केलेले आहे त्याची शीट मा.विरोधी पक्षनेत्यांना देण्यांत यावी. या विषयावर सखोल चर्चा झालेली आहे. |
| श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, सत्तापक्षनेत्यांनी स्थगन प्रस्ताव मांडला, महानगरपालिका मालक असल्यामुळे निश्चितरुपाने नागपूर शहरातील सगळया नगरसेवकांची ही जबाबदारी बनते आपण जनतेच्या पैश्यातुन महामेट्रोला जे पैसे देत आहे, त्याचे नियोजन होत असतांना नागपूर शहरातील भुमीवर मेट्रो होत असल्यामुळे नागपूर महानगरपालिकेच्या विविध चौकामध्ये ठराव संमत करुन त्या जागेला आपण नांव दिले आहे, त्या महामेट्रोला त्याठिकाणावरुन जात असतांना जसा कांशीराम टी पाईंट आहे, संविधान चौक, दिक्षाभुमी आहे, इतरत्र इतरत्र जे स्थान आहे, ते नामकरण करण्याकरिता बाध्य करावा, अश्या पध्दतीचे निवेदन या माध्यमातुन सभागृहाला करण्यांत येत आहे. |
| **ठराव क्र. १३७**:- मा.सत्तापक्ष नेता यांनी सादर केलेला ठराव मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार त्यास सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.<br>**ठराव**<br>नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिका, नगर रचना विभागाव्दारे नागपूर महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम/विकास परवानगी देण्याकरीता विविध शुल्क आकारल्या जातात सन २०२०-२१ मध्ये नागपूर महानगरपालिका प्रशासनाने नागपूर महानगरपालिका सभागृहाची पुर्व मान्यता न घेता हा विषय सभागृहात सादर न करता अचानकपणे बांधकाम / विकास परवानगी देण्याकरीता एम.आर.ॲन्ड टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम १२४ बी अंतर्गत विकास शुल्कात (Development Charges) १०० टक्के वाढीने वसुल करणे सुरु केले आहे. विशेष म्हणजे ही रक्कम जमिनीच्या किमतीच्या टक्केवारीत |

घेण्यात येते त्यामुळे नागरिक / विकासकांवर मोठयाप्रमाणात आर्थिक भार लादला गेला आहे. कोविड – १९ महामारीची बिकट परिस्थिती आणि बांधकाम व्यवसाय क्षेत्रात आलेली घसरण यामुळे अगोदरच विकासाला खिळ बसलेली आहे, उद्योग धंदे ठप्प झाल्यागत असून बांधकाम कामगारांचे हाल होत आहे. या भरमसाठी शुल्क वाढीमुळे या व्यवसायावर आणखी आघात होवून यामध्ये सामान्य नागरिक आर्थिक संकटात असल्यामुळे तो भरडल्या जात आहे. या क्षेत्रात यामुळे संकट ओढवले आहे एम.आर.ॲन्ड टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम १२४ बी अंतर्गत विकास शुल्कात १०० टक्के वाढीने वसुल करणे सुरु आहे ही प्रक्रीया तात्काळ प्रभावाने रद्य करण्यात यावी.

**<u>ठराव क्र.१३८</u>:- नागपूर महानगरपालिका, विशेष समित्यांचे कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.**

१. **स्थापत्य व प्रकल्प विशेष समिती**
१) गुरुवार दि. ०८-०४-२०२१ दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त
बुधवार दि. १९-०५-२०२१ दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त

२. **वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती**
१) सोमवार दि. २०-०५-२०२१ दुपारी ०२-०० वाजता चे कार्यवृत्त
मंगळवार दि. २३-०३-२०२१ दुपारी ०२-०० वाजता चे कार्यवृत्त

३. **विधी व सामान्य प्रशासन विशेष समिती**
गुरुवार दि. १८-०३-२०२१ दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त

४. **शिक्षण विशेष समिती**
१) मंगळवार दि. २३-०३-२०२१ दुपारी ०१-०० वाजता चे कार्यवृत्त
मंगळवार दि. १५-०६-२०२१ दुपारी ०१-०० वाजता चे कार्यवृत्त

५. **क्रीडा विशेष समिती**
१) सोमवार दि. ०८-०३-२०२१ दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त
बुधवार दि. ०९-०६-२०२१ दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त

६. **गलिच्छ वस्ती निमुर्लन व घरबांधणी विशेष समिती**
१) सोमवार दि. १५-०३-२०२१ दुपारी ०४-०० वाजता चे कार्यवृत्त
शुक्रवार दि. १८-०६-२०२१ दुपारी ०३-०० वाजता चे कार्यवृत्त

७. **महिला व बालकल्याण विशेष समिती**
१) मंगळवार दि. १६-०३-२०२१ दुपारी ०२-३० वाजता चे कार्यवृत्त
२) बुधवार दि. २३-०६-२०२१ दुपारी ०२-०० वाजता चे कार्यवृत्त

८. **जलप्रदाय विशेष समिती**
१) बुधवार दि. १०-०३-२०२१ दुपारी ०४-०० वाजता चे कार्यवृत्त
२) गुरुवार दि. २४-०६-२०२१ दुपारी ०४-०० वाजता चे कार्यवृत्त

९. **दुर्बल घटक समिती**
१) बुधवार दि. १०-०३-२०२१ दुपारी १२-३० वाजता चे कार्यवृत्त
सोमवार दि. ०७-०६-२०२१ दुपारी १२-०० वाजता चे कार्यवृत्त

**<u>ठराव क्र.१३९</u>:- नागपूर महानगरपालिका, स्थायी समितीचे खालील तिमाही अहवाल कायम करण्याच्या प्रश्नाची सभागृहाने नोंद घेतली.**

१. म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १५–०३–२०२१ रोजी दुपारी १२–०० वाजता

| | |
|---|---|
| २. | म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १७—०३—२०२१ रोजी दुपारी १२—०० वाजता |
| ३. | म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ३०—०३—२०२१ रोजी दुपारी १२—०० वाजता |
| ४. | म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक ०६—०५—२०२१ रोजी दुपारी १२—३० वाजता |
| ५. | म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक २१—०५—२०२१ रोजी दुपारी १२—३० वाजता |
| ६. | म.न.पा. स्थायी समिती सभा दिनांक १५—०६—२०२१ रोजी दुपारी १२—३० वाजता |

**ठराव क्र.१४०/वि.क्र.६२ :-** कोव्हीड-१९ वाढत्या संक्रमणाच्या प्रभावामुळे संक्रमीत होत असलेल्या
**(कार्य.अभि. प्रकल्प)** नागपूर शहरातील नागरीकांनकरिता व लहान मुलांकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युनिव्हर्सिटी कॅम्पस येथे NICU, ICU,व कोविड केअर सेंटर उभारण्याबाबत.

कोव्हीड-१९ च्या वाढत्या संक्रमणाच्या प्रभावामुळे संक्रमीत होत असलेल्या नागपूर शहरातील नागरीकांनकरिता व लहान मुलांचे NICU, ICU,व कोविड केअर सेंटर उभारण्याकरिता आयुक्त, नागपूर महानगरपालिका नागपूर,यांना प्रदत्त असलेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम २०२० चे नियम ३,१० व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधिल अनुषंगीक तरतुदीन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन नागपूर शहरात वाढीव DCH/DCHC/CCC/इतर आवश्यक उपाययोजनांसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, अंबाझरी रोड, नागपूर येथील प्रशासकीय इमारतीतील पहिला माळा, दुसरा माळा, तिसरा माळा व तळ मजल्याचा काही भाग हा प्रशासकीय आदेश क्रमांक ४८/कोव्हीड-१९/२०२१, दिनांक ३१/०५/२०२१ अन्वये अधिग्रहीत करण्यात आलेला आहे. सदरील अधिग्रहीत केलेल्या इमारतीमध्ये ३० बेडेड् ICU, २० बेडेड् NICU व १५० ऑक्सिजन पाईप लाईन पांईट उभारणे व त्यास आवश्यक असणारे स्थापत्य विषयक कामे करणे, प्रस्तावित असून या कामास्तव प्राकलन राशी रु.१,२८,९०,९७१/- इतका खर्च पद क्र. A२३१०११४१९०८ अथवा A४३४०११७१३०४ (२०२१-२०२२) SDRF अंतर्गत प्रस्तावित आहे. उक्त कामाची तातडीची आवश्यकता लक्षात घेता, मा. सभागृहाचे मान्यतेच्या अधीन राहून सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन, कार्योत्तर मंजुरी करिता मा. सभागृहा समक्ष सादर करण्याचे, व मंजुरीस्तव प्रश्न विचारात घेणे.

उक्त कामाच्या अनुषंगाने प्रस्तावास मा. सभागृहाची मान्यता आवश्यक आहे. त्याअनुषंगाने विषयांकित प्रस्ताव मा. सभागृह समोर मंजुरीस्तव सादर करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.१४१/वि.क्र.६३ :-** दिनांक ३० मे, २०२१ रोजी झालेल्या स्थगीत सभेत आर्थिक वर्ष २०२१-२२
**(कर व करआकारणी विभाग)** करीता अर्थसंकल्पीयअंदाज स्वीकृत करतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १४०-अ च्या तरतूदीन्वये नागपूर महानगरपालिका सभागृहास प्रदान असलेल्या अधिकारांतर्गत सभागृहाने खालीलप्रमाणे निर्णय घेतल्याचे निदर्शनास येते परंतू उक्त सभेचे इतिवृत्त टंकलेखीत करतांना घेतलेल्या निर्णयाचा काही भाग सुटल्याचे मा. महापौर महोदयांनी दि.१२/०७/२०२१ रोजीच्या टिप्पणी अन्वये निर्देशीत केलेल्या बाबीवरून निदर्शनास येते.

१) चालू आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर दि.३० जून, २०२१ च्या पूर्वी नागपूर महानगरपालिका निधीत जमा करणाऱ्या मालमत्ताधारकास मालमत्ता कर रक्कमेत १०% सुट तसेच हा निर्णय होणे पूर्वी ज्या नागरीकांनी Sou-moto चालू आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर जमा केलेला असल्यास त्यांना सुद्धा मालमत्ता कर रक्कमेत १०% सुट आणि
२) दि.३० जून, २०२१ च्या नंतर व दि.३१ डिसेंबर, २०२१ च्या पूर्वी चालू आर्थिक वर्षाची मालमत्ता कर रक्कम नागपूर महानगरपालिका निधीत जमा करणाऱ्या मालमत्ताधारकास मालमत्ता कर रक्कमेत ५% सुट

परंतू उपरोक्त अनु.क्र.२ प्रमाणे घेतलेला निर्णयाचा भाग हा उक्त सभेचे इतिवृत्त टंकलीखीत करतांना सुटला

नागपूर महानगरपालिकेच्या सभागृहाने सभेत घेतलेला निर्णय त्या सभेचे इतिवृत्त टंकलिखीत

करतांना अंशत: सुटलेला असल्याचे मा. महापौर महोदयांचे निदर्शनास आल्याने सभेत घेतलेला निर्णय, सदर सभेचे इतिवृत्त टंकलेखन करतांना सुटलेला असल्यास सुटलेल्या निर्णयाचा भाग त्या दिवशीच्या सभेच्या इतिवृत्तात समाविष्ट करणेबाबत उचित निर्णय घेणेचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, मदर डेरीचा जो प्रस्ताव या सभागृहात आलेला आहे त्या बद्यल स्वागत आहे परंतु मदर डेरीच्या संदर्भात काही लोकांनी अर्ज केलेला आहे. त्यालोकांची सुध्दा मागणी आहे त्यामुळे खाली असलेली जागा जेणेकरुन रोडला अडचण होणार नाही अशाप्रकारची जागा देण्यात यावी.

श्री.नरेंद्र बोरकर :- मा.महापौरजी, मदर डेरीला जागा देल्याबद्यल आपले अभिनंदन करतो. परंतु त्या संदर्भात काही तक्रारी माझ्यापर्यत पोहचल्या आहेत. मदर डेरीमध्ये जे मिल्ट्री एक्सपायर आहेत ते मदर डेरी किरायाने देत आहे असे कृत्य घडु नये याकरीता प्रशासनातर्फे उपाययोजना करण्यात याव्यात व हा विषय मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव क्र.१४२/वि.क्र.६४</u>** :- **(स्थावर विभाग)**

राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ यांना मदर डेअरी पार्लर व मिल्क बुथकरीता महानगरपालिका हद्दीतील व महानगरपालिकेच्या अधिनस्त असलेल्या संलग्न यादीनुसारच्या एकुण 33 जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च कलम 79 (g) नुसार 30 वर्षीय कालावधीसाठी नाममात्र रू. 1/— प्रती जागा नुसार वार्षिक दराने खालील अटी शर्थीच्या अधिन राहून भाडेपट्टयावर नियमानुसार देण्याकरीता मंजूरी प्रदान करण्यासाठी शासनाची मान्यता आवश्यक असल्याने याबाबत शासनास प्रस्ताव पाठविण्यात येईल. त्यानुसार या संदर्भातील पूढील कार्यवाहीचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

1. राष्ट्रीय दुग्धविकास मंडळद्वारे संचालीत मदर डेअरी फ्रुट ॲन्ड व्हेजीटेबल प्रायव्हेट लिमिटेड कंपनी शिवाय इतर दूग्ध व्यवसाय कंपनीस जागेचा वापर करता येणार नाही.
2. मदर डेअरी फ्रुट ॲन्ड व्हेजीटेबल प्रायव्हेट लिमिटेड कंपनी ही राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाशी संलग्न असेपर्यतचा या जमीनीकरीता भाडेपट्टा अस्तीत्वात राहील.
3. मदर डेअरी बुथ व पार्लर चालविण्याकरीता माजी स्वातंत्र्य सैनिक, दिव्यांग व्यक्ती आणि महिला यांना प्रथम प्राधान्य द्यावे लागेल.
4. आवंटीत केलेल्या जमीनीची अथवा तिच्या कोणत्याही भागाची विक्री, बक्षिस पत्र व गहाण पत्र करता येणार नाही व अन्य कोणत्याही प्रकारे तिचे हस्तांतरण करता येणार नाही. अथवा सार्वजनिक —खाजगी सहभाग तत्वावर सदर जमीनीचा वापर करता येणार नाही. ही जमीन अथवा त्यांच्या कोणत्याही भागावर अन्य व्यक्ती/ संस्था/कंपनी इत्यादीचे कोणत्याही प्रकारचे हक्क कोणत्याही प्रकारचे हक्क निर्माण होतील अश्याप्रकारे कोणताही आर्थीक व्यवहार करता येणार नाही.

5. सहा. संचालक नगररचना विभागातर्फे राष्ट्रीय दुग्धविकास मंडळद्वारे संचालीत मदर डेअरी फ्रुट ॲन्ड व्हेजीटेबल प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांना देण्याबाबत 33 जागेची जीपीएस लोकेशनच्या अनुषंगाने पाहणी करून सदरहू 33 जागा निश्चित केलेल्या आहेत. सदरहू जागेच्या संदर्भात प्रत्यक्षात मोक्यावर काही अडचण निर्माण झाल्यास विकास नियमावलीतील तरतुदीनुसार सहा. संचालक, नगररचना विभागाद्वारे पाहणी करून प्रत्यक्षात जागा अंतीम करण्यात येईल.
6. प्रस्तावीत जागेचा वापर केवळ मंजूर प्रयोजनासाठी असेल. सदर जमीनीचा अथवा त्यांचे कोणत्याही भागावरील स्थायी/अस्थायी बांधकामास नागपूर शहरासाठी मंजूर प्रचलित विकास नियमावलीतील तथा मनपा कायदयाच्या तरतुदी लागु राहतील. तसेच या व्यतिरीक्त अन्य आवश्यक विभाग/ शासकीय यंत्रणा यांची मान्यता /पूर्व परवानगी /ना–हरकत घेणे देखील बंधनकारक राहील.
7. प्रस्तावीत 33 जागांच्या अनुषंगाने कोणतेही अधिनियम /नियम व न्यायालयीन निर्णय यामधील तरतुदीनुसार बाधा उत्पन्न झाल्यास सदर प्रस्तावित जागा मनपाचे स्थावर विभागामार्फत परत घेण्यात येईल.
8. या जागेचे वार्षीक भू–भाडे दरवर्षी सुरवातीचे महीन्याचे 5 तारखेपर्यंत अग्रीम जमा करावा लागेल.
9. भाडेपट्टा करारानंतर पूढील 6 महिन्याचे कालावधी पर्यंत ज्या प्रयोजनाकरीता देण्यात आली आहे त्याबाबतचा वापर सुरू न झाल्यास करारनामा रद्द समजण्यात येईल.
10. भाडेपट्टा कराराच्या दिनांकापासुन सदर जागेपोटी नागपूर महानगरपालिकेमार्फत आकारण्यात येणारे कर, पाणी, आकार व अन्य आकार हे राष्ट्रीय दुग्धविकास मंडळद्वारे संचालीत मदर डेअरी फ्रुट ॲन्ड व्हेजीटेबल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने भरणे आवश्यक राहील.
11. प्रस्तावित प्रयोजनामुळे लगतच्या मिळकत धारकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, त्याचे वैध वहिवाटीस बाधा येणार नाही तसेच पोच रस्त्यास अडथळा होणार नाही, याची खबरदारी कंपनीला घ्यावी लागेल.
12. प्रस्तावित प्रयोजनाच्या व सुरक्षेच्या अनुषंगाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागांनी वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश/सूचना कंपनीवर बंधनकारक राहतील. व त्या अनुषंगाने आवश्यक खबरदारी/काळजी घेणे व अनुपालन करणे बंधनकारक राहील.
13. उपरोक्त बाबी कोणताही निर्णय घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार महानगरपालिका, नागपूर यांचेकडे सुरक्षीत राहील व सदर निर्णयाचे अनुपालन करणे कंपनीला बंधनकारक राहील.

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून काही लोकांनी परत मदरडेअरीकरिता अर्ज केलेले आहेत. त्या लोकांची सुध्दा मागणी आहे. आपण जागा दिली पाहिजे या मताचा मी आहे. ज्यांनी ज्यांनी मागणी केलेली आहे त्यांना मदरडेअरीमध्ये जागा मिळालेली आहे त्यांच्या संमत्तीने या लोकांना खाली असलेली जागा दिली तर कुठेही

अडचण होणार नाही अशा प्रकारचे मा. विरोधी पक्ष नेता श्री. तानाजी वनवे यांनी निवेदन केलेले आहे. नियमाप्रमाणे जर शक्य असेल तर त्या दृष्टीने प्रशासनाने विचार करावा आणि मा.सदस्य नरेंद्र बोरकर यांनी मांडलेल्या सुचनेप्रमाणे मदरडेअरीला दिलेल्या जागेचा वापर दुस-या व्यवसायासाठी करण्यात येत आहे असे असेल तर मदरडेअरीला ताकीद देवून त्यांना दिलेले लायसन्स् त्वरीत रद्द करण्यात प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, अमृत योजनेअंतर्गत मौजा वाठोडा खसरा क्र १९ कामाक्षी नगर ख.क्र १०३,१०४,१०५/३, अनमोल नगर, शिवाजी पार्क या दोन्ही जलकुंभ माझा प्रभाग क्र २६ मध्ये आहे आणि मी आपल्या निर्देशनास आणुन देऊ इच्छितो की मौजा वाठोडा खसरा क्र १९ कामाक्षी नगर येथे १२ मिटर व १८ मिटरचे लहान रस्ते आहे त्याच्या बाजुला महानगरपालिकेचे ८ एकरचे मोठे मैदान स्पोर्ट कॉम्पलेक्स साठी राखीव आहे त्यामुळे ही जी पाण्याची टाकी आहे ती त्याठिकाणी शिफ्ट करण्यात यावी. त्याचप्रमाणे अनमोल नगर शिवाजी पार्क येथे देखील पाण्याची टाकी प्रस्तावित आहे येथे देखील रस्ते अत्यंत तोकडे आहे. त्यामुळे याच्या बाजुला सिम्बॉयसीस कॉलेजला लागून ५०० मिटरवर महानगरपालिकेची मोठी जागा आहे त्या ठिकाणी पाण्याची टाकी नेता येईल. माझी आपणांस नम्र विनंती आहे की संपुर्ण शहानिशा होईपर्यत हा विषय स्थगित ठेवण्यात यावा आणी मी ज्या जागा सूचविल्या आहेत याचा तातडीने विचार करावा.

**ठराव क्र.१४३/वि.क्र.६५ :-** अमृत योजनेअंतर्गत मौजा-वाठोडा, ख. क्र. **१९** कामाक्षी नगर व ख. क्र. **१०३, १०४, १०५/३,** अनमोल नगर, शिवाजी पार्क येथे प्रस्तावित जलकुंभाचे बांधकामाकरिता मोकळे मैदान नागपुर सुधार प्रन्यासकडुन हस्तांतरीत करून घेणेबाबत.

**(स्थावर विभाग)**

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने अधिक्षक अभियंता (जलप्रदाय) विभागाचे पत्र क्र. **६३**/अ दि. **२०.०७.२०१८** व दि. **२१.०९.२०१८** तसेच पत्र क्र. **६३**/अ.अ. (जप्र)/**२०१८** दि. **२०.१२.२०१८** अन्वये मौजा-वाठोडा, ख. क्र. **१०३, १०४, १०५/३,** अनमोल नगर, शिवाजी पार्क व ख. क्र. **१९** कामाक्षी नगर येथे जलकुंभ बांधण्याकरीता ना-हरकत मागविण्यात आलेले होते. यादोन्ही पत्राच्या अनुषंगाने नासुप्रचे पत्र **(१)** वि.अ.(पुर्व)/ **३४०** दि. **१०.१०.२०१८** अन्वये चंद्रभागानगर गृह निर्माण सहकारी संस्था अनमोल नगर **(२)** पत्र क्र. वि.अ.(पुर्व)/**३६** दि. **०७.०१.२०१९** अन्वये कामाक्षी नगर येथील मोकळया मैदानावर जलकुंभाच्या इतर सोई जसे पक्का पोहोच मार्ग, मुख्य जलवाहिनी ई.. आवश्यक सोई महानगरपालिकेने स्वत: करावे या शर्तीवर जलकुंभ बांधण्यास ना-हरकत देण्यात आलेले आहे.

सहा. संचालक, नगर रचना महानगरपालिका विभागाचे पत्र क्र. मनपाना/नरवि/ **२०९५** दि. **०७.०३.२०१९** अन्वये पाण्याची टाकी करावयाची असल्यास जागा हस्तांतरण प्रकिया पुर्ण करून मा. आयुक्त यांची परवानगीने काम करण्यास हरकत नाही, असे पत्र दिलेले आहे. महाराष्ट्र शासनाचे दि. **०१.०४.२०२१** च्या निर्णयान्वये पुन्हा सदर भागाचे नियोजन प्राधिकरण नागपुर सुधार प्रन्यास झालेले असल्यामुळे अमृत योजने अंतर्गत जलकुंभ बांधण्याकरीता आवश्यक उपरोक्त अभिन्यासातील मोकळे मैदान हे नागपुर सुधार प्रन्यासकडुन हस्तांतरीत करून घेण्याची महासभेच्या मंजुरीकरीता सादर करण्याकरीत मा. आयुक्त यांचे दि. **०२.०७.२०२१** च्या निर्देशाप्रमाणे मौजा-वाठोडा, ख. क्र. **१९** कामाक्षी नगर व ख. क्र. **१०३, १०४, १०५/३,** अनमोल नगर, शिवाजी पार्क येथील अभिन्यासातील मोकळी जागा नागपुर सुधार प्रन्यासकडुन हस्तांतरीत करून घेण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून अमृत योजनेअंतर्गत मौजा वाटोडा खसरा क्र. १९ कामाक्षी नगर व खसरा क्र. १०३, १०४, १०५/३ अनमोल नगर, शिवाजी पार्क हे दोन्ही मैदाने आहेत ती माझ्या प्रभाग क्र. २६ मध्ये आहेत. मी आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो कि, मौजा वाटोडा, खसरा क्र. १९ कामाक्षी नगर येथील रस्ते १२ फुट, १८ फुटाचे अगदी लहान रस्ते आहेत आणि मैदान देखील अगदी छोटेसे आहे. त्याच्या बाजूला ८ एकरचे महानगरपालिकेचे एक मोठे मैदान आहे ते जवळपास ६० फुटाच्या वरती आहे. आपण पाण्याची

टाकी त्या ठिकाणी शिफ्ट करावी. त्याचप्रमाणे अनमोल नगर येथील देखील रस्ते १२ फुट, १८ फुटाचे अत्यंत छोटे आहेत आणि दुसरे महत्वाचे म्हणजे या मैदानाची मागणीच्या संदर्भात उच्च न्यायालयामध्ये प्रकरण सुरु आहे.त्यामुळे ही जागा आहे त्याच्या बाजूला ५०० मीटरवर सिम्बॉसीसला लागून महानगरपालिकेचे मोठे मैदान आहे त्या ठिकाणी पाण्याची टाकी देता येईल या विषयाची संपुर्ण शहानिशा होईपर्यंत हा विषय स्थगित ठेवण्यात यावा. अशी मा.सदस्य श्री.धर्मपाल मेश्राम यांनी सुचना केलेली आहे परंतु प्रशासनाच्या संपुर्ण प्रयत्नाने ही जागा मिळालेली आहे. एनआयटीकडून जागा मागत असतांना भरपूर वेळ जात आहे त्यामुळे याची किंमत सुध्दा लागोपाठ वाढत आहे. सध्या या जागेबद्दल या सभागृहाची संमत्ती देणार आहे आणि जी सुचना केली आहे त्या पर्यायी जागेचा विचार सुध्दा समाविष्ट करुन जर शक्य असेल तर त्या दृष्टीने प्रशासनाने सन्माननीय धर्मपाल मेश्राम यांनी जी सुचना केली आहे या जागेची पाहणी करावी आणि शिफ्ट करण्यास तर्कसंगत असेल तर तिकडे शिफ्ट करण्याकरिता प्रशासनाने वेगळा प्रस्ताव तयार करावा आणि हा विषय सध्या जसा सभागृहाच्या पटलावर आहे त्याला मान्यता देण्यात यावी. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.१४४/वि.क्र.६६ :-** **विकास योजना – नागपूर. (सुधारीत)**

**(नगररचना विभाग)** अ) मौजा– वाठोडा येथील ME- 32 (PG) ते ME- 58 (PG) पर्यंतचा 18.00 मी. रुंदीचा विकास योजना रस्ता वगळून 30 मी. रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आरेखनात बदल करण्याकरीता तसेच उक्त प्रस्तावित रस्त्याने बाधीत मंजुर आरक्षणाच्या क्षेत्रात व पुर्नरचनेमुळे आकारमानात बदल करणेकरीता म.प्रा. व न.र. अधिनियम 1966 चे कलम 37 चा प्रस्ताव कार्यान्वीत करण्याबाबत.

ब) संत गोरा कुंभार चौकापासुन वाठोडा गावाकडील रिंग रोडपर्यंत 30.00 मी. रुंद विकास योजना रस्ता मंजुर विकास योजनेतुन वगळण्याबाबत व तसेच उदय लॉन ते वाठोडा गावठाणातून जाणारा व रिंग रोडला मिळणारा विद्यमान रस्ता 30.00 मी. रुंदीचा विकास योजना रस्ता म्हणून प्रस्तावित करण्याबाबत तसेच उक्त वगळलेल्या रस्त्यामुळे व प्रस्तावित 30.00 मी. रस्त्याने बाधीत मंजुर आरक्षणाच्या क्षेत्रात व पुर्नरचनेमुळे आकारमानात बदल करणेकरीता म.प्रा. व न.र. अधिनियम 1966 चे कलम 37 चा फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करण्याबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 31(1) अन्वये शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस –2496–2643–प्र. क्र.300(अ)–97–नवि–9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये भागशः मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस–2400–1628–सी.आर.–200– नवि–9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09.2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस–2401–885– प्र.क्र.–76/नवि–9, दि. 27 फेब्रुवारी 2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. प्रस्तावित

फेरबदलाखालील जागेचे नियोजन प्राधिकरण काही भागाकरीता नागपूर महानगरपालिका व काही भागाकरीता अंशतः नागपूर सुधार प्रन्यास आहे.

उपरोक्त फेरबदल करतांना पुर्वेकडील 30.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यापासून स. नं. 43 –44 च्या हद्दीच्या उत्तरेकडील व पुढे 30.00 मी. रूंद विकास योजना रस्त्यास जोडणारा 18.00 मी. रूंद विकास योजना रस्ता वगळून त्याखालील क्षेत्र लगतच्या आरक्षणामध्ये /विभागामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजा – वाठोडा येथील ME-32(PG) ते ME- 58 (PG) पर्यंतच्या 18.00 मी. रुंद विकास योजना रस्ता व ME-31 (TE) ते रींग रोड पर्यंतच्या 30.00 मी. रुंद विकास योजना स्त्यालगत खालीलप्रमाणे मंजुर विकास आराखडयामध्ये आरक्षणे दर्शविण्यात आलेले असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | आरक्षण क्र. | खसरा क्र. | मौजा | क्षेत्र | समुचित प्राधिकरण | वि. नि. प्राधिकरण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ME-31(TEL) | 611(P), 27 To 40(P) | नागपूर , वाठोडा | 0.6064 H. | Telecom | महानगरपालिका |
| 2 | ME-76(Post) | 27 To 40(P) 611 | वाठोडा नागपूर | 0.2000 H. | Post | महानगरपालिका |
| 3 | E-142(STS) | 27 To 40(P) 610/1(P), 611, 610/4(P), 612 | वाठोडा नागपूर , | 1.6928 H. | State Transport | महानगरपालिका |
| 4 | ME-30(PKG) | 27 to 40(P) | वाठोडा | 1.0560 H. | NIT | महानगरपालिका |
| 5 | E-141(Sport) | 44(P), 45(P), 46(P), 47, 48(P), | वाठोडा | 7.6377 H. | NIT | महानगरपालिका |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | E-137 (SS) | 88(P), 89(P), 95(P) | वाठोडा | 0.9728 H. | NIT Pvt Body | NIT |
| 7 | E-138(PKG) | 96(P), 102/1 (P) | वाठोडा | 0.4608 H. | NIT | NIT |
| 8 | E-139(PS) | 79(P), 96(P) | वाठोडा | 0.5440 H. | NIT | NIT |
| 9 | E-199 (P.E) | 48(P), 46(P), 46/2-3, 50/2(P), 50/1, 59-60, 61(P), 75(P), 102/1-2(P), 78(P), 79(P), 49/1(P), 49/2(P), 49/3(P), 76/1, 76/2, 77 | वाठोडा | 38.6270 H. | Police E | महानगरपालिका |
| 10 | ME-56(SS) | 27 to 40 (Part) | वाठोडा | 0.7872 H. | NIT Pvt. Body | महानगरपालिका |

प्रस्तावित फेरबदलान्वये 18.00 मी. व 30.00 मी. रूंद विकास योजना रस्त्यापासून मौजा – वाठोडा, स.नं. 43–44 च्या उत्तर हद्दीलगत ते विद्यमान रस्त्यापर्यंतच्या 18.00 मी. रूंद विकास योजना रस्त्यालगतच्या दक्षिणेकडील भागातील आरक्षणाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 11 | E-143 (M) | 43(P), 53(P) | वाठोडा | 4.3824 H. | NIT | महानगरपालिका |

प्रस्तावित फेरबदलान्वये 30.00 मी. रूंद रस्त्याच्या संरेखनातील बदलामुळे मौजा – वाठोडा येथील ME- 32 (PG) ते ME- 58 (PG) पर्यंतचा प्रस्तावित 30.00 मी. रुंद विकास योजना रस्ता पश्चिमेकडे 30.00 मी. रुंद रस्त्यास जोडणे व पुर्वेकडे मौजा – वाठोडा, स. न. 17 व 18 मधून पुढे

रिंग रोडला जोडण्याकरीता तसेच उदय लॉन ते वाठोडा गावठाणातून जाणारा व रिंग रोडला मिळणाऱ्या विद्यमान रस्त्याचे रुंदीकरण करुन सदर रस्ता 30.00 मी. रूंद विकास योजना दर्शविणेच्या फेरबदल प्रस्तावानुसार त्या रस्त्यालगत खालीलप्रमाणे सुधारीत विकास आराखडयामध्ये आरक्षणाच्या क्षेत्रामध्ये झालेला बदल व पुर्नरचनेमुळे व आकारमानात झालेला बदल खालीलप्रमाणे विकास योजना नकाशात दर्शविण्यात आलेला आहे. त्यानुसार मंजुर विकास योजनेतील आरक्षणे कायम असून काही प्रमाणात क्षेत्रात फेर बदल करणे आवश्यक आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. त्यानूसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | आरक्षण क्र. | खसरा क्र. | मौजा | क्षेत्र | समुचित प्राधिकरण | वि. नि. प्राधिकरण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ME-31(TEL) | 611(P), 27 To 40(P) | नागपूर , वाठोडा | 0.4688 H. | Telecom | महानगरपालिका |
| 2 | ME-76(Post) | 27 To 40(P) | वाठोडा | 0.272 H. | Post | महानगरपालिका |
| 3 | E-142(STS) | 27 To 40(P) 610/1(P), 611, 610/4(P), 612 | वाठोडा नागपूर , | 2.203 H. | State Transport | महानगरपालिका |
| 4 | ME-30(PKG) | 27 to 40(P) | वाठोडा | 0.8668 H. | NIT | महानगरपालिका |
| 5 | E-141(Sport) | 44(P), 45(P), 46(P), 47, 48(P), | वाठोडा | 6.337 H. | NIT | महानगरपालिका |
| 6 | E-137 (SS) | 88(P), 89(P), 95(P) | वाठोडा | 0.9905 H. | NIT Pvt Body | NIT |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | E-138(PKG) | 96(P), 102/1 (P) | वाठोडा | 0.7361 H. | NIT | NIT |
| | 8 | E-139(PS) | 79(P), 96(P) | वाठोडा | 0.7376 H. | NIT | NIT |
| | 9 | E-199 (P.E) | 48(P), 46(P), 46/2-3, 50/2(P), 50/1, 59-60, 61(P), 75(P), 102/1-2(P), 78(P), 79(P), 49/1(P), 49/2(P), 49/3(P), 76/1, 76/2, 77 | वाठोडा | 39.563 H. | Police E | महानगरपालिका |
| | 10 | ME-56(SS) | 27 to 40 (Part) | वाठोडा | 2.2456 H. | NIT Pvt. Body | महानगरपालिका |
| | 11 | (R1) Residential | Kh No. 27 to 40 (P) | वाठोडा | 0.3384 H. | NIT | |
| | 12 | (R2) Residential | 78 (Part), 79 (Part) | वाठोडा | 0.528 H. | NIT | |
| | 13 | E.P. 88 | Kh. No. 27 to 41 , 33 | वाठोडा | 9.558 H. | Public Semi Public | नासुप्र |
| | 14 | ME-57 | kh. No. 27 to 40 | वाठोडा | 1.344 H. | Shopping Center | नासुप्र |
| | 15 | Residential | kh. No. 27 to 40 | वाठोडा | 2.352 H. | NIT | |

30.00 मी. रूंद विकास योजना रस्त्यापासून मौजा – वाठोडा येथील स.नं. 43–44 च्या उत्तर हद्दीलगत ते विद्यमान रस्त्यापर्यतचा 18.00 मी. रूंद रस्ता वगळलेनंतर त्या रस्त्याखालील काही जागा प्रस्तावित 30.00 मी. रूंद रस्त्यात व उर्वरीत जागा खालीलप्रमाणे आरक्षणात / विभागात समाविष्ठ करणे आवश्यक असून विकास योजना नकाशात दर्शविण्यात आलेल्या जागेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 13 | (R3) Residential | 43(P), 44(P) | वाठोडा | 0.1944 H. | NIT | |
| 14 | E-143 (M) | 43(P), 53(P) | वाठोडा | 4.464 H. | NIT | महानगरपालिका |

नागपूर शहराच्या मंजूर विकास आराखडयानुसार मौजा– वाठोडा येथील ME- 32 (PG) ते ME- 58 (PG) पर्यंतचा 18.00 मी. रुंद विकास योजना रस्ता वगळून त्यास प्रस्तावित 30.00 मी. रूंद विकास रस्ता पश्चिमेकडे 30.00 मी. रुंद विकास योजना रस्त्यास जोडणे व पुर्वेकडे मौजा– वाठोडा येथील स.नं. 17 व 18 मधून पुढे रिंग रोडला जोडणेकरीता संत कुंभार चौकापासुन ME- 31 ( TE ) ते E- 138 (PKG) पर्यंतचा 30.00 मी. रुंद विकास योजना रस्ता रद्द करुन त्या ऐवजी उदय लॉन ते वाठोडा गावठाणातुन जाणारा व पुढे रिंगरोडला मिळणाऱ्या विद्यमान रस्त्याचे रुंदीकरण करुन सदर रस्ता 30.00 मी. रुंद विकास योजना रस्ता म्हणून दर्शविणेबाबत व तसेच मौजा– वाठोडा स.न. 43 – 44 च्या उत्तर हद्दीलगत ते विद्यमान रस्त्यांपर्यंतच्या 18.00 मी. रुंद विकास योजना रस्ता रद्द करुन त्याखालील जागा लगतचे आरक्षणात/ विभागामध्ये समाविष्ठ करणेच्या फेरबदल प्रस्तावानुषंगाने मंजूर विकास योजनेतील रस्त्यालगत असणाऱ्या आरक्षणाच्या क्षेत्रात व पुर्नरचनेमुळे आकारमानात बदल होत असल्यामुळे उपरोक्त फेरबदल करण्यास्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये कार्यवाही प्रस्तावित करावयाची आहे

सबब सदर प्रस्तावातील फेरबदलासंबंधी वैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे करण्यास्तव मौजा – वाठोडा येथील ME- 32 (PG) ते ME- 58 (PG) पर्यंतचा 18.00 मी. रुंदीचा रस्ता वगळून त्यास प्रस्तावित 30.00 मी. रूंद विकास योजना रस्ता पश्चिमेकडे 30.00 मी. रूंद विकास योजना रस्त्यास जोडणे, तसेच पुर्वेकडे मौजा– वाठोडा येथे सर्व्हे नं. 17 व 18 मधून पुढे रिंग रोडला जोडण्याकरीता 30.00 मी. रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करणे व संत गोरा कुंभार चौकापासुन वाठोडा गावाकडील रिंग रोडपर्यंत 30.00 मी. रुंद विकास योजना रस्ता मंजुर विकास योजनेतुन वगळण्याबाबत व तसेच उदय लॉन ते

वाठोडा गावठाणातून जाणारा व रिंग रोडला मिळणारा विद्यमान रस्ता 30.00 मी. रुंदीचा विकास योजना रस्ता म्हणून प्रस्तावित करण्यास्तव व मौजा– वाठोडा, स.नं. 43–44 च्या उत्तर हद्दीलगत ते विद्यमान रस्त्यापर्यंतचा 18.00 मी. रुंद विकास योजना रस्ता रद्द करुन त्याखालील जागा लगतचे आरक्षणात विभागात समाविष्ठ करणेच्या फेरबदल प्रस्तावाच्या अनुषंगाने उक्त रस्त्यांच्या आरेखनात फेरबदल करतांना त्या रस्त्यालगत मंजुर विकास योजनेतील आरक्षणाच्या क्षेत्रात व पुर्नरचनेमुळे आकारमानात बदल होत असल्याने उक्त रस्त्यालगतच्या आरक्षणाची पुर्नरचना करण्यास्तव मंजुर विकास योजनेच्या भागनकाशात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सभागृहाची मान्यता देण्याबाबत व सदर फेरबदलाची अधिसूचना शासन राजपत्रात दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप/हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरीता आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजुरी देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून हा रस्ता जात असतांना काही लोकांची घरे बाधीत होत आहे त्या लोकांची पर्यायी व्यवस्था करावी. या मा.विरोधी पक्ष नेता श्री. तानाजी वनवे यांनी केलेल्या सुचनेनुसार आणि या विषयाला प्राप्त लेखी सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>सुचना</u>**

वेंकटेशनगर, संत गोराकुंभार चौक ते रिंग रोड स्वामीनारायण मंदिरपर्यंत म.न.पा. अधिनियम १९६६ कलम ३७ अनुसार म.न.पा. ठराव क्र. ४१४ विषय क्र. ३४१, दि. २३/०७/२०१९, १८ मीटरच्या रस्त्याला सभागृहाने मान्यता दिलेली आहे.

म.न.पा. नगर रचना विभागाने फेरविचार सुधारित प्रस्ताव विषय क्र. ६६ म.न.पा.सभागृहात सादर केला आहे. वेंकटेशनगर, संत गोराकुंभार चौक ते रिंग रोड स्वामीनारायण मंदिरपर्यंत १८ मीटर ऐवजी ३६ मीटर रस्ता करण्यासंदर्भात मागणी आहे. नगर रचना विभागाने ३० मीटरचा रस्ता प्रस्तावित केलेला आहे. ३६ मीटरच्या मागणी अनुसार ३० मीटरचा रस्ता व ६ मीटरमध्ये फुटपाथ व हिरवळी एकुण ३६ मीटरच्या रस्त्याला विषय क्र. ६६, दि. २२/०७/२०२१ रोजी होणा-या सभेमध्ये एकमताने मंजुरी देण्यासंदर्भात ही सूचना मंजूर करावी, ही विनंती

हस्ता/- सुचक

सौ. मनिषा कोठे (नगरसेविका, प्रभाग क्र. २६)

हस्ता/-अनुमोदक

श्री.दिपक वाडीभस्मे(नगरसेवक, प्रभाग क्र. २५)

**<u>ठराव क्र.१४५/वि.क्र.६७</u> :-** नागपूर शहरात राबविण्यात येत असलेल्या केंद्र शासन पुरस्कृत “अमृत” **(सार्व. आ. अभि. विभाग)** योजनेअंतर्गत एकूण ४२ ESRs + १ GSR+ मुख्य जलवाहिण्या व वितरण जलवाहिण्याचा समावेश आहे. सदर प्रकल्पाचे काम रू. २७२.०२ रकमेवर ठेव तत्वावर मे. वाप्कोस लि. (भारत

सरकारचा उपक्रम असलेली कंपनी) यांना देण्यात आले होते. मात्र ESRs बांधण्याकरिता आवश्यक जागा विहित मुदतीत म.न.पा. कडून मे. वाप्कोस यांना हस्तांतरित न झाल्यामुळे मे. वाप्कोस यांनी फक्त १७ ESRs चेच काम करणार असल्याबाबत पत्राद्वारे कळविले. त्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरूवात करण्यात आली असता गोधनी येथील ESR च्या जागेचा Soil Strata योग्य नसल्याने काम बंद करण्यात आले. त्यामुळे सद्यस्थितीत मे. वाप्कोस लि. १६ ESR ची कामे करणार आहे व उर्वरित ESRs ची कामे म.न.पा. मार्फत करावयाची आहे.

मे. वाप्कोस लि. १६ ESRs पैकी ११ ESRs ची कामे मुळ DPR मधील किमतीनुसारच करित आहे. सदर काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित ०५ ESRs ची मुळ DPR नुसार किंमत रू. १६.०० कोटी आहे. यामध्ये GST चा समावेश नव्हता. या ESRs करीता मे. वाप्कोस लि. यांचेकडून वेळोवेळी निविदा बोलाविण्यात आल्या असता मुळ DPR मधील किंमतीपेक्षा ३५.१०% जास्तीच्या प्राप्त झाल्या. मात्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या प्रचलित CSR नुसार सदर निविदा मुळ DPR मधील रक्कमेच्या तुलनेमध्ये १०% जास्त येते. या निविदेत GST समाविष्ट आहे. मुळ DPR व स्विकृत निविदेतील फरक ५.६२ कोटी येते. यास मंजुरी प्रदान करावी. उर्वरित २७ ESRs पैकी सद्यस्थितीत जागा उपलब्ध असलेले १६ ESRs म.न.पा. मार्फत करावयाचे आहे.

म.न.पा.मार्फत झोन निहाय निविदा बोलविण्यात आल्या. यापैकी नेहरूनगर झोन अंतर्गत सक्करदरा-१, सक्करदरा-२, नंदनवन-१, नंदनवन-३ व दिघोरी या ५ ESRs ची मुळ DPR नुसार किंमत रू. १९.६९ आहे. निविदा बोलावण्याच्या वेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सन २०१९-२० चे नविन CSR नुसार प्राकलनीय राशी रू. ३९.२२ कोटी आहे. यावर कंत्राटदाराची रू. ५१.२२ कोटीची व प्राकलनीय रक्कमेपेक्षा ३०.६० % अधिकची प्राप्त झाली. मात्र या दरम्यान MJP चे २०२१-२२ चे दर प्राप्त झाले. यानुसार प्राकलनीय राशी ही रू. ४४.८१ कोटी झाली व या रकमेची प्राप्त निविदेची तुलना केल्यास निविदा ही १४.३१% अधिक येत आहे. यात १२% GST मिळविल्यास ही रक्कम रू. ५७.३७ कोटी येत आहे. सदर रक्कम व मुळ DPR मधील रक्कम यातील फरक (५७.३७-१९.६९) रू. ३७.६८ कोटी येते. हे काम अत्यंत गरजेचे आहे. म्हणून यास मंजुरी प्रदान करण्यात यावी.

तसेच हनुमाननगर झोन अंतर्गत ओंकारनगर-२ व ओंकारनगर+म्हाळगीनगर हे दोन ESRs Twin type करावयाचे आहे. अशा प्रकारचे ESR देशात प्रथमच करण्यात येणार आहे. या दोन ESRs ची मुळ DPR नुसार किंमत रू. ८.२३ कोटी आहे. निविदा बोलाविण्याचे वेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सन २०१९-२० चे नविन CSR आल्यामुळे सदर ESR करीता प्राकलन नविन CSR नुसार करण्यात आले. यानुसार याची प्राकलनीय राशी रू. ८.८४ कोटी आली. या ESR ची निविदा सद्यस्थितीत उघडण्याची प्रक्रिया सुरू आहे. नेहरूनगर अंतर्गत आलेल्या निविदेचे Trend बघता येथेपण ३०% जास्त येण्याची शक्यता गृहीत धरून तसेच १२% GST मिळवून सदर निविदेची रक्कम व मुळ DPR मधील रक्कम यातील फरक (१२.८७-८.२३) रू. ४.६४ कोटी येण्याची शक्यता आहे.

तसेच मंगळवारी झोन अंतर्गत गिट्टीखदान ESRs ची मुळ DPR नुसार किंमत रू. १.८५ कोटी आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सन २०१९-२० चे नविन CSR नुसार प्राकलन तयार करण्यात आले. प्रत्यक्ष निविदा बोलाविण्यात आली असता रू. २.४३ कोटी म्हणजेच १३.२५% जास्तीच्या निविदा प्राप्त झाली. यामध्ये १२% GST मिळविल्यास सदर रक्कम व मुळ DPR मधील रक्कम यातील फरक (२.७२-१.८५) रू. ०.८७ कोटी येतो.

उर्वरीत प्रतापनगर, खामला, गायत्रीनगर, नारा, नारी-२, इंदोरा, भरतवाडी व वंजारीनगर या आठ ESRs ची मुळ DPR नुसार किंमत रू. २३.६३ कोटी येते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सन २०२१-२२ चे नविन CSR नुसार प्राकलन तयार करण्यात आले. त्यानुसार प्राकलनीय राशी रू. ३८.८२ कोटी येते. नेहरूनगर अंतर्गत आलेल्या निविदेचे Trend बघता येथेसुध्दा MJP CSR २०२१-२२ च्या तुलनेत १५% जास्त येण्याची शक्यता गृहीत धरून तसेच १२% GST मिळवून सदर कामाची रक्कम व मुळ DPR मधील रक्कम यातील फरक रू. २७.०९ कोटी येण्याची शक्यता आहे.

वंजारीनगर ESR करीता MJP च्या नविन CSRनुसार प्राकलन तयार केले असता रू. ३.१३ कोटी येते. यामध्ये १२% GST मिळविल्यास सदर रक्कम रू. ४.०३ कोटी येते. सदर रक्कम व मुळ DPR मधील रक्कम यातील फरक (४.७५-४.०३) रू. ०.७२ ने कमी येतो. त्यामुळे या ESR चे काम करण्यास हरकत नाही.

येथे नमूद करण्यात येते की, लक्ष्मीनगर-१, बिनाकी-१, चिचभुवन, बस्तरवारी, जरीपटका, धंतोली, बोरीयापुरा, गोधनी, वांजरा, रामनगर व लक्ष्मीनगर-२ या ११ ESRs करीता सद्यस्थितीत जागा उपलब्ध नसल्यामुळे सदर ESRs प्रलंबित ठेवण्यात येतील.

सबब उक्त बाबींचा विचार करता मे. वाप्कोस लि. करणार असलेले पाच ESRs व म.न.पा. मार्फत करावयाचे १६ ESRs करिता येणारा रू. ७५.९० कोटी जास्तीचा खर्च म.न.पा.स सोसावा लागेल.

सबब उक्त बाबींचा विचार करता मे. वाप्कोस लि. करणार असलेले ५ ESRs व म.न.पा. मार्फत करावयाचे १६ ESRs करिता येणारा रू. ७५.९० कोटी जास्तीचा खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री. तानाजी वनवे :- मा.महापौरजी, विषय क्र ६८ मध्ये माझी एक सूचना आहे ती सूचना अशी आहे की, माझ्या प्रभागात पुंडलिक बाबाचा प्रस्ताव प्रलंबित आहे तो प्रस्तावाला सभागृहाला मंजूर करण्यात यावे. त्याचबरोबर राजीव गांधी चौकाचा देखील प्रस्ताव सभागृहापुढे आणावा अशी माझी सूचना आहे.

**ठराव क्र. १४६/वि.क्र.६८ (सचिवालय)** :– म.न.पा. ठराव क्र. 72 दिनांक 20.07.2017 अन्वये मा. महापौरजी यांनी दि. 18.01.2021 रोजी गठीत नामकरण समितीच्या दिनांक 07.07.2021 रोजी भरलेल्या सोबतच्या सभेच्या अहवालामध्ये (परिशिष्ट 'अ') करण्यांत आलेल्या विविध भागाचे नामकरणाच्या शिफारसींना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून सन्माननीय सदस्यांना एकच सांगू इच्छितो, मागचे आयुक्त आल्यानंतर नामकरणाचे प्रस्ताव कशा पध्दतीने सभागृहासमोर आणावे अशी एक पध्दत निर्धारित करण्यात आली आहे. त्याच्या पूर्वी जे प्रस्ताव झाले होते ते जसेचे तसे स्थगित ठेवण्यात आलेले आहे. नवीन पध्दत आली आहे त्या पध्दतीचा आपण अवलंब करावा. आपले जे प्रस्ताव प्रलंबित असतील, ज्या नगरसेवकांच्या माध्यमातून हा प्रस्ताव येते. प्रशासनाच्या माध्यमातून ते करुन घेण्यासाठी त्यांनी वैयक्तिक प्रयत्न करुन घ्यावे आणि प्रशासनाने त्यांना मदत करावी असे निवेदन करतो. या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

परिशिष्ट 'अ'

नामकरण समितीच्या दि. ०७.०७.२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता भरलेल्या सभेचा अहवाल

उपस्थित सभासद

| अ क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. सौ. मनिषा आशिष धावडे, उपमहापौर | अध्यक्षा |
| २ | मा. श्री. सुनिल जिवराज अग्रवाल | सदस्य |
| ३ | मा. श्री. दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ४ | मा. सौ. चेतना राजु टांक | सदस्या |
| ५ | मा. श्री. लहुकूमार दत्तुजी बेहते | सदस्य |

अनुपस्थित सभासद

| अ क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. श्री. शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| २ | मा. श्री. दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |

अध्यक्षा :– सभेची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे आजच्या नामकरण समितीच्या

सभेत नामकरण करण्याबाबतचे तीन प्रस्ताव नामकरण समितीसमोर ठेवण्यात येते व हे तीन प्रस्ताव एक मताने मंजुर करण्यात येते.

नामकरण समितीच्या दि. ०७.०७.२०२१ रोजीच्या सभेत नामकरण प्रस्तावावर घेण्यात आलेले निर्णय.

| अनु क्र. | सुचविणाऱ्याचे नाव | तपशिल | या पुर्वी नाव दिले असल्यास निर्णय मनपा ठराव | समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | सौ. हर्षला साबळे, नगरसेविका, प्र.क्र. १७<br>सौ. लता काडगाये, नगरसेविका, प्र.क्र. १७<br>श्री. विजय चुटेले, नगरसेवक, प्र.क्र. १७<br>श्री. प्रमोद चिखले, नगरसेवक, प्र.क्र. १७ | प्रभाग क्र. १७ अंतर्गत टी.बी. वार्ड चौकाचे नामकरण ‘‘जगद्‌गुरु श्री. देवनाथ महाराज चौक‘‘ असे नामकरण करण्याबाबत. | ——— | मंजुर |
| २ | सौ. हर्षला साबळे, नगरसेविका, प्र.क्र. १७<br>सौ. लता काडगाये, नगरसेविका, प्र.क्र. १७<br>श्री. विजय चुटेले, नगरसेवक, प्र.क्र. १७<br>श्री. प्रमोद चिखले, नगरसेवक, प्र.क्र. १७ | प्रभाग क्र. १७ अंतर्गत आयसोलेश हॉस्पीटल समोरील कुंदनलाल गुप्ता वाचनारलयाच्या बाजूच्या मैदानास ‘‘जगत्‌गुरु महर्षी वाल्मिकी सुदर्शनधाम, जाटतरोडी, इंदिरानगर,‘‘ आणि याच परिसरातील आयसोलेशन हॉस्पीटल समोरील चौकाचे नाव ‘‘महर्षी वाल्मिकी चौक‘‘ असे नामकरण करण्याबाबतत्र | ——— | मंजुर |

हस्ता/- मनिषा आशिष धावडे
अध्यक्ष
नामकरण समिती,

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

**हस्ता /- निगम सचिव** **हस्ता /- महापौर**

**नागपूर महानगरपालिका,नागपूर.** **नागपूर महानगरपालिका,नागपूर.**

प्रति,
मा.महापौर,
महानगरपालिका,नागपूर.
मा.महोदय,

नागपूर महानगरपालिकेच्या दि. २२/०७/२०२१ च्या सर्वसाधारण सभेत ठराव मंजूरीकरीता ठेवण्याबाबत.

**<u>ठराव</u>**

नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिका, नगर रचना विभागाव्दारे नागपूर महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम/विकास परवानगी देण्याकरीता विविध शुल्क आकारल्या जातात सन २०२०-२१ मध्ये नागपूर महानगरपालिका प्रशासनाने नागपूर महानगरपालिका सभागृहाची पुर्व मान्यता न घेता हा विषय सभागृहात सादर न करता अचानकपणे बांधकाम / विकास परवानगी देण्याकरीता एम.आर.ॲन्ड टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम १२४ बी अंतर्गत विकास शुल्कात (Development Charges) १०० टक्के वाढीने वसुल करणे सुरु केले आहे. विशेष म्हणजे ही रक्कम जमिनीच्या किमतीच्या टक्केवारीत घेण्यात येते त्यामुळे नागरिक / विकासकांवर मोठयाप्रमाणात आर्थिक भार लादला गेला आहे. कोविड – १९ महामारीची बिकट परिस्थिती आणि बांधकाम व्यवसाय क्षेत्रात आलेली घसरण यामुळे अगोदरच विकासाला खिळ बसलेली आहे, उद्योग धंदे ठप्प झाल्यागत असून बांधकाम कामगारांचे हाल होत आहे. या भरमसाठी शुल्क वाढीमुळे या व्यवसायावर आणखी आघात होवून यामध्ये सामान्य नागरिक आर्थिक संकटात असल्यामुळे तो भरडल्या जात आहे. या क्षेत्रात यामुळे संकट ओढवले आहे एम.आर.ॲन्ड टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम १२४ बी अंतर्गत विकास शुल्कात १०० टक्के वाढीने वसुल करणे सुरु आहे ही प्रक्रीया तात्काळ प्रभावाने रद्य करण्यात यावी. या ठरावाला सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान करावी, ही विनंती.

**अविनाश ठाकरे**
**सत्तापक्ष नेता**
**महानगरपालिका, नागपूर.**

प्रतिलिपी :
मा.आयुक्त, मनपा नागपूर
मा.निगम सचिव, मनपा नागपूर.

नागपूर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक २२/०७/२०२१ रोजी सकाळी ११.००** वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातुन मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/ २०२०/प्र.क्र.७६/नवि(१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे आयोजित केलेल्या सभेचे कार्यवृत्तातून घेतलेला उतारा.**

**प्रश्न क्र. २५५** :-प्रभाग क्र २६ .येथील विविध वस्त्यांना स्लम मध्ये अंतर्भुत करण्यासाठी आपल्याकडे येथील नागरीकांनी अर्ज केले आहे काय? या संदर्भातप्रश्न

ॲड॰ धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, माझ्या प्रभागातील अंतुजीनगर, न्यु सुरजनगर, धरतीमॉनगर, वैष्णोदेवी नगर, विश्वशांतीनगर या वस्त्यांना स्लममध्ये टाकण्यासाठी नागरिकांनी मा. ॲड कमिश्नर आणि कार्यकारी अभियंता यांना अर्ज दिले होते आणि त्या अर्जाची प्रत माझ्याकडे सुरक्षित आहे. माझा पहिला प्रश्न असा होता की प्रभाग क्र. २६ मध्ये स्लम अंतर्गत अंतर्भुत करण्यासाठी आपल्याकडे येथील जेष्ठ नागरिकांनी अर्ज केले आहे काय? आणि हे खरे आहे काय? या प्रश्नाचे उत्तर मला प्रशासनाने दिले नाही परंतु नगरसेवक धर्मपाल मेश्राम यांना २८.०२.२०१८ ला अशा पध्दतीचे पत्र दिले होते ते मी मा.महापौरजी आपल्या निदर्शनास आणून देतो. जनतेने माझ्याकडे दिलेल्या पत्राची पत्र आहे आणि त्याची रिसीव्ह कॉपी सुरक्षित आहे. त्यामुळे प्रशासननाने दिलेले उत्तर मला संयुक्तिक वाटत नाही. दुसरे असे, या वस्त्यामध्ये काही वस्त्या, हया ज्या ५ वस्त्या आहेत त्या कचरा डम्पिंगच्या परिसरातील लगतच्या आहेत. काही वस्त्या ५०० मीटर लांब आहेत तर काही वस्त्या ३०० मीटर लांब आहेत. काही वस्त्या भिंतीला लागून सुध्दा आहेत. प्रशासनाला अशी विनंती आहे की या सगळया वस्त्या आहेत त्या राहण्यासारख्या स्थितीत नाही. आपण स्व:त महापौर साहेब, प्रशासनातील अनेक अधिकारी आणि मा.आयुक्त साहेब हया सगळयांनी त्या भागातील दौरा आपल्या कार्यकाळामध्ये अनेकदा केला असेल. आपल्या निदर्शनास आले असेल की त्या ठिकाणी राहण्यासारखी स्थिती नाही. तेथील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे आणि त्यामुळे तेथील लोकांना रोज हवेचा त्रास आहे. फुफुसाचा त्रास आहे. तेथून विषारी वायू निघत असतात आणि जाण्यायेण्याकरिता रस्ता नाही. आणि पिण्याची पाण्याची व्यवस्था महानगरपालिकेच्या वतीने आदरणीय नितीनजी गडकरी यांच्या प्रयत्नाने अमृत योजनेमध्ये त्या ठिकाणी पाणी पोहचविण्यात आले आहे. त्या ठिकाणी कच्चे रस्ते देखील काही प्रमाणात केलेले आहे. तेथील लिव्हींग कंडीशन योग्य नाही आणि वस्तीतील नागरिकांनी ज्या वस्तीतील ७५ टक्के पेक्षा अधिक नागरिकांनी जर प्रशासनाला अर्ज केले असतील की आम्हांला या वस्त्या स्लम अंतर्गत करुन देण्यात यावे. अशी माझी सुध्दा मागणी होती आणि विनंती आहे. त्या अनुसार तशा पध्दतीचा प्रस्ताव प्रशासनाला दिला होता. परंतु मागच्या ज्या कार्यकारी अभियंता अधिकारी स्लमच्या मा. चव्हाण मॅडम होत्या. त्या नस्तीमध्ये त्यांनी सांगितले की महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलनव पुर्नविकासअधिनियम १९७१ च्या नुसार गलिच्छ वस्ती म्हणून घोषित करणे योग्य वाटत नाही. मा.

महापौरजी, माझ्याकडे महाराष्ट्र ॲक्ट ऑफ १९७१ इन्प्रुव्हल स्लम एरिया मध्ये असे आहे त्याचे कलम ४(१) मध्ये असे म्हटले आहे(वाचले) मा.महापौर साहेब, मी आपल्या माध्यमातून विनंती करु इच्छितो की जे(वाचले) कचरा डम्पिंग एरियाचा सर्व भाग हा हेल्थसाठी डेन्जर नसेल तर मी काही प्रशासनाला म्हणू इच्छित नाही परंतु जर समजा हा ॲक्ट आहे १९७१ चा त्यात कलम ४(१) मध्ये स्पष्ट नमुद आहे की जो एरिया राहण्यायोग्य नाही तो एरिया हेल्थकरिता योग्य नाही असा ओवरऑल एरिया अंतर्भुत करण्यासाठी अडचण नाही तर अंतर्भुत केला पाहिजे. मग प्रशासन या सेक्शनचा आधार घेवून येथील नागरिकांची आणि लोकप्रतिनिधी म्हणून मला आणि या सभागृहाची दिशाभूल करीत असेल तर माझी एवढीच विनंती आहे या प्रश्नाच्या अनुषंगाने की या ज्या ५ वस्त्या आहेत. ७५ टक्के पेक्षा अधिक लोकांनी मा.सहा.आयुक्त नेहरुनगर झोन आणि मा. कार्यकारी अभियंता नेहरुनगर झोन यांना रितसर अर्ज केले आहे. आणि त्याची प्रत मला दिली आहे. त्यामुळे मी प्रस्ताव तयार केला त्याचा सर्व सर्वेक्षण झालेला आहे. त्याकरिता संस्थेची आपण अपाईंट करुन टेबल सर्व्हेनंबर टू झालेला आहे. त्या वस्त्या राहण्यायोग्य नाहीत. त्यामुळे माझी नम्र विनंती आहे. स्लम ॲक्ट १९७१ च्या कलम ४(१) नुसार हया ज्या वस्त्या आहेत आणि तेथील नागरिकांच्या मागणीनुसार स्लममध्ये अंतर्भुत करण्याकरिता काही हरकत नसेल तर आपण तसे प्रशासनाला आदेश दयावे अशी विनंती आहे. आपल्याला वाटत असेल तर प्रशासनाचे मत आपण घेवून घ्यावे.

महापौर:- हे काम कां करण्यात आले नाही याबद्दल प्रशासनाने उत्तर मांडावे.

कार्यकारी अभियंता (श्री.बाराहाते) :- मा.महापौरजी, नागपूर शहराच्या मंजूर विकास आराखडयानुसार अंतुजीनगर व न्यु सुरजनगर या दोन वस्त्या ग्रिन बेल्ट कंट्रोल स्किम अंतर्गत समाविष्ट असल्यामुळे व उर्वरित तीन वस्त्या रहिवासी वापरा करिता दर्शविलेल्या आहेत व खाजगी जमिनीवर वस्त्या वसलेल्या असल्याचा रिपोर्ट नेहरुनगर, झोन क्र. ५ तर्फे स्लम कार्यालयास प्राप्त झालेला आहे. महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकासअधिनियम १९७१ च्या कलम ४(१) अनुसार गलिच्छ वस्ती म्हणुन घोषित करणे योग्य वाटत नसल्यामुळे नकार देण्यात आला आहे.

ॲड्धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, जी माहिती कार्यकारी अभियंता श्री.बाराहाते साहेबांनी दिली. त्या स्लम ॲक्ट १९७१ च्या कलम ४ सेक्शन (१) अनुसार मला या गोष्टीचे आश्चर्य वाटते की त्या कलमाला त्यांनी पुन्हा तपासावे, पुन्हा तपासावे. त्या अंतर्गत अशा स्लम नोटीफाईड करता येत नसेल तर मला काहीही म्हणावयाचे नाही. स्लम ॲक्टमध्ये अशा प्रकारची प्रोव्हीजन करण्यात आली आहे. मी ती नस्ती लिगल ओपिनियम करिता विधी विभागाकडे पाठविली. विधी विभागाने त्या नस्तीवर स्लम नोटीफाईड करता येते असे आपले मत दिले आहे. त्यामुळे मा.महापौरजी, आपल्या निदर्शनास मी आणून देवू इच्छितो की, नागपूर शहरामध्ये ४२३ झोपडपट्टया आहेत. त्या सगळयाच्या सगळया झोपडपट्टया हया शासकीय जमीनीवर आहेत, अनेक झोपडपट्टया खाजगी जमिनीवर आहेत, अनेक झोपडपट्टया आरक्षित जागेवर आहेत आणि त्या स्लम नोटीफाईड आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो कि, नागपूर युनिर्व्हेसिटीचे मैदान हे खेळाकरिता आरक्षित आहे.मा.महापौरजी, मी आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो कि, हे मैदान खेळाकरिता आरक्षित असल्यावरही अण्णाभाऊ साठे नगर त्या मैदानावर वसलेले आहे. ते फुटबॉल खेळासाठी आरक्षित

असल्यावरही नोटीफाईड करण्यात आलेले आहे. त्यामुळे या स्लम ॲक्टनुसार ही जमीन कोणत्या उपयोगाकरिता आहे. ग्रीन बेल्ट कंट्रोल करिता प्रस्तावित आहे की आणखी कोणत्या उद्देशाकरिता आहे ते समजण्यात येत नाही. त्या जमीनीवर राहणा-या लोकांच्या आरोग्यासाठी ते योग्य आहे की अयोग्य आहे या प्रोव्हीजनची त्या कायद्यामध्ये तरतूद करण्यात आली आहे. मा.महापौरजी, पुन्हा आपल्याला नम्र विनंती करतो की प्रशासन अशा पध्दतीने जनतेच्या सुरक्षिततेला वाटाणा लावण्याचा प्रयत्न करीत आहे.माझी आपल्याला नम्र विनंती आहे की या विषयावर नागरिकांनी ज्या पध्दतीचे अर्ज प्रशासनाकडे केले आहे आणि मी तसा पध्दतीचा प्रस्ताव तयार केलेला आहे त्याला मान्यता देण्यात यावी आणि या सर्व वस्त्या स्लम नोटीफाईड करण्याचे आपण निर्देश दयावे अशी मी आपल्याला विनंती करतो. धन्यवाद.

महापौर:- मा. सदस्यांनी जी सुचना केलेली आहे. त्याप्रमाणे एकदा पुन्हा प्रशासनानी त्या परिसरात जावून चाचणी करावी त्यानंतर नियमानुसार जर हे तर्कसंगत आहे, असे विधी विभागाचे मत आहे तर त्या दृष्टीने प्रशासनानी पुढील पावले उचलावी.